सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
Solapur Tarun Bharat
छत्रपती संभाजीनगर, अहमदनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित
छत्रपती संभाजीनगर गुरूवार, दि. ११ सप्टेंबर २०२५ वर्ष - तिसरे अंक १५८ पाने : ८ किंमत रु. ६/- www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com


## ट्रम्प यांना पुन्हा आली भारताची आठवण, म्हणाले मोदी माझे चांगले मित्र



नवी दिल्ली: अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प मंगळवारी म्हणाले की त्यांना पूर्ण विश्वास आहे की वॉशिंग्टन आणि दिल्ली यांच्यात सुरू असलेल्या व्यापारा चर्चेचे यशस्वी परिणाम दिसतील. ते म्हणाले की येणाऱ्या काही आठवड्यांमध्ये ते आपले सर्वात चांगले मित्र पंतप्रधान मोदींशी बातचीत करण्यास उत्सुक आहेत.

आपले मित्र मोदींशी बातचीत करण्यास उत्सुक

ट्रम्प यांनीसोशल मिडिया प्लॅटफॉर्म ट्रुथवरील पोस्टमध्ये लिहिले की, भारत आणि अमेरिका यांच्यातील व्यापार अडथळे दूर करण्यासाठी बातचीत सुरू असल्याचा मला आनंद आहे. मी माझे चांगले मित्र पंतप्रधान मोदींशी आगामी आठवड्यांमध्ये संवाद साधण्यासाठी उत्सुक आहे. मला पूर्ण विश्वास आहे की दोन्ही महान देशांसाठी या संवादातून नक्कीच चांगले फळ मिळेल.

भारत–अमेरिका संबंध खास

याआधी शनिवारी ट्रम्प यांनी भारत–अमेरिका यांच्यातील संबंध खास असल्याचे म्हटले होते. मी नेहमीच पंतप्रधान मोदींचा मित्र राहीन. ते एक महान पंतप्रधान आहेत. मी नेहमीच त्यांचा मित्र राहीन मात्र सध्या ते जे काही करत आहेत ते मला आवडत नाहीये. मात्र भारत आणि अमेरिका यांच्यातील संबंध खास आहे. चिंतेचे कारण नाही. कधी कधी आमच्यात थोडे थोडे मतभेद होतात.

ट्रम्प यांच्या या विधानावर भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनीही सकारात्मक प्रतिक्रिया दिली. त्यांनी 'एक्स' (पूर्वीचे ट्विटर) या सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवर म्हटले की, मी राष्ट्राध्यक्ष ट्रम्प यांच्या भावनांचा आणि आमच्या संबंधांच्या सकारात्मक मूल्यांकनाचा मनापासून आदर करतो. भारताचे परराष्ट्र व्यवहार मंत्री एस. जयशंकर यांनीही दोन्ही देशांमधील संबंधांवर सकारात्मकता व्यक्त केली आहे.

## दसरा मेळाव्यासाठी मुंबई मनपाकडून ठाकरे गटाला परवानगी



मुंबई : शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाला दादर येथील छत्रपती शिवाजी महाराज पार्कवर दसरा मेळावा घेण्यासाठी मुंबई महापालिकेने काही अटी शर्तींवर परवानगी दिली आहे. हा मेळावा शिवसेनेच्या पारंपरिक मैदानावर होणार असल्याने पक्षाच्या कार्यकर्त्यांमध्ये उत्साहाचे वातावरण आहे. येत्या २ ऑक्टोबर रोजी दसरा मेळावा होणार आहे. या मेळाव्यात उद्धव ठाकरे पक्षाची धोरणे, विरोधकांच्या टीका आणि महाराष्ट्राच्या राजकीय परिस्थितीवर काय भाष्य करतील याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

मुंबई मनपाने ध्वनिप्रदूषण नियंत्रण, गर्दी व्यवस्थापन, स्वच्छता आणि सुरक्षेच्या नियमांचे पालन करणे अनिवार्य आहे, अशा विविध अटींवर परवानगी दिली आहे. त्यानंतर ठाकरे गटाकडून दसरा मेळाव्याची तयारी जोरात सुरू करण्यात आली आहे.

दसरा मेळावा आणि शिवाजी पार्क हे जुने नाते आहे. १९६६ मध्ये पक्ष स्थापनेनंतर पहिला दसरा मेळावा ३० ऑक्टोबर १९६६ रोजी शिवाजी पार्कवर आयोजित करण्यात आला होता. तेव्हापासून हा मेळावा पक्षाच्या नेत्यांसाठी कार्यकर्त्यांना संबोधित करण्याचे व्यासपीठ बनले आहे. बाळासाहेबांच्या काळात या मैदानावर अनेक दमदार सभांचे आयोजन झाले. ज्यात त्यांच्या ठाकरी भाषेतील भाषणांनी लाखो कार्यकर्त्यांना प्रेरणा दिली.

बाळासाहेब ठाकरेंच्या भाषणांमुळे शिवसेनेची ओळख 'मराठी अस्मिता' आणि 'हिंदुत्व' यांच्याशी जोडली गेली. मात्र शिवसेनेत फूट पडल्यानंतर दसरा मेळाव्याच्या निमित्ताने शिवाजी पार्क मैदानासाठी ठाकरे आणि शिंदे गटांत संघर्ष होत आला आहे. २०२२ मध्ये शिवाजी पार्कचे प्रकरण न्यायालयात गेले होते. पहिल्यांदा अर्ज केल्याने आम्हाला मैदान मिळावे, असा ठाकरे सेनेचा दावा होता. या वादात न्यायालयाने ठाकरे यांच्या बाजूने कौल दिल्यानंतर शिंदे गटाने बीकेसीत मेळावा घेतला होता.

### नेपाळच्या फरार ५ कैद्यांना भारतात प्रवेश करताना अटक


काठमांडू, १० सप्टेंबर : नेपाळमधील परिस्थिती आता अत्यंत गंभीर बनली आहे. आंदोलनकर्त्यांचा रोष कमी होण्याचं नाव घेत नाही. अशातच आता नेपाळमधील १८ जिल्ह्यांतील कारागृहांमधून सुमारे ६,००० कैदी पळून गेले आहेत. दरम्यान नेपाळच्या तुरुंगातून फरार झालेले ५ कैदी भारत–नेपाळ सीमेद्वारे भारतात घुसण्याचा प्रयत्न करत होते. मात्र, त्यांचा हा प्रयत्न अयशस्वी ठरला आणि त्यांना अटक करण्यात आली.

### पुरुष एअर पिस्तूल नेमबाजांची निराशाजनक कामगिरी



बीजिंग, १० सप्टेंबर : भारतीय नेमबाजांची आयएसएसएफ विश्वचषकामध्ये खराब कामगिरी सुरूच राहिली आहे. सम्राट राणा, अमित शर्मा आणि निशांत रावत यांना पुरुषांच्या १० मीटर एअर पिस्तूलच्या अंतिम फेरीत स्थान मिळवता आले नाही. सम्राटने भारतीय खेळाडूंमध्ये सर्वोत्तम कामगिरी केली. तो पात्रता फेरीत ५८२ गुणांसह १० व्या स्थानावर राहिला आहे. चीनच्या हू काईने ५८९ गुणांसह प्राथमिक फेरीत अव्वल स्थान पटकावले. त्यानंतर त्याने २४२.३ गुणांसह सुवर्णपदक जिंकले. चीनच्या यु चांगजीने २४१.५ गुणांसह रौप्यपदक जिंकले.

### नेपाळनंतर फ्रान्समध्ये सरकारविरुद्ध मोठं आंदोलन



नवी दिल्ली : नेपाळनंतर आता फ्रान्सच्या रस्त्यावर सरकारविरुद्ध लोकांचा रोष दिसून येत आहे. लोक रस्त्यावर उतरले असून इमॅन्युएल मॅक्रॉन सरकारच्या धोरणांविरुद्ध मोठं आंदोलन करत आहेत. राजधानी पॅरिसमध्ये तोडफोड, जाळपोळ होत आहे. काही लोक पोलिसांवर दगडफेक करत आहेत. फ्रान्समधील लोक राष्ट्राध्यक्ष इमॅन्युएल मॅक्रॉन यांच्याविरोधात निदर्शनं करत आहेत.

### रेशीमबाग म्हणजे आम्हा स्वयंसेवकांसाठी प्रेरणादायी दीपस्तंभ – रविंद्र चव्हाण

नागपूर, १० सप्टेंबर, : राष्ट्रीय स्वयंसेवक संघ हे केवळ एक संघटन नाही, तर मातृभूमीप्रति अखंड निष्ठा, त्याग आणि राष्ट्रसेवेचा जीवनमंत्र देणारे एक अद्वितीय विद्यापीठ आहे, जे आम्हाला राष्ट्रभक्तीचे तेज, सेवाकार्यासाठी ऊर्जा आणि व्यक्तिमत्त्व विकासासाठी आत्मबल पुरवते. म्हणूनच संघाचा स्वयंसेवक असणे ही अभिमानाची बाब आहे. या विद्यापीठामध्ये घडलेल्या प्रत्येक स्वयंसेवकासाठी नागपूर येथील रेशीमबाग हे चिरंतन दीपस्तंभासारखे आहे, असे प्रतिपादन भाजपा महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण यांनी केले.

## पंतप्रधान मोदी गुरुवारी वाराणसीत मॉरिशसच्या पंतप्रधानांना भेटणार

नवी दिल्ली : मॉरिशसचे पंतप्रधान रामगुलाम सध्या भारत दौऱ्यावर आहेत. यादरम्यान पंतप्रधान नरेंद्र मोदी उद्या, गुरुवारी वाराणसी दौरा करणार आहेत आणि रामगुलाम यांच्यासोबत द्विपक्षीय चर्चा करणार आहेत. एका अधिकाऱ्याने दिलेल्या माहितीनुसार, ही बैठक भारत आणि मॉरिशस यांच्यातील स्थायी सांस्कृतिक संबंध, आध्यात्मिक बंध आणि लोकांमधील घट्ट नाते यावर आधारित असेल, ज्यामुळे दोन्ही देशांमधील नाते आणखी मजबूत होईल.यानंतर पंतप्रधान नरेंद्र मोदी देहरादूनकडे रवाना होतील, जिथे ते उत्तराखंडमधील पूरग्रस्त भागांचे हवाई सर्वेक्षण करतील. मिळालेल्या माहितीनुसार, देहरादूनमध्ये पंतप्रधान मोदी अधिकाऱ्यांसोबत उच्चस्तरीय पुनरावलोकन बैठकीचे अध्यक्षस्थान भूषवतील. दरम्यान, मॉरिशसचे पंतप्रधान रामगुलाम मंगळवारी मुंबईत पोहोचले असून ते १६ सप्टेंबरपर्यंत भारताच्या दौऱ्यावर असतील. अधिकार्यांनी पुढे सांगितले की, दोन्ही देशांचे पंतप्रधान द्विपक्षीय चर्चांदरम्यान विविध क्षेत्रांतील सहकार्याचा आढावा घेतील.त्यामध्ये आरोग्य, शिक्षण, विज्ञान व तंत्रज्ञान, ऊर्जा व पायाभूत सुविधा, नवीन आणि नवीकरणीय ऊर्जा, डिजिटल सार्वजनिक पायाभूत सुविधा, ब्लू इकॉनॉमी (नीळी अर्थव्यवस्था) या उभरत्या क्षेत्रांमध्ये सहकार्य वाढवण्याच्या संधींवर चर्चा होईल.

## बंजारा समाजाचा धडक मोर्चा; मराठा समाजाप्रमाणे बंजारा समाजालाही हैदराबाद गॅझेट लागू करा



सोलापूर : बंजारा समाजाला हैदराबाद गॅझेट लागू करून त्यांना अनुसूचित जमाती (एसटी) मधून आरक्षण द्यावे, अशी मागणी सेवा फाउंडेशनचे मिथुन राठोड यांनी पत्रकार परिषदेत केली आहे. या मागणीसाठी १७ सप्टेंबर रोजी बंजारा समाजाच्या वतीने सोलापूर जिल्हाधिकारी कार्यालयावर धडक मोर्चा काढण्यात येणार आहे, अशी माहितीही राठोड यांनी दिली.

अनेक वर्षांपासून बंजारा समाजाचा एसटी प्रवर्गात समावेश करावा, अशी मागणी प्रलंबित आहे. एकच खानपान, राहणीमान, वेशभूषा, केशभूषा आणि एकच बोलीभाषा असणाऱ्या बंजारा समाजाचा वेगवेगळ्या राज्यात वेगवेगळ्या प्रवर्गामध्ये समावेश करण्यात आला आहे. आंध्रा तेलंगणामध्ये एस.टी. प्रवर्गात कर्नाटकमध्ये एस सी. प्रवर्गात, गुजरात व हरियाणामध्ये ओबीसी, दिल्लीत एससी तर महाराष्ट्रामध्ये व्ही. जे. प्रवर्गामध्ये समावेश आहे.

महाराष्ट्र शासनाने मराठा समाजाला आरक्षणाबाबत हैदराबाद गॅझेट लागू करण्याचे आदेश काढले आहेत. त्याप्रमाणे बंजारा समाजाला हैदराबाद गॅझेट लागू करून त्यांना अनुसूचित जमाती (एसटी) मधून आरक्षण द्यावे, अशी मागणी आता केली जात आहे.

मराठवाड्यातील बंजारा (लमाण) समाजाला हैद्राबाद स्टेट गॅझेटिअर (१९२०) नुसार अनुसूचित जमाती वर्ग आरक्षणाचा दर्जा देण्याबाबतचे निवेदन महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना मुखेड विधानसभा मतदारसंघाचे आमदार तुषार राठोड यांनी दिले आहे.बंजारा समाजाच्या हिताचे निर्णय घ्यावे अशी विनंती केली आहे.

आज महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची मुखेड विधानसभा मतदारसंघाचे भारतीय जनता पक्षाचे आमदार तुषार राठोड यांनी सह्याद्री अतिथीगृह, मुंबई येथे भेट घेतली.

## दिल्लीच्या ७९९ सरकारी शाळांमध्ये पाणी व विजेची समस्या गंभीर; गैरसोईमुळे गविद्यार्थ्यांचे भविष्य धोक्यात



नवी दिल्ली, १० सप्टेंबर (हिं.स.) : शिक्षण संचालनालयाच्या नुकत्याच आलेल्या अहवालात दिल्लीतील ७९९ सरकारी शाळांमध्ये पाणी आणि वीज पुरवठ्याची अत्यंत खराब स्थिती उघड झाली आहे, जी विद्यार्थ्यांच्या भविष्यासाठी मोठा धोका बनली आहे.

अहवालानुसार, ७०३ शाळांपैकी ४८ शाळांमध्ये पिण्याच्या पाण्याचा पुरवठाच नाही. ५९ शाळांमध्ये पाण्याचा पुरवठा अपुरा आणि अनियमित असल्याच्या तक्रारी समोर आल्या आहेत. त्यापैकी २२ शाळा पूर्णपणे टँकरवर अवलंबून आहेत, तर १० शाळांमध्ये पाणी उपलब्धच नाही. यातील काही शाळा अजूनही बांधकामाच्या अवस्थेत आहेत, मात्र काही शाळा गेल्या अनेक वर्षांपासून टँकर किंवा जवळच्या इतर शाळांवर अवलंबून आहेत. यावरून हे स्पष्ट होते की, सरकारी शाळांची अवस्था शिक्षणाच्या दृष्टीने दिवसेंदिवस अधिकच ढासळत चालली आहे.

वीज पुरवठ्याच्या बाबतीतही स्थिती चिंताजनक आहे. तब्बल ६ शाळांमध्ये वीजच नाही, तर १७ शाळांमध्ये वारंवार वीज खंडित होत असल्यामुळे शैक्षणिक कामकाजावर गंभीर परिणाम होत आहे. बहुतेक शाळांमध्ये ना जनरेटरची सोय आहे ना कोणतीही स्थायी पर्यायी व्यवस्था. काही शाळांमध्ये एकाच वीजमीटरचा वापर केला जात आहे, ज्यामुळे बिल भरणे व देखरेख करणे कठीण झाले आहे. या पार्श्वभूमीवर शिक्षण संचालनालयाने संबंधित उपशिक्षण संचालकांना तातडीने चौकशी करून सुधारात्मक उपाययोजना राबवण्याचे आदेश दिले आहेत. टँकरवर अवलंबून असलेल्या शाळांसाठी दिल्ली जल बोर्डाच्या माध्यमातून त्वरित टँकर पुरवठा सुरू करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. तसेच, ज्या शाळांना अद्याप जल बोर्डचे जलजोडणी कनेक्शन नाही, त्यांनी तातडीने नव्या कनेक्शनसाठी अर्ज करावा, असे आदेशही देण्यात आले आहेत.या समस्येचा कायमस्वरूपी उपाय म्हणून शाळांमध्ये सौरऊर्जेचे पॅनेल बसवण्याची शिफारसही करण्यात आली आहे, जेणेकरून भविष्यात अशा समस्यांना सामोरे जावे लागू नये.

## IND vs UAE: भारताने जिंकला टॉस, पहिल्यांदा गोलंदाजीचा निर्णय

दुबई: आशिया कप २०२५मध्ये टीम इंडियाचा आज पहिला सामना होत आहे. हा सामना यूएईच्या संघाशी होत आहे. आजचा हा सामना दुबईच्या दुबई आंतरराष्ट्रीय स्टेडियममध्ये खेळवला जात आहे. सामन्यात टॉस जिंकत भारताने पहिल्यांदा गोलंदाजीचा निर्णय घेतला आहे. यूएईचा संघ पहिल्यांदा फलंदाजी करणार आहे. सूर्याने प्लेईंग इलेव्हनमध्ये संजू सॅमसनला संधी दिली आहे. तिलक वर्माही संघात आहे. मात्र जितेश आणि रिंकूला संधी मिळालेली नाही.



भारत या सामन्यात विजयासह सुरूवात करेल. तर यूएईचा संघही भारतासारख्या मोठ्या संघाला हरवत आपली छाप सोडण्याचा प्रयत्न करेल.

असे असेल भारताचे प्लेईंग इलेव्हन

अभिषेक शर्मा, शुभमन गिल, सूर्यकुमार यादव(कर्णधार), तिलक वर्मा, संजू सॅमसन(विकेटकीपर), शिवम दुबे, हार्दिक पांड्या, अक्षर पटेल, कुलदीप यादव, जसप्रीत बुमराह, वरूण चक्रवर्ती.

## 'इंडी' आघाडीच्या खासदारांनी अंतरात्म्याचा आवाज ऐकला : श्रीकांत शिंदे

नवी दिल्ली, १० सप्टेंबर : उपराष्ट्रपती पदाच्या निवडणुकीत इंडि आघाडीची मते फुटल्यानंतर शिवसेना खासदार व एनडीए उमेदवार प्रतिनिधी असलेल्या डॉ. श्रीकांत शिंदे यांनी काँग्रेसचे यात्रेकरु खासदार राहुल गांधीं यांच्यावर निशाणा साधला. गांधी यांच्या आवाहनानुसार इंडि आघाडीच्या खासदारांनी अंतरात्म्याचा आवाज ऐकला आणि एनडीएच्या उमेदवाराला मतदान केले, असा टोला खासदार डॉ. शिंदे यांनी लगावला. उपराष्ट्रपती पदाच्या निवडणुकीत इंडि आघाडीमध्ये फाटाफूट झाली. या निवडणुकीत एनडीएचे उमेदवार सी.पी राधाकृष्णन यांना पहिल्या पसंतीची ४५२ मते मिळाली. तर इंडि आघाडीचे उमेदवार निवृत्त न्यायमूर्ती बी. सुदर्शन रेड्डी यांना ३०० मते मिळाली. या निवडणुकीत विरोधकांची मते फुटली. यावरुन शिवसेना खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांनी यांनी ट्विट करत राहुल गांधी यांच्यावर टीका केली.

## भावी पिढीला प्रदूषणमुक्त पर्यावरण देण्यासाठी 'नो पीयूसी... नो फ्युएल' उपक्रम राबवणार!

मुंबई: भविष्यातील पिढीला प्रदूषण मुक्त पर्यावरण देण्यासाठी सध्याच्या पिढीने स्वतः वर पर्यावरण पूरक काही निर्बंध घालून घेणे गरजेचे आहे. त्या उद्देशाने प्रत्येक वाहनाला दिले जाणारे प्रदूषण नियंत्रण प्रमाणपत्र (झणउ) हे वैध असणे गरजेचे आहे. अवैध प्रमाणपत्र निर्मितीची साखळी पूर्णतः बंद झाली पाहिजे, यासाठी भविष्यात प्रत्येक पेट्रोल पंपावर 'नो पीयूसी नो फ्युएल' उपक्रमाची अंमलबजावणी सक्तीने करण्यात यावी, असे निर्देश परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी दिले आहे. या अनुषंगाने परिवहन आयुक्त कार्यालयात आयोजित बैठकीत परिवहन मंत्री बोलत होते. या बैठकीला परिवहन आयुक्त विवेक भीमनवार, सह सचिव (परिवहन) राजेंद्र होळकर यांच्या सह वरीष्ठ अधिकारी उपस्थित होते.

मंत्री सरनाईक म्हणाले, राज्यातील प्रत्येक पेट्रोल पंपावर सीसीटीव्ही कॅमेऱ्याच्या आधारे इंधन भरण्यासाठी येणाऱ्या प्रत्येक वाहनाचा वाहन क्रमांक तपासला (स्कॅन करून ) जाईल. जेणेकरून त्या माध्यमातून संबंधित वाहनाचे प्रदूषण नियंत्रण प्रमाणपत्राची वैधता कळेल. जर त्या वाहनाचे प्रदूषण नियंत्रण प्रमाणपत्र वैध नसेल तर त्या वाहनाला इंधन दिले जाणार नाही. तथापि, त्याच पेट्रोल पंपावर प्रदूषण नियंत्रण प्रमाणपत्र ताबडतोब काढून घेण्याची



व्यवस्था देखील केली जाईल. जेणेकरून वाहन चालकाची गैरसोय होणार नाही. या प्रदूषण नियंत्रण प्रमाणपत्र ला युनिक आयडेंटी (णखऊ) असणार आहे. त्यामुळे प्रदूषण नियंत्रण प्रमाणपत्राची वेळोवेळी वैधता तपासणी केली जाऊ शकते.

भविष्यात वाहन विक्री करणाऱ्या शोरूम व वाहन दुरुस्ती करणारे गॅरेजमध्ये देखील प्रदूषण नियंत्रण प्रमाणपत्र देण्याची व्यवस्था करण्यात येईल. जेणेकरून रस्त्यावर चालणारे प्रत्येक वाहन हे वैध प्रदूषण नियंत्रण प्रमाणपत्र असलेले असेल. ज्यामुळे प्रदूषण पातळी कमी करण्यास मदत होईल. त्याबरोबरच सध्या अवैध पद्धतीने प्रदूषण नियंत्रण प्रमाणपत्र काढणाऱ्या टोळीचा पडदाफाश करण्यासाठी मोठा परिवहन विभागाने धडक मोहीम राबवावी, असा सूचनाही परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी यावेळी दिल्या.

## भारत-मॉरिशस भागीदारी चिरायू होईल - मॉरिशसचे पंतप्रधान डॉ.रामगुलम




मुंबई, १० सप्टेंबर : मॉरिशस हा भारतासाठी सर्वाधिक विश्वासार्ह भागीदार असून येथे मोठ्या व्यावसायिक संधी आहेत. भारत–मॉरिशस यांच्यातील ऐतिहासिक, सांस्कृतिक व आर्थिक नातेसंबंध अधिक दृढ करण्याचे आवाहन करुन भारत–मॉरिशस भागीदारी चिरायू होईल, असा विश्वास मॉरिशसचे पंतप्रधान डॉ.नवीनचंद्र रामगुलम यांनी व्यक्त केला.

मॉरिशसचे पंतप्रधान डॉ. नवीनचंद्र रामगुलम यांच्या दोन दिवसीय मुंबई भेटीदरम्यान हॉटेल ट्रायडेंट येथे बिझनेस कॉन्क्लेव्हचे आयोजन करण्यात आले. याप्रसंगी केंद्रीय ऊर्जा, शहरी व्यवहार मंत्री मनोहरलाल खट्टर यांच्यासह विविध उद्योगसमूहांचे प्रमुख उपस्थित होते. भारतीय विदेश मंत्रालय, फेडरेशन ऑफ इंडियन चेंबर ऑफ कॉमर्स अँड इंडस्ट्रीज (फिक्की), कॉन्फेडरेशन ऑफ इंडियन इंडस्ट्रीज (सीआयआय) आणि मॉरिशस आर्थिक विकास मंडळ यांच्यावतीने या बैठकीचे आयोजन करण्यात आले.

श्री.रामगुलम यांनी दोन देशांमधील आर्थिक सहकार्य अधिक मजबूत करणे, वस्तू आणि सेवांच्या व्यापाराला प्रोत्साहन देणे तसेच परस्पर गुंतवणुकीला चालना देणे या उद्देशाने भारत आणि मॉरिशसदरम्यान झालेल्या व्यापार आर्थिक भागीदारी करारांतर्गत (सीईसीपीए) झालेल्या प्रगतीबाबत समाधान व्यक्त केले. ते म्हणाले, २०२४ मध्ये दोन्ही देशांतील व्यापार ८०० दशलक्ष अमेरिकी डॉलर्स (सहा हजार कोटी रुपये) पर्यंत पोहोचला आहे. मॉरिशसची निर्यात ५० दशलक्ष डॉलर्सवरून १०० दशलक्ष डॉलर्सपर्यंत नेण्याचे उद्दिष्ट असल्याचे सांगून वित्तीय सेवा, पर्यटन तसेच भारत–आफ्रिका–मॉरिशस त्रिपक्षीय सहकार्याद्वारे व्यापारातील असमतोल कमी करता येईल, असे मत त्यांनी व्यक्त केले. विशेष आर्थिक क्षेत्र उभारण्यास मॉरिशस सरकार कटिबद्ध असल्याचे सांगून हे क्षेत्र भारतीय कंपन्यांसाठी माहिती तंत्रज्ञान, कृत्रिम बुद्धिमत्ता, उच्च तंत्रज्ञान, आरोग्य, शिक्षण व मनोरंजन उद्योग यांसारख्या क्षेत्रांत नवे संधी–क्षेत्र ठरेल, असे ते म्हणाले.

डॉ.रामगुलम यांनी जागतिक आर्थिक अनिश्चिततेसह विविध संकटांचा उल्लेख करून भविष्यकाळातील अनिश्चिततेला तोंड देण्यासाठी भारत–मॉरिशस परस्पर भागीदारी अत्यावश्यक असल्याचे सांगितले. सागरी अर्थव्यवस्थेतील मासेमारी, समुद्री ऊर्जा व बंदर विकासासाठी त्यांनी भारताच्या सहकार्याची अपेक्षा व्यक्त केली. भारत व मॉरिशसमधील नाते हे इतिहास, संस्कृती, भाषा, परंपरा व नातेसंबंधाच्या पायावर उभे असून त्यात लोकाभिमुखता व परस्पर आदराचा ठसा उमटलेला आहे. मार्च २०२५ मध्ये पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या मॉरिशस भेटीतील 'मॉरिशस–भारत संयुक्त दृष्टी दस्तऐवजा'चा उल्लेख करत डॉ. रामगुलम यांनी हा दृष्टीकोन सामायिक समृद्धी, शाश्वतता व लवचिकतेवर आधारित असून सरकारसोबत खाजगी क्षेत्रानेही यात सक्रिय सहभाग घ्यावा, असे आवाहन केले. 'सीआयआय' आणि 'फिक्की'च्या आर्थिक योगदानाचे कौतुक करताना या संस्थांनी भारताच्या औद्योगिक बदलात व आर्थिक धोरणांच्या वाटचालीत महत्त्वाची भूमिका बजावल्याचे त्यांनी सांगितले.

भारत–मॉरिशस भागीदारीला नवा आयाम – केंद्रीय ऊर्जा मंत्री मनोहरलाल खट्टर

केंद्रीय ऊर्जा, मंत्री मनोहरलाल खट्टर यांनी यावेळी बोलताना भारत–मॉरिशसचे संबंध हे केवळ आर्थिकच नाहीत तर सांस्कृतिक व सामाजिक पातळीवरही अनोखे आणि घट्ट आहेत. भारत–मॉरिशस व्यापक आर्थिक सहकार्य व भागीदारी करारामुळे व्यापार, सेवा, गुंतवणूक व नवोन्मेष यामध्ये नवे मार्ग खुले झाले असून, आज भारत मॉरिशसच्या व्यापार भागीदारांपैकी एक आहे. तसेच मॉरिशस हे भारतातील विदेशी थेट गुंतवणुकीचे एक महत्त्वाचे स्रोत ठरले असल्याचे सांगितले. दोन्ही देशांतील ऐतिहासिक, सांस्कृतिक आणि आर्थिक संबंधांना बळकटी देण्याचे आवाहन केले.

मंत्री श्री.खट्टर म्हणाले, भारत जगातील चौथी सर्वात मोठी अर्थव्यवस्था आहे. गेल्या दशकात भारताने ७ टक्क्यांच्या आसपास वार्षिक वाढ दर कायम ठेवला आहे. ११५ हून अधिक युनिकॉर्न्सह भारत हे जगातील तिसरे सर्वात मोठे स्टार्टअप इकोसिस्टम आहे, असे सांगून भारत लवकरच पाच ट्रिलियनची अर्थव्यवस्था होईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. भारतातील आधार, युपीआय, डिजीलॉकर यांसारख्या डिजिटल सार्वजनिक पायाभूत संरचना जागतिक आदर्श ठरत असल्याचे त्यांनी सांगितले.

# लातूर दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.


## शेतकऱ्यांच्या प्रश्नांसाठी मनसेचे रास्तारोको आंदोलन

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.१० ऑगस्ट -**
जिल्ह्यात अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांच्या शेती पिकांचे अतोनात नुकसान झाले आहे. अनेक शेतकऱ्यांच्या शेतजमिनी पुराच्या पाण्यामुळे खरडून गेल्या आहेत. त्यामुळे बळीराजा उद्ध्वस्त झाला असून, या शेतकऱ्याला सरकारने तातडीची एकरी ५० हजार रुपयांची नुकसान भरपाई द्यावी, या मागणीसाठी मनसेचे जिल्हाध्यक्ष डॉ. नरसिंह भिकाने यांच्या नेतृत्वाखाली निलंगा -कासार शिरसी रोडवरील दादगी मोड येथे रास्तारोको आंदोलन करण्यात आले.

अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांची माती, जनावरे, घरे, रस्ते वाहून गेल्यामुळे त्यांच्यावर संकट कोसळले आहे. तत्काळ सरसकट पंचनामे करण्याची मागणी केली तर सरकार इतर ठिकाणी तत्परता दाखवत आहे. मात्र, अडचणीत सापडलेल्या शेतकऱ्यांच्या बाबतीत सरकारची तत्परता कोठे हरवून जात आहे, असा प्रश्न डॉ. भिकाने यांनी उपस्थित करत तातडीने सरकारने शेतकऱ्यांना मदत केली नाही तर जिल्हाभर तीव्र आंदोलन करू, असा इशारा त्यांनी दिला. शेवटी प्रशासनाला निवेदन देण्यात आले. या आंदोलनामुळे वाहतूक ठप्प झाल्याने पोलीस निरीक्षक सूर्यवंशी यांनी चोख बंदोबस्त ठेवत आंदोलकांवर गुन्हे दाखल करण्याचीही कार्यवाही केली.

या आंदोलनात तालुकाध्यक्ष सचिन बिराजदार, सूरज पटेल, प्रदीप शेळके, गणेश उसनाळे, विकास सूर्यवंशी, बालाजी पवार, सदाशिव हाडोळे, शिवराज चिंचोळे, सोमलिंग पाटील, कृष्णा सुरवसे, शुभम माने, बालाजी खिचडे, नरसिंग महालिंग, महेश सावनगिरे, राहुल पाटील, मल्लिकार्जुन कुरळे, जीवन बोरुळे आदी पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांसह निलंगा तालुक्यातील शेतकरी मोठ्या संख्येने सहभागी होते.



संक्षिप्त वृत्त...

## कासार शिरसी येथे जलयात्रेने दशलक्षण पर्वाची सांगता

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.१० ऑगस्ट -**
कासार शिरसी येथील जैन कासार मंदिरात आयोजित करण्यात आलेल्या दशलक्षण पर्वाची सांगता रविवारी भक्तिमय आणि मंगलमय वातावरणात



करण्यात आली. या निमित्त शहरातून भव्य शोभायात्रा काढण्यात आली. या शोभायात्रेत समाज बांधव मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

प्रति वर्षाप्रमाणे याही वर्षी कासार शिरसी येथील समाज बांधवांच्यावतीने पर्युषण पर्वानिमित्त विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. दहा दिवस चाललेल्या या पर्वाची सांगता शोभायात्रेने करण्यात आली. या निमित्त शहरातून भगवंतांच्या पालखीची भव्य मिरवणूक काढण्यात आली. यात महिला भाविकांचा मोठा सहभाग दिसून आला. क्षमावलीनंतर उपस्थित मान्यवरांसह मंदिरात नित्य हजर राहणाऱ्या बाल श्रावक प्रणव लोखंडे यांच्यासह अजित विजापुरे, अजित देवसाळे यांचा सत्कार करण्यात आला.या सोहळ्यास प्रकाश लोखंडे, बाजीराव पाटील, वैरागचे पवन मांडवकर, किशोर देवसाळे, माणिक पाटील, डॉ. भीमराव पाटील उपस्थित होते. यशस्वीतेसाठी जैन श्रावक सचिन कडतने, विश्वनाथ कडतने, बबलू पाटील, किरण किवडे, सागर देवसाळे, आनंद देवसाळे, पिंटू पाटील, प्रेमचंद विजापुरे, शैलेश आग्रे आदींनी परिश्रम घेतले.

## भाद्रपद पौर्णिमा स्त्रियांच्या सन्मानाचे प्रतीक : कांबळे

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.१० ऑगस्ट -**
भाद्रपद पौर्णिमेचे महत्त्व सांगताना, बौध्दनगरातील वैशाली बुध्द विहारात आयोजित एका कार्यक्रमात बौध्दाचार्य केशव कांबळे यांनी ही पौर्णिमा स्त्रियांच्या सन्मानाचे प्रतीक असल्याचे सांगितले.



बुध्द धम्म वर्षावास पुनीत पर्वाच्या निमित्ताने हा कार्यक्रम पार पडला. कार्यक्रमाची सुरुवात तथागत भगवान बुध्द आणि भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमांना पुष्प अर्पण करून झाली. त्यानंतर बुध्द वंदना घेण्यात आली.

यावेळी केशव कांबळे म्हणाले, भाद्रपद पौर्णिमेला प्रजापती गौतमी आणि पाचशे शाक्य स्त्रिया दीडशे मैल चालून वैशाली येथे पोहोचल्या. त्यांनी भिक्खू आनंद यांच्या मदतीने भिक्खूनी संघात सामील होण्याची विनंती केली. तेव्हा भगवान बुध्दांनी स्त्री-पुरुष समतेचा विचार करत प्रजापती पाचशे गौतमीसह स्त्रियांना भिक्खूनी संघात प्रवेश दिला. यातून बुध्दांनी स्त्री-पुरुष विषमतेला गाडून स्त्री-पुरुष समानतेचा विचार पहिल्यांदा मांडला. यावेळी किशोर गायकवाड यांचा सत्कार करण्यात आला. धम्मपाल गाथेने कार्यक्रमाची सांगता झाली.

## तहसीलदार थोरात यांचे निलंबन रद्द

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.१० ऑगस्ट -**
रेणापूरचे तहसीलदार प्रशांत थोरात यांचे निलंबन शासनाने रद्द केले असून, त्यांना पुन्हा तहसीलदार पदावर रुजू करण्यात आले आहे. यासोबतच त्यांच्यावरील प्रस्तावित विभागीय चौकशीही बंद करण्यात आली आहे.

उमरी तहसील कार्यालयातील ८ ऑगस्ट २०२५ रोजीच्या निरोप समारंभात थोरात यांनी तहसीलदारांच्या खुर्चीवर बसून गाणे गायल्याचा व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाला होता. यामुळे शासनाची प्रतिमा मलीन झाल्याचा ठपका ठेवत, त्यांना १६ ऑगस्ट रोजी विभागीय आयुक्तांनी निलंबित केले होते. या निर्णयाला शासनाने मान्यता दिली होती. थोरात यांनी निलंबन रद्द करण्याची विनंती केली होती. ही विनंती मान्य करत शासनाने त्यांचे निलंबन मागे घेतले आहे. थोरात यांना भविष्यात कार्यालयीन कामकाजात काळजी घेण्याची ताकीद देण्यात आली असून, ते रेणापूर येथील तहसीलदार पदावर पूर्ववत रुजू होणार आहेत.

## अनोळखी मयताबाबत पोलिसांचे आवाहन

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.१० ऑगस्ट -**
शहरातील गांधी चौक पोलीस ठाण्याच्या हद्दीत छत्रपती राजर्षी शाहू महाराज चौकातील रोडवर एक राजूभाई कादरी नावाचा बेवारस इसम दि. २६ ऑगस्ट रोजी उपचारासाठी सरकारी दवाखान्यात दाखल झाला होता. उपचारादरम्यान दि. ७ सप्टेंबर रोजी सकाळी ९ वाजता त्याचा मृत्यू झाला.

मयताचे नाव राजूभाई कादरी मयत बेवारस पुरुष, वय ५० वर्षे, उंची १६५ से. मी., शरीबांधा सडपातळ, चेहरा लांबट, वर्ण गव्हाळ, दाढी पांढऱ्या रंगाची वाढलेली, डोक्यावर केस अर्धवट पांढरे, अशा वर्णनाचा व्यक्ती आपल्या हद्दीत मिसींग असल्यास किंवा त्या बाबत काही माहिती असल्यास गांधी चौक पोलीस ठाण्यास कळवावे, असे आवाहन पोलीस निरीक्षक सुनील रेतीतवाड, पोलीस उपनिरीक्षक एच. जी. सोनकांबळे, पोलीस हवालदार एन. व्ही. नराळे यांनी केले आहे.

## जिल्हा परिषदेच्या शिक्षकांनी दर्जेदार शिक्षण देऊन विद्यार्थ्यांचे उज्वल भवितव्य घडवावे

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.१० ऑगस्ट -**
शिक्षण क्षेत्र पवित्र असले पाहिजे, जिल्हा परिषदेच्या शाळा या गोरगरिबाचे वैभव असून याच शाळेतून शिकलेले अनेकजण देशाच्या सर्वोच्च पदापर्यंत पोहोचले आहेत तेव्हा स्पर्धेच्या युगात जिल्हा परिषदेच्या शिक्षकांनी विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षण देऊन त्यांचे उज्वल भवितव्य घडवावे असे प्रतिपादन लातूर ग्रामीणचे आमदार रमेशआप्पा कराड यांनी केले.

रेणापूर तालुका पंचायत समिती शिक्षण विभागाच्या वतीने २१ जणांना तालुका आदर्श शिक्षक पुरस्काराचे वितरण आणि विविध क्रीडा स्पर्धेतील सन्मान सोहळा आ. रमेशआप्पा कराड यांच्या हस्ते मंगळवारी रेणापूर पं.स. सभागृहात संपन्न झाला. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी गटविकास अधिकारी सुमित जाधव हे होते तर याप्रसंगी रेणापूरचे तहसीलदार सागर मुळीक, गटशिक्षणाधिकारी कृष्णा भराडीया, तालुका आरोग्य अधिकारी श्रीधर रेड्डी, भाजपाचे विक्रमकाका शिंदे, नवनाथ भोसले, अनिल भिसे, सतीश आंबेकर, दशरथ सरवदे, सिद्धेश्वर मामडगे, गोपाळ पडिले, संपत कराड, लक्ष्मण यादव, भाऊसाहेब गुळबिले, अनुसया फड, निवृत्ती लहाने आदींची व्यासपीठावर उपस्थिती होती.

चांगल्या कामाची पावती हिच मिळालेल्या पुरस्कारातून प्राप्त होते. सर्व पुरस्कार प्राप्त शिक्षकांचे अभिनंदन करून यावेळी बोलताना आ. रमेशआप्पा कराड म्हणाले की, देशाचे भवितव्य शिक्षकांच्या हाती असते विद्यार्थ्यांना कोणते संस्कार देणार त्यानुसार विद्यार्थी घडतात. आई-वडिलांपेक्षाही अधिक संस्कार करणारे शिक्षक हेच विद्यार्थ्यांच्या जीवनातील महत्त्वाचे गुरु असून ज्या घरात ज्या शाळेत चांगले संस्कार मिळतात त्या ठिकाणी निश्चितच प्रगती झाल्याशिवाय राहत नाही. तेव्हा शिक्षकांनी कर्तव्यात कसूर न करता, कष्ट, जिद्द आणि प्रामाणिकपणे कर्तव्य केल्यास निश्चितपणे चांगली पिढी घडल्याशिवाय राहत नाही असे बोलून दाखवले.



बऱ्याच शिक्षकांचे कार्य कौतुकास्पद आहे. अनेक ठिकाणी शिक्षक दोन आणि विद्यार्थी पाच अशी स्थिती आहे. ही परिस्थिती बदलावी लागेल. काही ठिकाणी शाळा बंद पडत आहेत यासाठी शिक्षकांनी आत्मपरीक्षण करण्याची गरज असून जिल्हा परिषद शाळेची गळती थांबली पाहिजे. शिक्षकाकडे पाहण्याचा समाजाचा दृष्टिकोन बदलला पाहीजे त्यासाठी शिक्षकांनी स्वतःला आचारसंहिता घालून कर्तव्यनिष्ठ काम करायला हवे. शिक्षणासारख्या पवित्र क्षेत्रासाठी जे जे लागेल ती मदत करण्यास आपण सदैव तयार आहोत असेही आ. रमेशआप्पा कराड यांनी बोलून दाखवले.

रेणापूर तालुक्यातील गावागावातील प्रत्येक शैक्षणिक प्रगतीच्या कार्यात आ. रमेशआप्पा कराड सतत सहभागी असतात त्यांनी कर्मचारी खेळाडूंना प्रोत्साहन दिले मदत केली असे सांगून गटविकास अधिकारी सुमित जाधव यांनी पंचायत समितीच्या कामकाजाची माहिती दिली. शिक्षक पतसंस्थेचे अध्यक्ष गोपाळ पडिले आणि पुरस्कार प्राप्त शिक्षक भाऊसाहेब भामरे यांनी आपले मनोगत व्यक्त केले.

## लिंगायत समाजालाही हैदराबाद गॅझेट लागू करण्याची मागणी

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.१० ऑगस्ट -**
महाराष्ट्रातील लिंगायत समाजाला आरक्षण मिळावे यासाठी हैदराबाद गॅझेट लागू करण्यात यावे, अशी मागणी लिंगायत महासंघाचे प्रदेशाध्यक्ष प्रा. सुदर्शन बिरादार यांनी केली आहे.

प्रा. बिरादार म्हणाले, लिंगायत समाजाला आरक्षण देण्याची मागणी अनेक वर्षांपासून प्रलंबित आहे. २०१४ मध्ये पृथ्वीराज चव्हाण मुख्यमंत्री असताना केवळ 'वाणी' आणि 'लिंगायत वाणी' या नावांना ओबीसी आरक्षण देण्यात आले. पण, यामुळे केवळ काही हजार लिंगायत समाजातील लोकांनाच फायदा झाला. कारण, बहुतांश लिंगायत बांधवांच्या कागदपत्रांवर 'लिंगायत' किंवा 'हिंदू लिंगायत' अशी नोंद आहे. त्यामुळे त्यांना आरक्षणासाठी आवश्यक महसुली पुरावे मिळत नाहीत. यामुळे लाखो लोक आरक्षणापासून वंचित राहिले आहेत.

मराठा आरक्षणासाठी झालेल्या आंदोलनात हैदराबाद गॅझेटचा अभ्यास करण्यात आला होता. या गॅझेटमधील पान क्रमांक २४४ वर लिंगायत समाजाचा स्पष्ट उल्लेख आहे आणि त्यावेळी समाजाची लोकसंख्या ८२ हजार असल्याचेही नमूद करण्यात आले आहे. ज्याप्रमाणे मराठा समाजाला हैदराबाद गॅझेटच्या आधारावर आरक्षण देण्यात आले, त्याचप्रमाणे लिंगायत समाजालाही याच हैदराबाद गॅझेटच्या आधारे लवकरात लवकर आरक्षण लागू करण्यात यावे, अशी मागणी प्रा. सुदर्शनराव बिरादार यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.

## पृथ्वी, पाणी अन् संस्कृती रक्षण हे प्रत्येकाचे कर्तव्य : श्री श्री रविशंकर यांचे प्रतिपादन



**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.१० ऑगस्ट -**
पृथ्वी, पाणी अन् संस्कृतीचे रक्षण करणे, हे आपले कर्तव्य आहे, असे प्रतिपादन आर्ट ऑफ लिव्हिंगचे श्री श्री रविशंकर यांनी लातुरात महासत्संग सोळ्यात मंगळवारी केले. ९ वर्षाच्या प्रतीक्षेनंतर लातूरने त्यांचे भव्य स्वागत केले. यावेळी ८० हजारांपेक्षा अधिक भाविकांची उपस्थिती होती. भक्ती, संगीत अन् आनंदमय वातावरणाने परिसर दुमदुमला.

लातुरात आम्ही थक्क झालो. या मातीत काहीतरी खास आहे. इथले युवक मनापासून काम करतात. कधीकाळी जिथे पाण्यासाठी टँकर यायचे, आज तेच शेतकरी समृद्धीकडे वाटचाल करत आहेत. हे आदर्श आहे.' 'लातूरचा बदल उल्लेखनीय आहे. सर्वत्र योग व आनंदी कार्यक्रम होत आहेत. पृथ्वी, पाणी अन् संस्कृतीचे रक्षण करणे, हे आपले कर्तव्य आहे. घरामध्ये ध्यान असेल, जेवणापूर्वी शेतकऱ्यांसाठी प्रार्थना असेल, तर समाज आर्थिक, मानसिक अन् शारीरिकदृष्ट्या मजबूत बनेल, असेही ते म्हणाले. यावेळी सहकार मंत्री बाबासाहेब पाटील, माजी मंत्री आ. अमित देशमुख, आ. अभिमन्यू पवार, आ. विक्रम काळे, आ. प्रविण स्वामी यांच्यासह मान्यवर उपस्थित होते.

पाण्यासाठी महिलेला घराबाहेर जावे लागत नाहीयावेळी स्थानिक शेतकऱ्यांनी जलसंवर्धन कामाचा अनुभव मांडला. एका शेतकऱ्याने सांगितले, २०१० मध्ये आर्ट ऑफ लिव्हिंग आणि गावकऱ्यांनी मिळून जलजागृती अभियान सुरू केले. तीन वर्षात टँकरची गरज संपली अन् शेती वाढू लागली. प्रारंभी या कामाचा खर्च तीन लाख रुपये ठरवला होता. नंतर तो ९ लाखांपर्यंत पोहोचला. आज परिस्थिती अशी आहे की, कोणत्याही महिलेला पाण्यासाठी आपल्या घराबाहेर पडावे लागत नाही. महासत्संग सोहळ्याला हजारोंची उपस्थिती होती.

## 'भारत को जानो' परीक्षेत वाले इंग्लिश स्कूलचे यश

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.१० ऑगस्ट -**
भारत विकास परिषदेच्या वतीने घेण्यात आलेल्या परीक्षेत 'भारत को जानो' या विषयात येथील वाले इंग्लिश स्कूलच्या विद्यार्थ्यांनी यश संपादन केले आहे. यात लहान गटातून मनस्वी राख व ओमराज सुरवसे यांनी प्रथम क्रमांक पटकावले.

मोठ्या गटातून सिद्धीराज देशमुख व आदित्य जाधव यांनी द्वितीय क्रमांक पटकावला. यशस्वी विद्यार्थ्यांचे शाळेच्या वतीने कौतुक करण्यात आले. याबद्दल संस्थाध्यक्ष अरविंद सोनवणे,



सचिव मकरंद सावे, कोषाध्यक्ष शांतीकुमार कुचेरिया, ममता सावे, प्राचार्य चंद्रशेखर भोगडे, उपप्राचार्य बाकलीकर, पर्यवेक्षिका भारती व शिक्षक व कर्मचारी यांनी कौतुक केले आहे.

## समुपदेशनाने १०६ जणांचा संसार पुन्हा रुळावर

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.१० ऑगस्ट -**
कौटुंबिक हिंसाचार, किरकोळ वाद-विवाद आणि मतभेद आदी कारणांमुळे गेल्या काही वर्षांत घटस्फोट घेणाऱ्यांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढत आहे. भविष्यात घटस्फोटाचे प्रमाण कमी व्हावे यासाठी पोलीस दलाच्यावतीने पोलीस अधीक्षक कार्यालय परिसरात भरोसा कक्ष कार्यान्वित करण्यात आला आहे. चालू वर्षाच्या ८ महिन्यात या कक्षाकडे ५४७ प्रकरणे दाखल झाली असून, त्यापैकी ४१९ प्रकरणांचा निपटारा करण्यात आला आहे. यामध्ये १०६ प्रकरणांमध्ये समेट घडवून आणण्यात भरोसा कक्षाला यश आले असून, यामुळे या जोडप्यांचा संसार पुन्हा रुळावर आला आहे.



घटस्फोटाची अनेक कारणे आहेत. घटस्फोटामुळे या दाम्पत्याच्या अपत्यांची हेळसांड होते. ही वाढती समस्या जर प्राथमिक स्तरावरच सोडवली गेली, तर भविष्यात घटस्फोटांचे प्रमाण कमी करण्यास मदत होईल. याच उद्देशाने लातूर पोलीस दलाच्यावतीने काही वर्षांपूर्वी भरोसा कक्षाची स्थापना करण्यात आली आहे. आज या भरोसा कक्षामुळे दरवर्षी शेकडो कुटुंब आपसातील वादविवाद आणि मदभेद विसरून नव्याने संसारात रमले आहेत.

भरोसा कक्षाकडे दर महिन्याला साधारणतः ६0ते ७0 प्रकरणे तक्रार स्वरूपात येत आहेत. यामध्ये कौटुंबिक वाद-विवाद, पती-पत्नीचे भांडण आणि त्यातून निर्माण होणाऱ्या समस्यांवर आधारित तक्रारी सर्वाधिक येतात. चालू वर्षाच्या गेल्या ८ महिन्यांमध्ये भरोसा कक्षाकडे ५४७ प्रकरणे दाखल झाली असून, त्यापैकी ४१९ प्रकरणांचा निपटारा करण्यात आला आहे. यामध्ये १०६ प्रकरणांमध्ये समेट घडवून या जोडप्यांचा संसार पुन्हा रुळावर आणण्यात भरोसा कक्षाला यश आले आहे.

पोलीस अधीक्षक अमोल तांबे, अपर पोलीस अधीक्षक मंगेश चव्हाण यांच्या मार्गदर्शनात भरोसा कक्षाच्या प्रभारी अधिकारी पोलीस निरीक्षक श्यामल देशमुख, पोलीस उपनिरीक्षक संजय भोसले, महिला पोलीस अंमलदार मीरा सोळंके, मीना पवार यांच्यासह भरोसा कक्षातील अन्य कर्मचारी घटस्फोटीत जोडप्यांच्या समुपदेशनासाठी प्रयत्नशील आहेत.

## हैदराबाद गॅझेटसाठी महादेव कोळी जमात आक्रमक

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.१० ऑगस्ट -**
आदिवासी क्षेत्रासाठी व आदिवासी क्षेत्राबाहेरील अनुसूचित जमातीसाठी एकच कायदा असताना मराठवाड्यातील महादेव कोळी, मल्हार कोळी, टोकरे कोळी समाजावर अन्याय का? असा सवाल उपस्थित करून मराठा समाजाप्रमाणे आम्हालाही हैद्राबाद गॅझेट लागू करून जात प्रमाणपत्र व वैधता प्रमाणपत्राची प्रक्रिया सुलभ करा अन्यथा मराठवाडा मुक्तिसंग्राम दिनी काळे झेंडे दाखवून निषेध करू, असा इशारा मंगळवारी मराठवाडा सकल आदिवासी कोळी महादेव जमातीच्यावतीने जिल्हाधिकाऱ्यांमार्फत निवेदनाद्वारे शासनाला देण्यात आला आहे.

यावेळी मराठवाडा सकल आदिवासी कोळी महादेव जमातीचे अध्यक्ष चंद्रहास नलमले म्हणाले, 'कोळी' ही मुख्य जमात असून तिच्या उपजमातींना महाराष्ट्राच्या विविध भागांत अनुसूचित जमातीचा लाभ मिळतो. तत्कालीन आदिवासी मंत्री कै. मधुकर पिचड, संशोधन आयुक्त कै. गोविंद गारे, मंत्री नरहरी झिरवाळ, आमदार किरण लहामटे यांच्यासह अनेक आदिवासी आमदारांनी 'कोळी' नोंदीवरूनच जातीचे प्रमाणपत्र व वैधता प्रमाणपत्र मिळवले आहेत. मात्र, मराठवाड्यातील व उर्वरित जमातीला या निकषाप्रमाणे न्याय मिळत नाही, ही समाजाची खंत आहे. आदिवासी विकास विभाग क्षेत्रात २५ आदिवासी आमदार व ४ खासदार कार्यरत आहेत. मात्र, आदिवासी क्षेत्राबाहेरील जमातींचे अस्तित्व या विभागाकडून मान्य केले जात नाही. त्यामुळे मराठवाड्यातील जमातीला सुलभतेने प्रमाणपत्र व वैधता मिळत नाही, असा आरोप केला जात आहे. 'कोळी' नोंदीवरून एस.टी. चे प्रमाणपत्र मिळावे अशी मागणी मागील ४० वर्षांपासून प्रलंबित मागणी आहे. १९५० पूर्वीचा 'कोळी' नोंदीचा पुरावा ग्राह्य धरून आदिवासी कोळी महादेव, कोळी मल्हार, कोळी ढोर, टोकरे कोळी व डोंगर कोळी समाजाला एस.टी. प्रमाणपत्र व जातवैधता प्रमाणपत्र द्यावे, मराठा आरक्षणासाठी हैद्राबाद गॅझेटियर लागू करण्यात आले आहे. त्याचप्रमाणे कोळी समाज बांधवांच्या नोंदी या गॅझिटियरमध्ये आढळून आल्या आहेत. १९५० ला निवृत्त न्यायाधीश सय्यद सिराज उल हसन यांनी त्यावर शिक्कामोर्तब केला आहे. या नोंदीमध्ये कोळी ही मुख्य जात आहे तर महादेव कोळी,



मल्हार कोळी व इतर तत्सम जमाती आहेत अशी नोंद आहे. त्यामुळे सरसकट हैद्राबाद गॅझिटियर लागू करून जात वैधता प्रमाणपत्र देण्यात यावेत.

मराठवाड्यातील आठ जिल्ह्यांसाठी दोन जात पडताळणी समित्या आहेत. कुटुंबात म्हणजेच रक्त नात्यात वडिलांची, काकांची, आत्याची, भावाची, चुलत भाऊ यापैकी वैधता झाली असेल तर अशा प्रकरणात पुन्हा गृह चौकशीची गरज नाही, असा सर्वोच्च न्यायालयाचा आदेश आहे. तरीही या दोन्ही जात पडताळणी समितीकडून महादेव कोळी, मल्हार कोळी यांचे जात पडताळणीचे प्रस्ताव रक्त नात्यात वैद्यता झाली असतानाही प्रत्येक प्रकरणात गृह चौकशी केली जाते व प्रत्येक प्रकरण अवैध केले जाते, असा आरोपही नलमले यांनी केला.

सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

## जेके मॅक्स पेंट्सची 'घर आने के बहाने' ही नवी जाहिरात

छत्रपती संभाजीनगर : जेके मॅक्स पेंट्सतर्फे त्यांची नवी 'घर आने के बहाने' ही जाहिरात प्रदर्शित करण्यात आली आहे. आकर्षक भिंतींमुळे फक्त घर छान दिसत नाही तर त्यासोबतच त्या घरात आनंद, संवाद आणि नात्यांची रुजवात होते हेच, जीवनाचे विविध पैलू दाखवणाऱ्या या विनोदी बाजाच्या जाहिरातीतून दाखवण्यात आले आहे. या जाहिरातीच्या निमित्ताने जिमी शेरगील आणि मिनिषा लांबा साधारण दोन दशकांनंतर पुन्हा एकत्र पडद्यावर दिसणार आहेत. जिमी चोखंदळ आणि प्रेमळ शर्माजी या भूमिकेत आहेत तर मिनिषा त्यांची पत्नी आहे. त्यांचे नव्याने रंगवलेले घर शेजाऱ्यांसाठी आकर्षणाचे केंद्र बनले आहे. या घराच्या भिंतींसमोर इन्फ्लुएन्सर्सना त्यांचे रिल्स बनवायचे आहेत, जरा जास्तच सलगी दाखवणाऱ्या कुणा काकूंना आमंत्रण नसतानाही त्यांच्या घरी यायचे आहे. त्यांच्या आसपासच्या भागात अचानक प्रत्येकाला शर्माजींच्या घरी जाण्याचं काहीतरी कारण म्हणजेच बहाना सापडला आहे.

## उज्जीवन स्मॉल फायनान्स बँकेचा आराखडा सादर

नाशिक : उज्जीवन स्मॉल फायनान्स बँकेने २०२३ या आर्थिक वर्षापर्यंत १ लाख कोटींच्या एकूण कर्जपुस्तकाचे उद्दिष्ट गाठण्यासाठीआपला धोरणात्मक आराखडा जाहीर केला आहे. २०१७ मध्ये स्मॉल फायनान्स बँक म्हणूनकामकाज सुरू झाल्यापासून झालेल्या प्रगतीच्या पायावर हा आराखडा उभा आहे. ठेवींचाभक्कम पाया वाढवणे, कर्जउत्पादनांच्या श्रेणीचा विस्तार करणे आणि खर्च-केंद्रित कार्यपद्धतीद्वारेअधिक शाश्वत नफ्याचा पाया निर्माण करणे यावर या बँकेची वाढ आधारित आहे.विविधतापूर्ण कर्जपुस्तक : 'उज्जीवन'ने आपल्या कर्जांच्या पोर्टफोलिओमध्येसातत्याने विविधता आणली आहे. सुरक्षित तारणाधारित कर्जांचे प्रमाण वित्त वर्ष २०१९मध्ये १६ टक्के इतके होते. वित्त वर्ष २०२६ च्या पहिल्या तिमाहीअखेर ते ४६टक्क्यांवर पोहोचले. पुढील टप्प्यात हे प्रमाण ६५ ते ७० टक्क्यांपर्यंत नेण्याचाबँकेचा मानस आहे. यामध्ये परवडणारी गृहनिर्माण कर्जे,सूक्ष्म गहाणकर्जे, सूक्ष्म-लघु-मध्यम उद्योगांसाठीची कर्जे,वाहनकर्जे, सोनेतरण कर्जे आणि कृषिकर्जे यांचा प्रमुख वाटा असेल.

## अल्ट्रा झकास मराठी ओटीटी वर होणार मराठी मनोरंजनाचा जल्लोष!

मुंबई: 'सप्टेंबर' महिना म्हणजे सणांची रेलचेल, गणपती बाप्पाच्या गजरात रंगलेला उत्साह आणि आनंदाचा माहोल! आणि या सणासुदीच्या वातावरणात अल्ट्रा झकास मराठी ओटीटीवर सुरू होतोय धमाल मनोरंजनाचा उत्सव. या महिन्यात प्रत्येक आठवड्याच्या शुक्रवारी तुमच्यासाठी येणार आहेत मराठी, साऊथ ब्लॉकबस्टर सिनेमे, साऊथ, हिंदी सुपरहिट चित्रपट तेही तुमच्या मायबोली मराठीत. यातील खास आकर्षण ठरणार आहे थिएटरमध्ये हाऊसफुल्ल झालेला आणि प्रेक्षकांच्या हृदयात घर करणारा 'बेटर-हाफ ची लव्हस्टोरी' चित्रपट, जो या सप्टेंबरला खऱ्या अर्थाने 'झकास' बनवणार आहे. तर मग सणांसोबत झकास मनोरंजनासाठी सुद्धा तयार रह.

## धोरणात्मक आराखडा जाहीर

पुणे - उज्जीवन स्मॉल फायनान्स बँकेने २०२३ या आर्थिक वर्षापर्यंत १ लाख कोटींच्या एकूण कर्जपुस्तकाचे उद्दिष्ट गाठण्यासाठीआपला धोरणात्मक आराखडा जाहीर केला आहे. २०१७ मध्ये स्मॉल फायनान्स बँक म्हणूनकामकाज सुरू झाल्यापासून झालेल्या प्रगतीच्या पायावर हा आराखडा उभा आहे. ठेवींचाभक्कम पाया वाढवणे, कर्जउत्पादनांच्या श्रेणीचा विस्तार करणे आणि खर्च-केंद्रित कार्यपद्धतीद्वारेअधिक शाश्वत नफ्याचा पाया निर्माण करणे यावर या बँकेची वाढ आधारित आहे.विविधतापूर्ण कर्जपुस्तक : 'उज्जीवन'ने आपल्या कर्जांच्या पोर्टफोलिओमध्येसातत्याने विविधता आणली आहे. सुरक्षित तारणाधारित कर्जांचे प्रमाण वित्त वर्ष २०१९मध्ये १६ टक्के इतके होते. वित्त वर्ष २०२६ च्या पहिल्या तिमाहीअखेर ते ४६टक्क्यांवर पोहोचले. पुढील टप्प्यात हे प्रमाण ६५ ते ७० टक्क्यांपर्यंत नेण्याचाबँकेचा मानस आहे.

## राष्ट्रीय आरोग्यसेवा अहवाल प्रसिद्ध

मुंबई, १० सप्टेंबर २०२५ - भारतीय उद्योग महासंघ (सीआयआय-ईवाय हेल्थटेक सर्वेक्षण २०२५ मध्ये असे दिसून आले आहे की पुढील २-३ वर्षांत भारतीय रुग्णालयांमध्ये आयटी इनोव्हेशन बजेट २०-२५% ने वाढणार आहे आणि जवळजवळ निम्मे आरोग्य सेवा प्रदाते आधीच त्यांच्या खर्चाच्या २०-५०% डिजिटल इनोव्हेशनसाठी वाटप करत आहेत. उखख हॉस्पिटल टेक २०२५ समिटमध्ये प्रसिद्ध झालेल्या या अहवालात रुग्णांचा अनुभव, क्लिनिकल निकाल आणि डेटा-चालित निर्णय घेण्यामध्ये ऑटोमेशन कसे केंद्रस्थानी आहे यावर प्रकाश टाकण्यात आला आहे.

**अहिल्यानगर महानगरपालिका, अहिल्यानगर**

**अग्निशमन विभाग**

अहिल्यानगर महानगरपालिका अग्निशमन विभागासाठी दोन नविन अग्निशमन वाहने १) फोम टेंडर व २) चौदा हजार लिटर क्षमतेचा वॉटर बाऊझर खरेदी करावयाची असल्याने मा. शासनाच्या अधिकृत वेबसाईडवर ई निविदा प्रसिद्ध करण्यात आलेली असून ई. निविदा क्र. GEM/2025/B/6633619 दि.०१/०९/२०२५ अशी आहे. याबाबत सर्व संबधितांनी नोंद घ्यावी.

सही/-
मुख्य अग्निशामक अधिकारी
अहिल्यानगर महानगरपालिका, अहिल्यानगर

# देशमुख नगर येथे उपवास धारकाचा शाही महापारणा महोत्सव संपन्न

### उपाध्याय श्री विरंजन सागर जी महाराज यांची ससघ उपस्थिती



छत्रपति सभाजीनगर उपाध्याय श्री विरंजन सागर जी महाराज यांच्या सान्निध्यात प्रथमच श्री १००८ भगवान मल्लिनाथ दिगंबर जैन मंदिर, देशमुख नगर येथे ४० तपस्वींनी १० दिवसांची तपस्या केली आणि २२० जणांनी उपवास करून धर्मप्रभावना केली. सर्व तपस्वींना बग्गीत बसवून, बँड-बाज्यांसह तसेच पालखीत भगवताला विराजमान करून भव्य शोभायात्रा काढण्यात आली. शौभायात्रेत लोकांचा उत्साह पाहण्यासारखा होता, सर्व भक्तगण धार्मिक नृत्यकरत होते.

उपाध्याय श्री विरंजन सागर जी महाराज संघाच्या मंगल सान्निध्यात सर्व तपस्वींसाठी मंचावर पारणा करण्यात आला उपवास धारकांचा पारणा ऊपाध्याय विरजनसागर महाराज याचा हस्ते करण्यात आला. यावेळी हजारोच्या संख्येने परिसरातील तसेच बाहेर गावाचे भाविक मोठया संख्येने उपस्थित होते.हे अदभुद दुष्य पाहणा-यांचे डोळे पानावले होते. कारण हा कार्यकम ना भुतो ना भविष्यतील असा होता.यावेळी जयकार गुरूदेव का,जय जय गुरुदेव , उपवास धारकांची जय जय कार गूरुदेव हमारे आये है है नई रोशनी लाये है अशा अनेक घोषणा भाविक देत होते. यावेळी उपस्थित समाज बांधवाना प.पु. गुरुदेव यानि आठ, दहा व पाच उपवास केल्याने किती पुण्य भेटते याची महती उपस्थितांना दिली.यावेळेस

मुनिश्री म्हणाले - सोने जेव्हा तापले जाते तेव्हाच ते चमकते, त्याचप्रमाणे मनुष्य जेव्हा तप करतो तेव्हाच तो परमात्मा होतो. तपामुळेच कर्मांची निर्जरा होते आणि आत्म्याला शांती मिळते.

देशमुख नगरात एकूण ३०० तपस्वींनी तपस्या केली. आपली आत्मा परमात्मा बनविण्यासाठी साधना केली. साधनेचे उद्दिष्ट प्रदर्शन नसून आत्मदर्शन असते, असा विचार मुनिश्रींनी सभेला संबोधित केला यावेळी छत्रपती सभाजीनगर सह देशभरातून हजारो भाविक उपस्थित होते

# सेफ स्टेप्सच्या माध्यमातून वरिष्ठ नागरिकांना मार्गदर्शन



छत्रपती संभाजीनगर - ज्येष्ठ नागरिकांना ज्ञान, जागरूकता आणि प्रतिबंधात्मक उपाय याबाबत मार्गदर्शन करून त्यांना अधिक निरोगी व स्वावलंबी भविष्याचा आधार देण्यासाठी कमलनयन बजाज हॉस्पिटल येथे 'सेफ स्टेप्स' या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.या वेळी

तज्ज्ञांनी वृद्धांना होणाऱ्या दुखापती टाळणे, हाडांचे आरोग्य, कार्यक्षमता व सक्रिय वृद्धत्व याबाबत व्यावहारिक पावले आदी बाबींवर संवाद सत्रांद्वारे मार्गदर्शन केले.

या वेळी डॉ. जॉर्ज नोएल फर्नांडिस, मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी अधिक सुरक्षित, निरोगी आणि सन्मानजनक वार्धक्य ज्येष्ठ नागरिकांना मिळावे याबाबतचे आपले ध्येय आणि भूमिका मांडली.

जेरियाट्रिक्स, फिजिओथेरपी, ऑर्थोपेडिक्स, स्पोर्ट्स मेडिसिन व रेडिओलॉजी विभागातील तज्ज्ञांनी या वेळी मार्गदर्शन केले.संवाद सत्रामध्ये उपस्थितांच्या शंका, प्रश्न यांचे तज्ज्ञांकडून थेट निरसन करण्यात आले.

# कालिका माता मित्र मंडळाचे वतीने नवरात्र उत्सवानिमित्त देवी भागवताचे आयोजन

### ५३ वर्षापासून साजरा करण्यात येत आहे नवरात्र उत्सव



तभा वृत्तसेवा,

गंगापूर दि.१०:येथील कालिका माता मित्र मंडळाकडून नवरात्र दुर्गा उत्सव उत्साहात साजरा करण्यात येतो.यंदाचे ५३ असून मंडळाचे वतीने देवी भागवत ठेवण्यात आले आहे यासाठी मंडळाचे वतीने मंडप आणि डेकोरेशन उभारण्याचा उद्धाटन नारळ फोडून करण्यात आला यावेळी मंडळाचे जेष्ठ कार्यकर्ते तसेच नवयुवकांची मोठ्या प्रमाणात उपस्थिती होती.

यावेळी शामसुंदर धूत , रत्नाकर जोशी, प्रतापसिंग परिहार, योगेंद्र वर्मा, संजय राऊत जालीमसिंग ठाकूर दत्तात्रय बुचूडे किरण जोशी गोरखनाथ जावळे गिरीश गंगापूरकर राकेश कळसकर प्रशांत मुळे अर्जुन कराळे विशाल कराळे सोमनाथ शिंदे ओमप्रकाश मालपाणी आकाश बुचूडे, आदी उपस्थित होते. देवी भागवत प्रथमच हत असल्याने मंडळाच्या वतीने जय्यत तयारी करण्यात येत आहे दुर्गा मातेची मूर्ती ही अनेक वर्षापासून विसर्जन न करता उत्सव साजरा करण्यात येत असतो.

## 'बिन लग्नाची गोष्ट' १२ सप्टेंबरला प्रेक्षकांच्या भेटीला

छत्रपती संभाजीनगर - मराठी मनोरंजन विश्वात काही कलाकारांच्या जोड्या प्रेक्षकांच्या मनावर कायमस्वरूपी कोरल्या गेल्या आहेत. छोट्या पडद्यापासून रंगभूमी आणि रुपेरी पडद्यापर्यंत या जोड्यांनी आपल्या अभिनयातून, आपुलकीतून आणि नातेसंबंधांच्या बंधातून प्रेक्षकांशी भावनिक नाळ जुळवली आहे. अशाच रिअल आणि रील जोड्यांची मेजवानी आता प्रेक्षकांना 'बिन लग्नाची गोष्ट' या चित्रपटातून मिळणार आहे. या चित्रपटात एकाच वेळी रिअल लाइफ कपल्स संजय मोने व सुकन्या मोने आणि प्रिया बापट व उमेश कामत झळकणार आहेत.

## एमजीएममध्ये दोन दिवसीय महाराष्ट्र परिसंवादाचे आयोजन

छत्रपती संभाजीनगर, दि.१० : महिलांच्या सक्षमीकरणासाठी महाराष्ट्र परिसंवादाचे गुरूवार, दिनांक ११ सप्टेंबर २०२५ ते शुक्रवार, दिनांक १२ सप्टेंबर २०२५ असे दोन दिवस असणार आहे.

## जाहिर प्रकटन

**मा. दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) सोयगांव यांचे न्यायालयात, जि. औरंगाबाद**

दिवाणी किरकोळ अर्ज क्रं. २५७/२०२५.

१. शरीफा बी हनीफ पठाण, वय ७४ वर्षे, रा. फर्दापूर, ता. सोयगांव, जि. छत्रपती संभाजीनगर २. इरफानाबी अजीजखा मेवाती, वय ५० वर्षे, रा. वरीलप्रमाणे. ३. फरजाना बेगम अली खान मेवाती, वय ४९ वर्षे, रा. वरीलप्रमाणे, ४. वहिदाबेगम हमिदखा पठाण, वय ४८ वर्षे, रा. वरीलप्रमाणे. ५. कौसर परविन मुजाहिद खान वय ४५ वर्षे, रा. सिल्लोड, ता. सिल्लोड, जि. छ. संभाजीनगर ६. फिरदोस वी जिलानी खान, वय ४० वर्षे, रा. फर्दापूर, ता. सिल्लोड, जि. छ. संभाजीनगर ७. यास्मीन असलमखान पठाण, वय ३५ वर्षे, रा. कन्नड, ता. कन्नड, जि, छ. संभाजीनगर ८. पठाण अजमत खान मोहद खान, वय ३५ वर्षे, रा. फर्दापूर, ता. सोयगांव, जि. छ. संभाजीनगर

विरुद्ध
कोणीही नाही

प्रकरण :- वारसप्रमाणपत्र मिळणे बाबत

सर्व संबंधितास जाहिर प्रकटनाद्वारे कळविण्यात येते की, उपरोक्त अर्जदाराने वारसप्रमाणपत्र मिळणेसाठी ॲड. शुभम अ. आगे सोयगांव, ता. सोयगांव, जि. छत्रपती संभाजीनगर यांच्या मार्फत या न्यायालयात अर्ज दाखल केलेला आहे. मयत म. हनिफ गुलाम रसूल खा यांचा दिनांक २७/०६/२०२३ रोजी फर्दापुर, ता. सोयगांव येथे मृत्यू झालेला असून त्यांच्या पश्यात वरील अर्जदार हेच वारस आहे, असा अर्ज मा. न्यायालयात दाखल केलेला आहे. अर्जदार हे मयत म.हनिफ गुलाम रसुल खा यांचे वारस असुन त्यांना शासकिय/निमशासकिय कामासाठी वारसप्रमाणपत्रासाठी आवश्यकता आहे.

तरी ज्या कोणाला अर्जदाराच्या वारस प्रमाणपत्र देण्याकरीता उजर अगर आक्षेप असेल त्यांनी हे जाहीर प्रकटनाद्वारे प्रसिद्ध केल्यापासुन ३० दिवसांच्या आत या न्यायालयात योग्य त्या कागदपत्रासह आपला आक्षेप नोंदवावा अन्यथा अर्जदार व गैरअर्जदार यांना कायदेशीररित्या योग्य ते प्रमाणपत्र देण्यात येईल

आजरोजी दिनांक १०/०९/२०२५ रोजी सही व न्यायालयाच्या शिक्क्यासह दिले असे.

पु.ता. १६/१०/२०२५

आदेशावरुन,

विभीगीय लिपीक — सहाय्यक अधिक्षक

दिवाणी व फौजदारी न्यायालय सोयगांव

**IIFL FINANCE**

**CIN: L67100MH1995PLC093797**
**Regd. Office:** IIFL House, Sun Infotech Park, Road No. 16V, Plot No.B-23, Thane Industrial Area, Wagle Estate, Thane - 400604
Tel: (91-22) 41035000 • Fax: (91-22) 25806654
E-mail: reach@iifl.com • Website: www.iifl.com

**सोन्याचा दागिन्यांचा ई-लिलावाची सार्वजनिक सूचना**

येथे सगळ्या संबंधित ऋणकोंना विशेषत: आणि सर्व सामान्य नागरिकांना, सामान्यपणे असे सूचित करण्यात येते की, आम्ही आयआयएफएल फायनान्स लिमिटेड (''आयआयएफएल'') येथे थकबाकी असलेल्या कर्जदारांच्या सोन्याच्या दागिन्यांचा लिलाव करणार आहोत, यामध्ये वारंवार सूचना देऊन देखील कर्जाची रक्कम न भरलेल्या किंवा कर्ज खाते सामान्य करू न शकलेल्या ऋणकोंचा समावेश केला गेला आहे. खालील कर्ज खात्यांसाठी गहाण ठेवलेल्या सोन्याच्या दागिन्यांचा **ई-प्रोक्योरमेंट टेक्नोलॉजीज लिमिटेड** मार्फत त्यांच्या **https://egold.auctiontiger.net** या ऑनलाईन लिलाव मंचावरून दिनांक **16.09.2025 रोजी दुपारी 02:00 ते 05:00** दरम्यान सार्वजनिक लिलाव करण्यात येणार आहे. स्थान किंवा तारखेतील बदल (जर असल्यास) लिलाव केंद्राकडे दर्शविला जाईल. येथे उल्लेख केलेल्या तारखेस कोणत्याही कारणास्तव ई-लिलाव होऊ शकला नाही किंवा त्याच दिवशी पूर्ण झाला नाही, तर लिलावाच्या प्लॅटफॉर्मवर आणि/किंवा लिलाव केंद्रावर त्याच अटी व शर्तींसह उक्त लिलाव पुढील कोणत्याही तारखेला आयोजित करण्याचा किंवा पुढे नेण्याचा अधिकार आयआयएफएल राखून ठेवते. लिलावात विक्री न झालेले सोन्याच्या दागिन्यांचा लिलावाच्या प्लॅटफॉर्मवर आणि/किंवा लिलाव केंद्रावर प्रदर्शित केल्यावर पुढील कामकाजी दिवसांवर लिलाव केला जाईल. शाखा स्तरावरील लिलाव अयशस्वी झाल्यास, **26.09.2025** रोजी त्यांचा निर्दिष्ट जिल्हा केंद्रात जिल्हा स्तरावर आणखी कोणत्याही नोटीसशिवाय पुन्हा लिलाव करण्यात येईल. कोणत्याही कारणास्तव, येथे उल्लेखित तारखेस जिल्हा स्तरावर लिलाव होऊ शकला नाही किंवा त्या दिवशी लिलाव पूर्ण होऊ शकला नाही, तर त्याच अटी व शर्तींसह पुढील कोणत्याही तारखेला जिल्हा स्तरावर लिलाव आयोजित करण्याचा किंवा पुढे नेण्याचा अधिकार आयआयएफएल राखून ठेवते. जर ग्राहकाचा मृत्यू झाला, तर सर्व नियम आणि अटी त्याच्या नॉमिनी/ वैधानिक वारसदार यांच्यावर लागू होणार.

जिल्हा केंद्र: **जालना जीएल - पहिला मजला, कडबी मंडी , जुना मोंढा रोड आंध्र बँकेच्या मागे , जालना - 431203.**

**शाखेचे नांव: अंबड - अंबड जी एल, तालुका - अंबड .**
**गोल्ड लोन खाते. क्रमांक.:** GL38591972, GL37625978, GL37399621, GL37926504, GL37749955, GL39634043, GL37467072, GL37568489, GL34478269, GL34465719, GL37584025, GL38803242, GL34502827, GL34494001, GL34383083.

**शाखेचे नांव: जालना जीएल, तालुका - जालना .**
**गोल्ड लोन खाते. क्रमांक:**GL34444396, GL39531940, GL34461242, GL34261846, GL34395193.

**शाखेचे नांव: परतूर - परतूर जी एल, तालुका - परतूर .**
**गोल्ड लोन खाते. क्रमांक:**GL28998308, GL34623664, GL34475437, GL34481301, GL37816302, GL38729440, GL34479714, GL34470069.

ई-लिलाव हा ''जिथे आहे तसे'', ''जसे आहे तसे'' आणि ''जेवढे आहे तेवढे'' या तत्वावर केला जाईल आणि आयआयएफएल द्वारे कोणत्याही प्रकारे सोन्याच्या दागिन्यांची गुणवत्ता, शुद्धता, कॅरेट, वजन किंवा मूल्यांकनाचे प्रतिनिधीत्वं केले जाणार नाही. ई-लिलाव प्रक्रिया आणि विक्री (झाल्यास) ई-लिलावाकरिता असलेल्या अटी आणि नियम या संपूर्णपणे आयआयएफएलच्या अनुसार किंवा लागू करतांना त्यांना अनुरूप वाटतील त्या पद्धतीच्या असतील. आयआयएफएल स्वत:हून, लिलाव पुढे ढकलू किंवा रद्द करू शकेल, लिलावाच्या यादी मधून एखाद्या खात्याचे नाव वगळण्याचा अधिकार देखील आयआयएफएल कडेच असेल आणि हे करताना त्याकरिताची पुर्व सूचना, करण्यामागची कारणे, एखाद्या बोलीचा स्वीकार किंवा रद्दीकरण केल्याची कारणे देण्याची कोणतीही आवश्यकता नसेल. थकबाकी असलेल्या ऋणकोंची यादी, त्यांनी जमा केलेले दागिने आणि इतर तपशील हा संबंधित शाखांमध्ये दिलेला असेल. अयशस्वी कर्जदारांकडे हा पर्याय आहे की त्यांनी अद्ययावत व्याज आणि सर्व लागू शुल्कांसह संपूर्ण थकबाकीची परतफेड करावी जेणेकरुन ही नोटीस प्रकाशित झाल्यानंतरही त्यांचे कर्ज खाते बंद करण्याचा किंवा नियमित करण्याचा पर्याय असतो परंतु कोणत्याही परिस्थितीत लिलावाच्या तारखेपर्यंतच हे शक्य आहे, यात ते अयशस्वी झाल्यास सोन्याचे दागिने विकले जातील आणि थकबाकी (असल्यास) व्याज आणि खर्चासह वसूल केली जाईल. ही सूचना छापून आल्यानंतर जर एखाद्या ऋणकोने आपल्या कर्जाचा व्यवहार पूर्ण केला किंवा आपली थकबाकी भरून कर्ज खाते बंद केले, तर त्याला या सूचनेच्या छपाईचा संपूर्ण खर्च मात्र उचलावा लागेल. ऋणकोंना आपल्या बँक खात्यांचा तपशील शाखेकडे जमा/अद्ययावत करण्याची विनंती केली जाते आहे जेणेकरून लिलाव प्रक्रियेमधून निघालेला परतावा असल्यास तो जमा करता येऊ शकेल.

**तपशीलवार माहिती, अटी आणि नियम जाणून घेण्याकरिता कृपया आयआयएफएल फायनान्स लिमिटेडच्या नजिकच्या शाखेशी संपर्क साधा.**

**तारीख : 11.09.2025**
**स्थळ: जालना**

**स्वाक्षरीकर्ता/-**
**अधिकृत स्वाक्षरीकर्ता**
**आयआयएफएल फायनान्स लिमिटेड**

## जाहिर प्रकटन

**मा. दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) सोयगांव यांचे न्यायालयात, जि. औरंगाबाद**

दिवाणी किरकोळ अर्ज क्रं. २५३/२०२५.

१. नर्मदाबाई विठ्ठल इंगळे, वय ७४ वर्षे, रा. काळेनगर सोयगांव, ता. सोयगांव, जि. छत्रपती संभाजीनगर २. संतोष विठ्ठल इंगळे, वय ४४ वर्षे, रा. वरीलप्रमाणे, ३. एकनाथ विठ्ठल इंगळे, वय ४० वर्षे, रा. वरीलप्रमाणे. ४. रघुनाथ विठ्ठल इंगळे, वय ३५ वर्षे, रा. वरीलप्रमाणे.

विरुद्ध
कोणीही नाही

प्रकरण :- वारसप्रमाणपत्र मिळणे बाबत

सर्व संबंधितास जाहिर प्रकटनाद्वारे कळविण्यात येते की, उपरोक्त अर्जदाराने वारसप्रमाणपत्र मिळणेसाठी ॲड. शुभम अ. आगे सोयगांव, ता. सोयगांव, जि. छत्रपती संभाजीनगर यांच्या मार्फत या न्यायालयात अर्ज दाखल केलेला आहे. मयत विठ्ठल तुकाराम इंगळे यांचा दिनांक १९-०७-२०२५ रोजी सोयगांव, ता. सोयगांव येथे मृत्यु झालेला असून त्यांच्या पश्यात वरील अर्जदार हेच वारस आहे, असा अर्ज मा. न्यायालयात दाखल केलेला आहे. अर्जदार हे मयत विठ्ठल तुकाराम इंगळ यांचे वारस असुन त्यांना शासकिय/निमशासकिय कामासाठी वारसप्रमाणपत्रासाठी आवश्यकता आहे.

तरी ज्या कोणाला अर्जदाराच्या वारस प्रमाणपत्र देण्याकरीता उजर अगर आक्षेप असेल त्यांनी हे जाहीर प्रकटनाद्वारे प्रसिद्ध केल्यापासुन ३० दिवसांच्या आत या न्यायालयात योग्य त्या कागदपत्रासह आपला आक्षेप नोंदवावा अन्यथा अर्जदार व गैरअर्जदार यांना कायदेशीररित्या योग्य ते प्रमाणपत्र देण्यात येईल

आजरोजी दिनांक १०/०९/२०२५ रोजी सही व न्यायालयाच्या शिक्क्यासह दिले असे,

पु.ता. १०/१०/२०२५

आदेशावरुन,

विभीगीय लिपीक — सहाय्यक अधिक्षक

(दिवाणी व फौजदारी न्यायालय सोयगांव.)

**IIFL FINANCE**

**CIN: L67100MH1995PLC093797**
**Regd. Office:** IIFL House, Sun Infotech Park, Road No. 16V, Plot No.B-23, Thane Industrial Area, Wagle Estate, Thane - 400604
Tel: (91-22) 41035000 • Fax: (91-22) 25806654
E-mail: reach@iifl.com • Website: www.iifl.com

**सोन्याचा दागिन्यांचा ई-लिलावाची सार्वजनिक सूचना**

येथे सगळ्या संबंधित ऋणकोंना विशेषत: आणि सर्व सामान्य नागरिकांना, सामान्यपणे असे सूचित करण्यात येते की, आम्ही आयआयएफएल फायनान्स लिमिटेड (''आयआयएफएल'') येथे थकबाकी असलेल्या कर्जदारांच्या सोन्याच्या दागिन्यांचा लिलाव करणार आहोत, यामध्ये वारंवार सूचना देऊन देखील कर्जाची रक्कम न भरलेल्या किंवा कर्ज खाते सामान्य करू न शकलेल्या ऋणकोंचा समावेश केला गेला आहे. खालील कर्ज खात्यांसाठी गहाण ठेवलेल्या सोन्याच्या दागिन्यांचा **ई-प्रोक्योरमेंट टेक्नोलॉजीज लिमिटेड** मार्फत त्यांच्या **https://egold.auctiontiger.net** या ऑनलाईन लिलाव मंचावरून दिनांक **16.09.2025 रोजी दुपारी 02:00 ते 05:00** दरम्यान सार्वजनिक लिलाव करण्यात येणार आहे. स्थान किंवा तारखेतील बदल (जर असल्यास) लिलाव केंद्राकडे दर्शविला जाईल. येथे उल्लेख केलेल्या तारखेस कोणत्याही कारणास्तव ई-लिलाव होऊ शकला नाही किंवा त्याच दिवशी पूर्ण झाला नाही, तर लिलावाच्या प्लॅटफॉर्मवर आणि/किंवा लिलाव केंद्रावर त्याच अटी व शर्तींसह उक्त लिलाव पुढील कोणत्याही तारखेला आयोजित करण्याचा किंवा पुढे नेण्याचा अधिकार आयआयएफएल राखून ठेवते. लिलावात विक्री न झालेले सोन्याच्या दागिन्यांचा लिलावाच्या प्लॅटफॉर्मवर आणि/किंवा लिलाव केंद्रावर प्रदर्शित केल्यावर पुढील कामकाजी दिवसांवर लिलाव केला जाईल. शाखा स्तरावरील लिलाव अयशस्वी झाल्यास, **26.09.2025** रोजी त्यांचा निर्दिष्ट जिल्हा केंद्रात जिल्हा स्तरावर आणखी कोणत्याही नोटीसशिवाय पुन्हा लिलाव करण्यात येईल. कोणत्याही कारणास्तव, येथे उल्लेखित तारखेस जिल्हा स्तरावर लिलाव होऊ शकला नाही किंवा त्या दिवशी लिलाव पूर्ण होऊ शकला नाही, तर त्याच अटी व शर्तींसह पुढील कोणत्याही तारखेला जिल्हा स्तरावर लिलाव आयोजित करण्याचा किंवा पुढे नेण्याचा अधिकार आयआयएफएल राखून ठेवते. जर ग्राहकाचा मृत्यू झाला, तर सर्व नियम आणि अटी त्याच्या नॉमिनी/ वैधानिक वारसदार यांच्यावर लागू होणार.

जिल्हा केंद्र: **परभणी -स्टेशन रोड गोल्ड लोन - 1ला मजला काबरा कॉम्प्लेक्स, लक्ष्मीनारायण मंदिर स्टेशन जवळ , परभणी-431401**

**शाखेचे नांव: परभणी -स्टेशन रोड गोल्ड लोन, तालुका - परभणी .**
**गोल्ड लोन खाते. क्रमांक.:** GL34529424, GL34511768, GL34472234, GL34480403, GL25572380, GL25562631.

ई-लिलाव हा ''जिथे आहे तसे'', ''जसे आहे तसे'' आणि ''जेवढे आहे तेवढे'' या तत्वावर केला जाईल आणि आयआयएफएल द्वारे कोणत्याही प्रकारे सोन्याच्या दागिन्यांची गुणवत्ता, शुद्धता, कॅरेट, वजन किंवा मूल्यांकनाचे प्रतिनिधीत्वं केले जाणार नाही. ई-लिलाव प्रक्रिया आणि विक्री (झाल्यास) ई-लिलावाकरिता असलेल्या अटी आणि नियम या संपूर्णपणे आयआयएफएलच्या अनुसार किंवा लागू करतांना त्यांना अनुरूप वाटतील त्या पद्धतीच्या असतील. आयआयएफएल स्वत:हून, लिलाव पुढे ढकलू किंवा रद्द करू शकेल, लिलावाच्या यादी मधून एखाद्या खात्याचे नाव वगळण्याचा अधिकार देखील आयआयएफएल कडेच असेल आणि हे करताना त्याकरिताची पुर्व सूचना, करण्यामागची कारणे, एखाद्या बोलीचा स्वीकार किंवा रद्दीकरण केल्याची कारणे देण्याची कोणतीही आवश्यकता नसेल. थकबाकी असलेल्या ऋणकोंची यादी, त्यांनी जमा केलेले दागिने आणि इतर तपशील हा संबंधित शाखांमध्ये दिलेला असेल. अयशस्वी कर्जदारांकडे हा पर्याय आहे की त्यांनी अद्ययावत व्याज आणि सर्व लागू शुल्कांसह संपूर्ण थकबाकीची परतफेड करावी जेणेकरुन ही नोटीस प्रकाशित झाल्यानंतरही त्यांचे कर्ज खाते बंद करण्याचा किंवा नियमित करण्याचा पर्याय असतो परंतु कोणत्याही परिस्थितीत लिलावाच्या तारखेपर्यंतच हे शक्य आहे, यात ते अयशस्वी झाल्यास सोन्याचे दागिने विकले जातील आणि थकबाकी (असल्यास) व्याज आणि खर्चासह वसूल केली जाईल. ही सूचना छापून आल्यानंतर जर एखाद्या ऋणकोने आपल्या कर्जाचा व्यवहार पूर्ण केला किंवा आपली थकबाकी भरून कर्ज खाते बंद केले, तर त्याला या सूचनेच्या छपाईचा संपूर्ण खर्च मात्र उचलावा लागेल. ऋणकोंना आपल्या बँक खात्यांचा तपशील शाखेकडे जमा/अद्ययावत करण्याची विनंती केली जाते आहे जेणेकरून लिलाव प्रक्रियेमधून निघालेला परतावा असल्यास तो जमा करता येऊ शकेल.

**तपशीलवार माहिती, अटी आणि नियम जाणून घेण्याकरिता कृपया आयआयएफएल फायनान्स लिमिटेडच्या नजिकच्या शाखेशी संपर्क साधा.**

**तारीख : 11.09.2025**
**स्थळ: परभणी**

**स्वाक्षरीकर्ता/-**
**अधिकृत स्वाक्षरीकर्ता**
**आयआयएफएल फायनान्स लिमिटेड**

**IIFL FINANCE**

**CIN: L67100MH1995PLC093797**
**Regd. Office:** IIFL House, Sun Infotech Park, Road No. 16V, Plot No.B-23, Thane Industrial Area, Wagle Estate, Thane - 400604
Tel: (91-22) 41035000 • Fax: (91-22) 25806654
E-mail: reach@iifl.com • Website: www.iifl.com

**सोन्याचा दागिन्यांचा ई-लिलावाची सार्वजनिक सूचना**

येथे सगळ्या संबंधित ऋणकोंना विशेषत: आणि सर्व सामान्य नागरिकांना, सामान्यपणे असे सूचित करण्यात येते की, आम्ही आयआयएफएल फायनान्स लिमिटेड (''आयआयएफएल'') येथे थकबाकी असलेल्या कर्जदारांच्या सोन्याच्या दागिन्यांचा लिलाव करणार आहोत, यामध्ये वारंवार सूचना देऊन देखील कर्जाची रक्कम न भरलेल्या किंवा कर्ज खाते सामान्य करू न शकलेल्या ऋणकोंचा समावेश केला गेला आहे. खालील कर्ज खात्यांसाठी गहाण ठेवलेल्या सोन्याच्या दागिन्यांचा **ई-प्रोक्योरमेंट टेक्नोलॉजीज लिमिटेड** मार्फत त्यांच्या **https://egold.auctiontiger.net** या ऑनलाईन लिलाव मंचावरून दिनांक **16.09.2025 रोजी दुपारी 02:00 ते 05:00** दरम्यान सार्वजनिक लिलाव करण्यात येणार आहे. स्थान किंवा तारखेतील बदल (जर असल्यास) लिलाव केंद्राकडे दर्शविला जाईल. येथे उल्लेख केलेल्या तारखेस कोणत्याही कारणास्तव ई-लिलाव होऊ शकला नाही किंवा त्याच दिवशी पूर्ण झाला नाही, तर लिलावाच्या प्लॅटफॉर्मवर आणि/किंवा लिलाव केंद्रावर त्याच अटी व शर्तींसह उक्त लिलाव पुढील कोणत्याही तारखेला आयोजित करण्याचा किंवा पुढे नेण्याचा अधिकार आयआयएफएल राखून ठेवते. लिलावात विक्री न झालेले सोन्याच्या दागिन्यांचा लिलावाच्या प्लॅटफॉर्मवर आणि/किंवा लिलाव केंद्रावर प्रदर्शित केल्यावर पुढील कामकाजी दिवसांवर लिलाव केला जाईल. शाखा स्तरावरील लिलाव अयशस्वी झाल्यास, **26.09.2025** रोजी त्यांचा निर्दिष्ट जिल्हा केंद्रात जिल्हा स्तरावर आणखी कोणत्याही नोटीसशिवाय पुन्हा लिलाव करण्यात येईल. कोणत्याही कारणास्तव, येथे उल्लेखित तारखेस जिल्हा स्तरावर लिलाव होऊ शकला नाही किंवा त्या दिवशी लिलाव पूर्ण होऊ शकला नाही, तर त्याच अटी व शर्तींसह पुढील कोणत्याही तारखेला जिल्हा स्तरावर लिलाव आयोजित करण्याचा किंवा पुढे नेण्याचा अधिकार आयआयएफएल राखून ठेवते. जर ग्राहकाचा मृत्यू झाला, तर सर्व नियम आणि अटी त्याच्या नॉमिनी/ वैधानिक वारसदार यांच्यावर लागू होणार.

जिल्हा केंद्र: **बीड- सुभाष रोड गोल्ड लोन - एच. क्रमांक 211290, प्रकाश हाइट्स, सुभाष रोड, बीड-431122**

**शाखेचे नांव:अंबेजोगाई-नगरपालिका संकुल जीएल, तालुका - अंबेजोगाई.**
**गोल्ड लोन खाते. क्रमांक.:** GL34106446, GL34364921, GL34420296, GL32797240, GL34354608, GL33105105, GL33121856, GL34519493, GL34529107, GL34424939, GL34567574.

**शाखेचे नांव: आष्टी शनी मंदिर रोड जीएल, तालुका - आष्टी.**
**गोल्ड लोन खाते. क्रमांक.:** GL30909912, GL30924249.

**शाखेचे नांव: बीड-बीड मोहो, तालुका - बीड.**
**गोल्ड लोन खाते. क्रमांक.:** GL33875543, GL37632704, GL34466239, GL34418406, GL34546792, GL29088933, GL35661682, GL32263480, GL35939970, GL28538293.

**शाखेचे नांव: बीड- सुभाष रोड गोल्ड लोन, तालुका - बीड.**
**गोल्ड लोन खाते. क्रमांक.:** GL33925447, GL34036968, GL32149726, GL34202436, GL33700706, GL34387914.

ई-लिलाव हा ''जिथे आहे तसे'', ''जसे आहे तसे'' आणि ''जेवढे आहे तेवढे'' या तत्वावर केला जाईल आणि आयआयएफएल द्वारे कोणत्याही प्रकारे सोन्याच्या दागिन्यांची गुणवत्ता, शुद्धता, कॅरेट, वजन किंवा मूल्यांकनाचे प्रतिनिधीत्वं केले जाणार नाही. ई-लिलाव प्रक्रिया आणि विक्री (झाल्यास) ई-लिलावाकरिता असलेल्या अटी आणि नियम या संपूर्णपणे आयआयएफएलच्या अनुसार किंवा लागू करतांना त्यांना अनुरूप वाटतील त्या पद्धतीच्या असतील. आयआयएफएल स्वत:हून, लिलाव पुढे ढकलू किंवा रद्द करू शकेल, लिलावाच्या यादी मधून एखाद्या खात्याचे नाव वगळण्याचा अधिकार देखील आयआयएफएल कडेच असेल आणि हे करताना त्याकरिताची पुर्व सूचना, करण्यामागची कारणे, एखाद्या बोलीचा स्वीकार किंवा रद्दीकरण केल्याची कारणे देण्याची कोणतीही आवश्यकता नसेल. थकबाकी असलेल्या ऋणकोंची यादी, त्यांनी जमा केलेले दागिने आणि इतर तपशील हा संबंधित शाखांमध्ये दिलेला असेल. अयशस्वी कर्जदारांकडे हा पर्याय आहे की त्यांनी अद्ययावत व्याज आणि सर्व लागू शुल्कांसह संपूर्ण थकबाकीची परतफेड करावी जेणेकरुन ही नोटीस प्रकाशित झाल्यानंतरही त्यांचे कर्ज खाते बंद करण्याचा किंवा नियमित करण्याचा पर्याय असतो परंतु कोणत्याही परिस्थितीत लिलावाच्या तारखेपर्यंतच हे शक्य आहे, यात ते अयशस्वी झाल्यास सोन्याचे दागिने विकले जातील आणि थकबाकी (असल्यास) व्याज आणि खर्चासह वसूल केली जाईल. ही सूचना छापून आल्यानंतर जर एखाद्या ऋणकोने आपल्या कर्जाचा व्यवहार पूर्ण केला किंवा आपली थकबाकी भरून कर्ज खाते बंद केले, तर त्याला या सूचनेच्या छपाईचा संपूर्ण खर्च मात्र उचलावा लागेल. ऋणकोंना आपल्या बँक खात्यांचा तपशील शाखेकडे जमा/अद्ययावत करण्याची विनंती केली जाते आहे जेणेकरून लिलाव प्रक्रियेमधून निघालेला परतावा असल्यास तो जमा करता येऊ शकेल.

**तपशीलवार माहिती, अटी आणि नियम जाणून घेण्याकरिता कृपया आयआयएफएल फायनान्स लिमिटेडच्या नजिकच्या शाखेशी संपर्क साधा.**

**तारीख : 11.09.2025**
**स्थळ: बीड**

**स्वाक्षरीकर्ता/-**
**अधिकृत स्वाक्षरीकर्ता**
**आयआयएफएल फायनान्स लिमिटेड**

**IIFL FINANCE**

**CIN: L67100MH1995PLC093797**
**Regd. Office:** IIFL House, Sun Infotech Park, Road No. 16V, Plot No.B-23, Thane Industrial Area, Wagle Estate, Thane - 400604
Tel: (91-22) 41035000 • Fax: (91-22) 25806654
E-mail: reach@iifl.com • Website: www.iifl.com

**सोन्याचा दागिन्यांचा ई-लिलावाची सार्वजनिक सूचना**

येथे सगळ्या संबंधित ऋणकोंना विशेषत: आणि सर्व सामान्य नागरिकांना, सामान्यपणे असे सूचित करण्यात येते की, आम्ही आयआयएफएल फायनान्स लिमिटेड (''आयआयएफएल'') येथे थकबाकी असलेल्या कर्जदारांच्या सोन्याच्या दागिन्यांचा लिलाव करणार आहोत, यामध्ये वारंवार सूचना देऊन देखील कर्जाची रक्कम न भरलेल्या किंवा कर्ज खाते सामान्य करू न शकलेल्या ऋणकोंचा समावेश केला गेला आहे. खालील कर्ज खात्यांसाठी गहाण ठेवलेल्या सोन्याच्या दागिन्यांचा **ई-प्रोक्योरमेंट टेक्नोलॉजीज लिमिटेड** मार्फत त्यांच्या **https://egold.auctiontiger.net** या ऑनलाईन लिलाव मंचावरून दिनांक **16.09.2025 रोजी दुपारी 02:00 ते 05:00** दरम्यान सार्वजनिक लिलाव करण्यात येणार आहे. स्थान किंवा तारखेतील बदल (जर असल्यास) लिलाव केंद्राकडे दर्शविला जाईल. येथे उल्लेख केलेल्या तारखेस कोणत्याही कारणास्तव ई-लिलाव होऊ शकला नाही किंवा त्याच दिवशी पूर्ण झाला नाही, तर लिलावाच्या प्लॅटफॉर्मवर आणि/किंवा लिलाव केंद्रावर त्याच अटी व शर्तींसह उक्त लिलाव पुढील कोणत्याही तारखेला आयोजित करण्याचा किंवा पुढे नेण्याचा अधिकार आयआयएफएल राखून ठेवते. लिलावात विक्री न झालेले सोन्याच्या दागिन्यांचा लिलावाच्या प्लॅटफॉर्मवर आणि/किंवा लिलाव केंद्रावर प्रदर्शित केल्यावर पुढील कामकाजी दिवसांवर लिलाव केला जाईल. शाखा स्तरावरील लिलाव अयशस्वी झाल्यास, **26.09.2025** रोजी त्यांचा निर्दिष्ट जिल्हा केंद्रात जिल्हा स्तरावर आणखी कोणत्याही नोटीसशिवाय पुन्हा लिलाव करण्यात येईल. कोणत्याही कारणास्तव, येथे उल्लेखित तारखेस जिल्हा स्तरावर लिलाव होऊ शकला नाही किंवा त्या दिवशी लिलाव पूर्ण होऊ शकला नाही, तर त्याच अटी व शर्तींसह पुढील कोणत्याही तारखेला जिल्हा स्तरावर लिलाव आयोजित करण्याचा किंवा पुढे नेण्याचा अधिकार आयआयएफएल राखून ठेवते. जर ग्राहकाचा मृत्यू झाला, तर सर्व नियम आणि अटी त्याच्या नॉमिनी/ वैधानिक वारसदार यांच्यावर लागू होणार.

जिल्हा केंद्र: **औरंगाबाद-पैठण गेट रोड - जोशी हाईट्स, कमर्शियल तळमजला, उजव्या बाजूचा भाग, सीटीएस क्रमांक १४१८५ क्रांती चौक ते गुलमंडी रोड, पैठण गेट परिसर, औरंगाबाद-४३१००१**

**शाखेचे नांव: औरंगाबाद-चिखलठाणा जीएल, तालुका - छत्रपती संभाजी नगर.**
**गोल्ड लोन खाते. क्रमांक.:** GL32603120, GL34453504, GL38204703, GL34464660, GL27421201, GL27402230, GL34279671, GL33238556, GL33223202.

**शाखेचे नांव: औरंगाबाद-सिडको गोल्ड लोन, तालुका - छत्रपती संभाजी नगर.**
**गोल्ड लोन खाते. क्रमांक.:** GL34383338, GL34407466, GL34508972, GL34412526, GL34525726, GL34500841, GL34481780, GL34237302, GL34101257, GL34110803, GL34367404, GL34367597, GL34414073, GL34528099, GL34510792, GL39172385, GL34462751, GL34458804.

**शाखेचे नांव: औरंगाबाद - जी8एच स्ट्रॉंग रूम - छत्रपती संभाजी नगर.**
**गोल्ड लोन खाते. क्रमांक:** GL28751480, GL34388788, GL34399701, GL28922127, GL35393117, GL28632391, GL34589851, GL34360710, GL33728505, GL27795495, GL30842959, GL34460717, GL36111761, GL34443300, GL28040133.

**शाखेचे नांव: एमआयडीसी वाळूज औरंगाबाद, तालुका - गंगापूर**
**गोल्ड लोन खाते. क्रमांक.:** GL32264657, GL33402096, GL33429316, GL34084881, GL34057516, GL34470524, GL34479930, GL34479445, GL34468668, GL34417920.

**शाखेचे नांव: औरंगाबाद -पैठण गेट रोड, तालुका - छत्रपती संभाजी नगर.**
**गोल्ड लोन खाते. क्रमांक.:** GL34504187, GL34113434, GL34092233, GL33832939, GL33859883, GL34491180, GL34311360, GL25839738, GL34156405.

**शाखेचे नांव: औरंगाबाद-शिवाजीनगर, तालुका - छत्रपती संभाजी नगर.**
**गोल्ड लोन खाते. क्रमांक.:** GL27422879, GL27411315.

**शाखेचे नांव: विवेकानंद-नगर औरंगाबाद, तालुका - छत्रपती संभाजी नगर.**
**गोल्ड लोन खाते. क्रमांक.:** GL34529730, GL34499459, GL34499942, GL34506599, GL34485268, GL34070769, GL32333703, GL32339641, GL33186224, GL34514439, GL34527891, GL34258253.

**शाखेचे नांव: वैजापूर - स्टेशन रोड जी एल, तालुका - वैजापूर**
**गोल्ड लोन खाते. क्रमांक:** GL34549908.

ई-लिलाव हा ''जिथे आहे तसे'', ''जसे आहे तसे'' आणि ''जेवढे आहे तेवढे'' या तत्वावर केला जाईल आणि आयआयएफएल द्वारे कोणत्याही प्रकारे सोन्याच्या दागिन्यांची गुणवत्ता, शुद्धता, कॅरेट, वजन किंवा मूल्यांकनाचे प्रतिनिधीत्वं केले जाणार नाही. ई-लिलाव प्रक्रिया आणि विक्री (झाल्यास) ई-लिलावाकरिता असलेल्या अटी आणि नियम या संपूर्णपणे आयआयएफएलच्या अनुसार किंवा लागू करतांना त्यांना अनुरूप वाटतील त्या पद्धतीच्या असतील. आयआयएफएल स्वत:हून, लिलाव पुढे ढकलू किंवा रद्द करू शकेल, लिलावाच्या यादी मधून एखाद्या खात्याचे नाव वगळण्याचा अधिकार देखील आयआयएफएल कडेच असेल आणि हे करताना त्याकरिताची पुर्व सूचना, करण्यामागची कारणे, एखाद्या बोलीचा स्वीकार किंवा रद्दीकरण केल्याची कारणे देण्याची कोणतीही आवश्यकता नसेल. थकबाकी असलेल्या ऋणकोंची यादी, त्यांनी जमा केलेले दागिने आणि इतर तपशील हा संबंधित शाखांमध्ये दिलेला असेल. अयशस्वी कर्जदारांकडे हा पर्याय आहे की त्यांनी अद्ययावत व्याज आणि सर्व लागू शुल्कांसह संपूर्ण थकबाकीची परतफेड करावी जेणेकरुन ही नोटीस प्रकाशित झाल्यानंतरही त्यांचे कर्ज खाते बंद करण्याचा किंवा नियमित करण्याचा पर्याय असतो परंतु कोणत्याही परिस्थितीत लिलावाच्या तारखेपर्यंतच हे शक्य आहे, यात ते अयशस्वी झाल्यास सोन्याचे दागिने विकले जातील आणि थकबाकी (असल्यास) व्याज आणि खर्चासह वसूल केली जाईल. ही सूचना छापून आल्यानंतर जर एखाद्या ऋणकोने आपल्या कर्जाचा व्यवहार पूर्ण केला किंवा आपली थकबाकी भरून कर्ज खाते बंद केले, तर त्याला या सूचनेच्या छपाईचा संपूर्ण खर्च मात्र उचलावा लागेल. ऋणकोंना आपल्या बँक खात्यांचा तपशील शाखेकडे जमा/अद्ययावत करण्याची विनंती केली जाते आहे जेणेकरून लिलाव प्रक्रियेमधून निघालेला परतावा असल्यास तो जमा करता येऊ शकेल.

**तपशीलवार माहिती, अटी आणि नियम जाणून घेण्याकरिता कृपया आयआयएफएल फायनान्स लिमिटेडच्या नजिकच्या शाखेशी संपर्क साधा.**

**तारीख : 11.09.2025**
**स्थळ: छत्रपती संभाजी नगर**

**स्वाक्षरीकर्ता/-**
**अधिकृत स्वाक्षरीकर्ता**
**आयआयएफएल फायनान्स लिमिटेड**

## अग्रलेख...

# राष्ट्रीयत्वाच्या जाणिवांचा विजय

कोणत्याही निवडणुकीच्या निकालाचे दोन प्रकार असतात. प्रत्यक्ष मतदानानंतर मतमोजणी होऊन कोणताही एक उमेदवार विजयी होतो आणि अन्य प्रतिस्पर्धी उमेदवार साहजिकच पराभूतांच्या मालिकेत जाऊन बसतात. अशा पराभवातही विजय मिळाल्याचे समाधान मानण्याची एक सकारात्मक मानसिकता अलिकडे विरोधकांमध्ये विकसित झाली आहे, ही लोकशाहीच्या दृष्टीने चांगली गोष्ट म्हणावी लागेल. उपराष्ट्रपती जगदीप धनकड यांनी प्रकृती अस्वास्थ्याच्या कारणावरून राजीनामा दिल्याने रिक्त झालेल्या देशाच्या १७ व्या उपराष्ट्रपतिपदासाठी सोमवारी पार पडलेल्या निवडणुकीच्या मतदानाची वेळ संपण्याआधीच काँग्रेस नेत्या रेणुका चौधरी यांनी इंडिया आघाडीच्या उमेदवाराचा पराभव मान्य करून स्वीकारला होता. त्या पराभवातही त्यांनी नैतिक विजयाचा मुलामा दिला, तेव्हा साहजिकच सारे लोकशाहीवादी सुखावले असतील. उपराष्ट्रपतिपदाच्या निवडणुकीत इंडिया आघाडीच्या उमेदवाराचा पराभव होणार, याची आम्हाला जाणीव होतीच. तशी ती सर्वांनाच होती. पण आमचा उमेदवार चांगला असल्यामुळे नैतिकदृष्ट्या आमच्या उमेदवाराचा विजयच झाला आहे आणि आम्ही एकजुटीने त्यांना मतदान करणार आहोत. विजय किंवा पराजय ही वेगळी गोष्ट आहे. निवडणुकीत कोणीतरी एक विजयी होतो आणि अन्यांस पराभव पत्करावा लागतो. पण आमच्या अतिशय चांगल्या उमेदवाराचा पराभव होऊनही नैतिकदृष्ट्या विजय झाला आहे, असे रेणुका चौधरी यांनी अगोदरच जाहीर करून टाकले होते. इंडिया आघाडीमध्ये या निवडणुकीत फूट पडलेली नाही; सर्व घटक पक्षांनी एकजुटीने मतदान केल्यामुळे मतांची फाटाफूट होणार नाही, यावर त्यांचा विश्वास होता. किंबहुना एवढाच त्यांच्या विश्वासाचा गाभा होता. प्रत्यक्षात तो विश्वास किती सार्थ ठरला हे दिसलेच.

ही निवडणूक इंडिया आघाडीच्या दृष्टीने प्रतिष्ठेची होतीच. कारण सर्वोच्च न्यायालयाचे न्यायमूर्तिपद भूषविलेले आंध्र प्रदेशातील बी. सुदर्शन रेड्डी यांना भाजपाच्या नेतृत्वाखालील राष्ट्रीय लोकशाही आघाडीचे उमेदवार सी. पी. राधाकृष्णन यांच्यासमोर उभे करून इंडिया आघाडीने भारताच्या दक्षिण प्रांतांतील अस्मितेचा मुद्दा पणाला लावला होता. रालोआने मात्र या निवडणुकीत व्यक्तिगत किंवा प्रादेशिक अस्मितेचा मुद्दा महत्त्वाचा न मानता, नेता, नियत आणि नेतृत्व यांच्या निकषावर निवडणूक लढविण्याचा निर्णय घेतला. वयाच्या जेमतेम १६ व्या वर्षापासून राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या संस्काराच्या मुशीत घडलेले आणि आपल्या निरपेक्ष सामाजिक कार्यातून तामिळनाडूसारख्या राज्यातील ओबीसी समाजाचे प्रतिनिधित्व करणारे सी. पी. राधाकृष्णन यांना उमेदवारी दिली. कदाचित यामुळेच ही निवडणूक राजकीयदृष्ट्या महत्त्वाची ठरली होती. संसदेत राज्यसभेचे २४५ आणि लोकसभेचे ५४३ सदस्य असे एकूण ७८८ सदस्य आहेत. यापैकी काही जागा रिक्त आहेत तर काही पक्षांनी मतदानापासून तटस्थ राहण्याचा निर्णय घेतला आहे. तरीही सत्ताधारी रालोआचे उभय सभागृहांत बहुमत असल्याने, भाजपप्रणीत रालोआचे उमेदवार राधाकृष्णन यांचा विजय होणार, ही संसदेच्या उभय सभागृहांतील संख्याबळाने आखून ठेवलेली काळ्या दगडावरची रेषा होती. त्यामुळे विजयाची घोषणा होणे ही तर केवळ औपचारिकता होती. अपेक्षेप्रमाणे ती औपचारिकता पार पडली आणि भारताचे १७ वे उपराष्ट्रपती म्हणून महाराष्ट्राचे राज्यपालपद भूषविणारे सी. पी. राधाकृष्णन यांची निवड झाली. या निवडणुकीत बहुमताचा आकडा ३७७ मतांचा होता. राधाकृष्णन यांना बहुमताच्या गरजेपेक्षा दीडशे मते अधिक मिळाली. मतांमधील हा फरक पुरेसा स्पष्ट आहे. निवडणूक कोणत्या दिशेने गेली हेही त्यातून स्पष्ट होणारे आहे. महाराष्ट्राच्या राज्यपालपदी असताना, देशाच्या द्वितीय नागरिकाचा बहुमान सी. पी. राधाकृष्णन यांना प्राप्त झाला असून ज्ञान, चारित्र्य आणि एकता यांचा संगम असलेल्या संघटनांच्या संस्कारांचा विजय झाल्यामुळे राधाकृष्णन यांच्या विजयाचा आनंद महाराष्ट्रात दाटून येणे साहजिकच आहे. म्हणूनच, 'तरुण भारत' परिवाराच्या वतीनेही त्या आनंदात सहभागी होताना, त्यांच्या अभिनंदनाची संधीदेखील आम्ही घेत आहोत आणि त्यांना उज्ज्वल कारकीर्दीसाठी शुभेच्छाही देत आहोत. हा विजय केवळ रालोआच्या उमेदवाराचा विजय नाही आणि ही केवळ एका पदासाठी झालेली निवडणूक नाही. ही दोन विचारधारांची कसोटी होती. राधाकृष्णन यांचा विजय हा भारताच्या राष्ट्रीयत्वाच्या जाणिवांचा विजय आहे. आपण सारेजण भारतीय म्हणून एक आहोत व एक राहणार आहोत या भावनेचा हा विजय आहे, ही त्यांची भावना योग्य ठरते. विकसित भारत हा आपला संकल्प आहे व त्या दिशेने वाटचाल करण्याकरिता या निवडणुकीमुळे आम्हाला बळ मिळाले आहे, ही संतुलित प्रतिक्रिया निकालापूर्वीच्या विजयाच्या विश्वासातून व्यक्त करतानाच, राधाकृष्णन यांनी त्यांच्या विजयाच्या संकेतांना राजकारणाचा स्पर्शदेखील होऊ दिला नाही, ही बाब लक्षणीय ठरते. देशातील लोकशाहीच्या दृष्टीने सर्वांत महत्त्वाची व देशभरातील मतदारांचे प्रतिनिधित्व करणाऱ्या संसद सदस्यांच्या जाणिवेची कसोटी घेणाऱ्या या निवडणुकीच्या तोंडावर लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांचे अस्तित्व फारसे कुठे जाणवले नाही.

विरोधी पक्षनेते म्हणून इंडिया आघाडीची निवडणूक रणनीती आखण्यासाठी त्यांनी पुढाकार घेतला की काय, असा विचार करून या आघाडीतील अनेक जण आधीच अस्वस्थ झाले होते. कदाचित आपल्या उमेदवाराचा पराभव निश्चित आहे, याची खात्री असल्यामुळे रणनीती आखण्याच्या आव्हानापासून राहुल गांधी यांनीच स्वतःला जाणीवपूर्वक दूर ठेवले असावे. कदाचित आजवरच्या प्रत्येक पराभवाचे खापर त्यांच्याच माथी फोडले जात असल्याने व या निवडणुकीतील पराभवानंतरही तसेच होण्याची शक्यता अधिक असल्याने त्यांच्या पक्षानेच त्यांना या रणनीतीच्या आखणीपासून दूर राखण्याचे ठरविले असावे. काही तरी घडले असेल. असो...

स्वातंत्र्यानंतर १९५२ साली झालेल्या उपराष्ट्रपतिपदाच्या निवडणुकीत ७१५ संसद सदस्यांची मतदार म्हणून नोंद होती. त्या निवडणुकीत डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन हे अविरोध विजयी झाले होते. आज १७ व्या उपराष्ट्रपतिपदासाठी झालेल्या निवडणुकीत राधाकृष्णन यांच्या विजयामुळे १७ निवडणुकांची एक परिक्रमा पूर्ण झाली आहे. १९५२ नंतर १९५७ साली झालेल्या उपराष्ट्रपतिपदाच्या निवडणुकीतही पुन्हा डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांचाच बिनविरोध विजय झाला होता. आजच्या निवडणुकीतील सी. पी. राधाकृष्णन यांच्या विजयाच्या पृष्ठभूमीवर, देशाच्या पहिल्या व दुसऱ्या उपराष्ट्रपती निवडणुकीच्या इतिहासाचे संदर्भ सहज साहजिक ठरतात. याच डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांनी देशाचे राष्ट्रपतिपदही भूषविले, हा या संदर्भाच्या आणखी एका पैलूचीदेखील या निवडणुकीच्या निमित्ताने चर्चा होणारच आहे. २००२ मध्ये भारतीय जनता पार्टीचे ज्येष्ठ नेते भैरोसिंह शेखावत यांनी काँग्रेसचे सुशीलकुमार शिंदे यांचा पराभव करून या निवडणुकीत विजय मिळविला आणि भाजपाला पहिल्यांदा या पदाचा बहुमान प्राप्त झाला. २०१७ मध्ये एम. व्यंकय्या नायडू यांच्या रूपाने भारताच्या दक्षिणी राज्यांतील नेत्यास या पदाचा मान मिळाला आणि आता सी. पी. राधाकृष्णन यांच्या विजयाने पुन्हा एकदा भाजपाने भारताच्या दक्षिण प्रांतातील नेतृत्वावर या पदाची जबाबदारी सोपविली आहे. एक प्रकारे प्रांतीय अस्मिता जागी करू पाहणाऱ्या इंडिया आघाडीच्या नेत्यांना या निकालाच्या माध्यमातून राष्ट्रीय विवेकाने प्रत्युत्तर दिले आहे. लोकप्रतिनिधी आणि राज्यपाल म्हणून कर्तव्य बजावत असताना गाठीशी बांधलेला नेतृत्वाचा, प्रशासनाचा प्रदीर्घ अनुभव आणि राष्ट्रीयत्वाच्या संस्कारांची भक्कम शिदोरी सोबत घेऊन आता सी. पी. राधाकृष्णन हे आपल्या नव्या पदाची सूत्रे स्वीकारणार आहेत. एक सुसंस्कृत व्यक्तिमत्त्व अशी त्यांची ओळख आहे. उपराष्ट्रपतिपदावरील व्यक्ती ही संसदेच्या ज्येष्ठांच्या सभागृहाचे संचालन करत असते. हे सभागृह संसदेच्या एकूण कामकाजाच्या दृष्टीनेही महत्त्वाचे असते. या सभागृहात देशाच्या हिताचे आणि राष्ट्रीय जबाबदाऱ्यांबाबतच्या जनतेच्या अपेक्षांचे प्रतिबिंब उमटलेले असते. नवे उपराष्ट्रपती या नात्याने सी. पी. राधाकृष्ण या अपेक्षांना पुरेपूर न्याय देतील व देशाचा अमृतकाळ अधिक उजळेल, यात शंका नाही. त्या उजळ कारकीर्दीसाठी त्यांना पुन्हा एकदा शुभेच्छा!

## प्रासंगिक

# ड्रॅगनपूरक भूमिका अंगाशी

आरिफ शेख

सरकारने फेसबुक, इंस्टाग्राम आणि एक्ससह २६ 'सोशल मीडिया प्लॅटफॉर्म्स'वर बंदी घातल्यावरून नेपाळमध्ये अलिकडेच मोठा गदारोळ झाला आणि तरुण संतप्त झाले. संतप्त तरुणांनी थेट संसद, पंतप्रधानांच्या निवासस्थानावर हल्ले केले. या आंदोलकांनी आपल्या आंदोलनाला 'जेन झी'चे आंदोलन म्हणून संबोधले होते. नेपाळ सरकारच्या निर्णयामागे चीनसंबंधी भूमिका कारणीभूत असल्याचे दिसते. नेपाळमध्ये टिकटॉक, वीटॉक, व्हायबर आणि निबांज यांसारखे प्लॅटफॉर्म्स आतापर्यंत रजिस्टर झाले आहेत. टेलिग्राम आणि 'ग्लोबल डायरी' हे प्लॅटफॉर्म्स नोंदणीच्या प्रक्रियेत आहेत; पण 'मेटा'चे फेसबुक, इंस्टाग्राम, व्हॉट्सॲप, अल्फाबेट, युट्यूब, एक्स, रेडिट किंवा लिंक्डइन यासारख्या मोठ्या प्लॅटफॉर्म्सनी अजून अर्ज केलेला नाही. या प्लॅटफॉर्म्सना नेपाळच्या माहिती आणि तंत्रज्ञान मंत्रालयात नोंदणी करायची होती. त्यासाठी त्यांना सात दिवसांची मुदत देण्यात आली होती; पण त्यांनी नोंदणी केली नाही. ती मुदत संपल्यानंतर २६ 'सोशल मीडिया' प्लॅटफॉर्मवर देशभरात बंदी घालण्यात आली. आज तरुणवर्ग 'सोशल मीडिया'च्या आहारी गेला आहे. काहींना समाजमाध्यमांच्या वापरातून पैसेही मिळतात. तरुणांचे आवडते संपर्क माध्यम सरकारने बंद केल्याने नाराजी वाढत गेली. व्यक्त व्हायला साधनच राहिले नसल्याने तरुणांचा उद्रेक झाला. त्यातून हे आंदोलन झाले. नेपाळच्या अधिकाऱ्यांच्या म्हणण्यानुसार, प्लॅटफॉर्म्सनी नोंदणी प्रक्रिया पूर्ण केल्यानंतर आणि राष्ट्रीय नियमांचे पालन केल्यानंतर या सेवा पुन्हा सुरू होऊ शकतात. विशेष म्हणजे, परवानगी मिळालेले मीडिया प्लॅटफॉर्म चीनचे आहेत. त्यांच्यामुळे गेला काही काळ नेपाळमध्ये चांगलाच गहजब माजला.

नेपाळचे पंतप्रधान के. पी. ओली चीनधार्जिणे मानले जातात. 'सोशल मीडिया'च्या बंदी घातलेल्या माध्यमांनी सरकारी नियमांची पूर्तता करायला हवी होती. ती न केल्याने सरकारने कारवाईचा बडगा उगारला; परंतु त्याअगोदर आणखी एक नोटीस बजवायला हरकत नव्हती. आंदोलन हाताबाहेर गेल्याने सरकारने बंदी उठवलीच. नोंद न करता बंदी उठवायची होती, तर ती घातलीच कशाला, असा प्रश्न पडतो. 'सोशल मीडिया'वरील बंदीमुळे नेपाळी तरुण भडकल्याचे कारण तात्कालिक आहे. बंदीमुळे आंदोलनाला निमित्त मिळाले; परंतु आंदोलकांच्या घोषणा पाहिल्या, तर बेरोजगारी, भ्रष्टाचार ही आंदोलनाची खरी कारणे आहेत, असे लक्षात येते. त्यात बंदी घातलेले काही ॲप्स हे शिक्षणाशी संबंधित होते. शिक्षण आणि व्यवसायावर परिणाम करणाऱ्या २६ ॲप्सवर सरकारने बंदी घातल्याने तरुणांचा संताप अनावर झाला आणि नेपाळमध्ये रक्तरंजित आंदोलन झाले. नेपाळ सरकारच्या म्हणण्यानुसार या कंपन्या नेपाळमध्ये त्यांचे कार्यालय उघडतील, सरकारकडे नोंदणी करतील, तक्रारी ऐकण्यासाठी लोकांची नियुक्ती करतील आणि अनियमितता रोखण्यासाठी एक प्रणाली तयार करतील तेव्हाच ही बंदी उठवली जाईल. हे म्हणणे योग्य होते; परंतु चिनी कंपन्यांना मोकळीक आणि अन्य कंपन्यांवर कारवाईचा बडगा यामुळे तरुण संतप्त झाले. आंदोलनाला कुणी विचारी नेता नसल्याचा परिणाम हिंसाचारात होतो, हा अनुभव जगभर आहे. तोच आताही आला.



सरकारचे म्हणणे आहे की, टिकटॉक आणि 'व्हायबर'ने सरकारचे पालन केले, म्हणून त्यांच्यावर बंदी घालण्यात आली नाही. या बंदीमुळे फेसबुक किंवा इंस्टाग्रामवरून वस्तू विकणाऱ्यांचा व्यवसाय थांबला. युट्यूब आणि 'गिटहब'सारखे प्लॅटफॉर्म काम करत नसल्याने मुलांचे शिक्षण कठीण झाले. परदेशात राहणाऱ्या लोकांशी बोलणे महाग आणि कठीण झाले. लोकांमध्ये संताप इतका वाढला की, अनेक लोकांनी 'व्हीपीएन' वापरून बंदी तोडण्याचा प्रयत्न केला. सरकारने टिकटॉकवर बंदी घातली नव्हती, म्हणून लोकांनी या प्लॅटफॉर्मवर व्हिडीओ अपलोड करून आंदोलन सुरू केले. त्यावर नेत्यांच्या मुलांचा ऐषोआराम आणि सामान्य लोकांच्या बेरोजगारीची तुलना करण्यात आली. या आंदोलनाला युवा चळवळीचे स्वरूप देण्यासाठी 'जनरल झेड' शाळेच्या गणवेशात सामील झाले. २८ वर्षांवरील लोकांना या निषेधात सामील होण्याची परवानगी नव्हती. त्यांनी 'सोशल मीडिया' सुरू करण्याची, भ्रष्टाचार थांबवण्याची, नोकऱ्या आणि इंटरनेटची सुविधा सुरू करण्याची मागणी केली. सोमवारी पहाटेपासूनच हजारो तरुण काठमांडूच्या रस्त्यावर आले. सकाळपासूनच मैतीघर आणि बानेश्वरमध्ये मोठ्या संख्येने तरुण जमू लागले. निदर्शकांनी 'आझादी चाहिये', 'बन हटाओ', 'भ्रष्टाचार बंद करो' अशा घोषणा दिल्या. या निषेधांचे लाईव्ह व्हिडीओ टिकटॉकवर दाखवले जात होते. त्यामुळे नेपाळमधील तरुण काय मागणी करत आहेत, ते संपूर्ण जगाला पाहता आले. पोलिसांनी अनेक रस्ते बंद केले आणि सुरक्षा वाढवली; परंतु आंदोलन त्यांच्या हाताबाहेर गेले.

काठमांडूचे महापौर बालेन शाह यांनी आंदोलनाचे उघड उघड समर्थन केले. नेपाळमध्ये राजेशाहीचे समर्थन करणारे नेते दुर्गा पारसाईदेखील निषेधात सामील झाले. राष्ट्रीय स्वतंत्र पक्षाने म्हटले की, 'सोशल मीडिया ॲप्स'वर बंदी घालणे ही हुकूमशाही आहे. चळवळ नेपाळमध्ये मोठा बदल घडवू शकते. ही चळवळ केवळ 'सोशल मीडिया'साठी नव्हती. नवीन पिढीला स्वातंत्र्य, प्रामाणिकपणा आणि चांगले भविष्य हवे आहे. नेपाळचे भविष्य आता सरकारच्या निर्णयांवर अवलंबून आहे. नेपाळमधील आंदोलनाचा भारतावर काय परिणाम होईल, हे जाणून घेतले पाहिजे. २०१५ मध्ये नेपाळमध्ये विनाशकारी भूकंप झाला. त्याच वेळी नेपाळच्या नवीन संविधानाची घोषणा झाली. भारतासोबतचा नेपाळचा व्यापार प्रभावित झाला. त्यामुळे नेपाळ आणि चीनचे संबंध वेगाने वाढले.

एप्रिल २०२५ मध्ये एका संसदीय उपसमितीने पोखरा विमानतळाच्या उद्घाटनानंतर काही महिन्यांमध्येच त्याच्या बांधकामात मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार (जवळपास १४ अब्ज नेपाळी रुपये) झाल्याची माहिती दिली. इतर अनेक प्रकल्पांमध्ये पारदर्शकतेचा अभाव असल्याचे आरोप झाले. अशा परिस्थितीत नेपाळमधील आंदोलनाने तिथल्या सरकारच्या अस्तित्वाचा प्रश्न निर्माण केला. नेपाळ अस्थिर होणे भारतासाठी चांगले नाही. चीन आणि पाकिस्तानसारख्या शक्ती तेथे पाय रोवू शकतात. भारत-नेपाळमध्ये १७५१ किलोमीटर लांबीची सीमा आहे. त्यामुळे भारताला दहशतवादी ड्रग्ज आणि बनावट नोटांचा धोका नेहमी राहील. तज्ज्ञांच्या म्हणण्यानुसार नेपाळमधील अशांतता आणि अस्थिरता भारताच्या हिताची नाही. भारत नेहमीच नेपाळमधील सरकारचा निर्णय तेथील लोक आणि राजकारण्यांनी घ्यावा, या मताचा राहिला आहे. भारत आणि नेपाळचे संबंध जुने आहेत. सत्तेत कोण आहे, याने काही फरक पडत नव्हता. मात्र काही वर्षांपासून नेपाळने भारतासोबत काही मुद्द्यांवर वेगळीच भूमिका घेतली आहे. अनेक निर्णय चीनधार्जिणे घेत भारताला अचंबित केले आहे. कोणाचीही सत्ता असली, तरी नेपाळ शांत असावा आणि आपल्यासोबत राहावा याचाच प्रयत्न करणे भारतासाठी आवश्यक आहे. अन्यथा, चीन नेपाळला शक्तिहीन बनवेल आणि त्यावर अप्रत्यक्ष नियंत्रण आणण्याचे प्रयत्न करेल.

## वेध

गिरीश शेरेकर

# गुन्हेगारीत वाढला अल्पवयीनांचा सहभाग

आपल्या देशात १८ वर्षांखालील मुलांना अल्पवयीन समजले जाते. सर्व स्थितीचा अभ्यास करून हा निर्णय घेण्यात आला आहे. पण, अमरावती जिल्ह्यासह विदर्भ व उर्वरित महाराष्ट्रातल्या अलिकडच्या काळातील घटनांचा अभ्यास केल्यावर असे लक्षात येते की, अल्पवयीनांचा गुन्हेगारीत सहभाग वाढला आहे. ठिकठिकाणच्या गुन्हेगारी टोळ्या अल्पवयीनांना आपल्या जाळ्यात ओढून गंभीर गुन्हेगारी कृत्ये करण्यासाठी प्रवृत्त करीत असल्याचे काही घटनांवरून लक्षात आले आहे. अमरावती शहरात गेल्या आठवड्यात लिपिकाचे हत्याकांड घडले. हत्येत ज्यांचा थेट सहभाग होता, अशा पाचपैकी तीन मुले ही अल्पवयीन व दोन मुले प्रत्येकी १९ वर्षांची होती. सुपारी घेऊन त्यांनी हत्याकांड केले. यापूर्वी महिला पोलिसाचे हत्याकांड झाले होते, त्यातही १८ ते ३० वर्षे वयाच्या युवकांचा सहभाग होता. वाहनचोरी, घरफोडी, शस्त्र विक्री, अमली पदार्थ तस्करी अशा अनेक घटनांमध्ये अल्पवयीन आणि १८ ते २५ वर्षे वयाच्या मुलांचा सहभाग आढळतो आहे. अल्पवयीनांना मिळणाऱ्या कायद्याच्या संरक्षणाचा फायदा, गुन्हेगारी टोळ्या घेत आहेत. हा अत्यंत गंभीर प्रकार असून याकडे आता तातडीने लक्ष देण्याची वेळ आली आहे.

देश, राज्य, जिल्हा, तालुका व गाव पातळीवर आजूबाजूला नजर टाकल्यास अविवेकी, शीघ्रकोपी, गुन्हेगारी मानसिकता जोपासलेल्या युवकांच्या टोळ्या प्रामुख्याने पाहायला मिळतात. गेल्या तीन-चार वर्षांत हे प्रमाण कमालीचे वाढले आहे. होत असलेल्या या बदलाचे परिणाम त्या युवकांच्या कुटुंबासाठी जेवढे घातक आहे, तेवढेच ते समाजासाठी चिंतेचे झाले आहे. ही मानसिकता एकाएकी बदललेली नाही. जीवनशैलीच्या बदलत्या स्वरूपातून युवकांमध्ये जशी विलासीवृत्ती वाढली तशीच अतिमहत्त्वाकांक्षा वाढीस लागल्याने चांगले व वाईट यातला फरक समजण्याचे भान त्यांना राहिलेले नाही. त्यांच्यातल्या या परिवर्तनाकडे कुटुंबातील वडिलधाऱ्या मंडळीचेही दुर्लक्ष होत आहे. वयात येणारी आपली मुले दररोज जातात कुठे? त्यांचा मित्र परिवार कोणता? ते घरी जे सांगतात तेच ते प्रत्यक्षात करतात का? त्यांनी सांगितलेली प्रत्येक गोष्ट ही सत्य की असत्य? या सर्व प्रश्नांची उत्तरे बहुतांश पालक आपल्या पाल्यांकडून घेत नसल्याने त्यांच्यावर वचक राहिलेला नाही. अशा युवकांना सापळ्यात अडकविण्याचे प्रयत्न गुन्हेगारी टोळी चालविणाऱ्यांकडून होताना दिसतात. अमरावती जिल्ह्यात गेल्या तीन-चार महिन्यांत हत्या, दुचाकी चोरी, घरफोडी, अमली पदार्थ तस्करी अशा अनेक गुन्हेगारी घटना घडल्या. त्यात अल्पवयीन व उपरोक्त वयोगटातल्या युवकांचा सहभाग प्रामुख्याने होता. विदर्भाच्या अन्य जिल्ह्यांत, राज्यातल्या वेगवेगळ्या जिल्ह्यांमध्ये अशा घटना घडत आहेत.



दुसरीकडे मुलींवरच्या अत्याचाराच्या घटना सातत्याने होताना दिसतात. एक विकृत मानसिकता जोपासून मुलींचे लैंगिक शोषण होताना दिसते. दररोज कुठे ना कुठे अशा घटना उजेडात येत आहेत. विशेष म्हणजे मुलीच अशा सापळ्यात अडकतात असे नाही तर मुलेही त्यात अडकली आहेत. अशा घटनांमधील काही मुला-मुलींनी आपले जीवनही संपवून टाकले आहे. समाजात घडणाऱ्या या मन हेलावणाऱ्या घटनांमधून बोध घेण्याची कोणाची तयारी आहे, असे दिसत नाही. कारण, घटनांची संख्या कमी होण्याऐवजी वाढतानाच दिसत आहे. उथळपणे वागणे, बोलणे व वेशभूषा करण्याची जणू स्पर्धाच लागली आहे. बाजूचा करतो म्हणून आपणही केले पाहिजे, या मानसिकतेतून ही स्पर्धा आता वेगळ्या वळणावर आली आहे. भूलथापा देऊन फसवणूक करण्याच्या ज्या घटना समोर येतात, त्या आरोपींच्या यादीतही युवकांचा सहभाग मोठ्या प्रमाणात दिसतो आहे. शॉर्टकट मार्गाने यश मिळविण्याचा जडलेला हव्यास त्यासाठी कारणीभूत आहे. मग त्यासाठी वाट्टेल त्या मार्गाने जाण्याची मानसिकता युवकांमध्ये दिवसेंदिवस प्रबळ होत आहे. त्याचे दुष्परिणाम आपल्याला पदोपदी पाहायला मिळत आहेत. मध्यवर्गीय युवकांपेक्षा श्रीमंत आणि गरीब कुटुंबातील मुलांचा सहभाग त्यात जास्त आहे. विवाहबद्ध झालेले तरुण-तरुणीसुद्धा अविवेकी निर्णय घेताना दिसतात. आभासी जगतातून ही मनोवृत्ती फोफावली असून त्याला कुटुंबातले सदस्य नकळत खतपाणी घालतात. युवा पिढी भारताचे भविष्य आहे. ती जर अशीच हाताबाहेर गेली तर अनेक समस्या तयार होतील. काळाची पावले ओळखून पालकांनी आपल्या पाल्यांच्या मानसिकतेचा वेळोवेळी अभ्यास करण्याची गरज आहे. शिथिल झालेली पकड घट्ट करून पाल्यांच्या प्रत्येक घडामोडीकडे लक्ष ठेवत वेळातला वेळ काढून त्यांच्याशी संवाद साधायला हवा. त्यातच त्यांचे व समाजाचे हित आहे.

९४२०७२१२२५

## धर्म-संस्कृती

# श्रीगीता - अक्षरब्रह्म योग!

प्रा. दिलीप जोशी

श्रीमद्भगवद्गीतेचा आठवा अध्याय अक्षरब्रह्मयोग नावाने ओळखला जातो. अक्षरब्रह्म म्हणजे मूळाक्षरासी संबंध असावा असे वाटू शकते. पण तसे नाही. इथे अक्षर म्हणजे अविनाशी, जन्म-मृत्यूच्या पलीकडला, भूत-भविष्य-वर्तमान तिन्ही काळात ज्याचे स्वरूप स्थिर आहे, जो नित्य आहे, शाश्वत आहे, देशकाळ परत्वे मर्यादित नाही त्याला अक्षर म्हणतात.

जो उत्पत्ती, स्थिती आणि लयाच्या पल्याड असलेला, गुणत्रयातीत, अवस्थात्रयातीत, देहत्रयातीत, कालत्रयातीत आणि अविनाशी, अव्यक्त त्याला अक्षर म्हणतात. निर्गुण, निराकार, निर्विशेष तो अक्षर.

''न क्षरति इति अक्षरम्'' ज्याचा क्षय होत नाही. असा अक्षर फक्त परब्रह्म परमात्मा आहेत. सातव्या अध्यायात ज्ञान-विज्ञान योग सांगताना अंतकाळी वर्तमान देहाचा त्याग करून विदेह कैवल्य प्राप्तीचा मार्ग सांगितला.

त्यावर अर्जुनाला एकूण सात प्रश्न आणि शंका निर्माण झाल्या. त्या त्याने या अध्यायात पहिल्याच श्लोकात विचारल्या.

**किं तद्ब्रह्म किमध्यात्मं किं कर्म पुरुषोत्तम ।**
**अधिभूतं च किं प्रोक्तमधिदैवं किमुच्यते ॥**

ब्रह्म काय आहे? अध्यात्म काय आहे? कर्म काय आहे? अधिभूत आणि अधिदैव कशाला म्हणतात ?

**अधियज्ञः कथं कोऽत्र देहेऽस्मिन्मधुसूदन ।**
**प्रयाणकाले च कथं ज्ञेयोऽसि नियतात्मभिः ॥**

अधियज्ञ कोण आहे? तो या देहात कोणत्या रूपात आहे? अंतकाळी तुझे स्मरण कसे होते? अशा एकूण सात शंका अर्जुन भगवंताला विचारतात.

त्या अनुषंगाने भगवान अक्षर ब्रह्माबाबत त्याला सांगतात.

**अक्षरं ब्रह्म परमं स्वभावोऽध्यात्ममुच्यते ।**
**भूतभावोद्भवकरो विसर्गः कर्मसंज्ञितः ॥**

१) जे अविनाशी आहे तेच ब्रह्म आहे. त्याला आत्मा असेही म्हणतात.

२) या आत्म्याच्या स्थिर भावाला म्हणजे जिवाच्या स्वरूपाला अध्यात्म म्हणतात.

३) या जीवात निर्माण होणारे बरे-वाईट विषय ज्यायोगे निर्माण होतात त्याला कर्म म्हणतात.

**अधिभूतं क्षरो भावः पुरुषश्चाधिदैवतम् ।**
**अधियज्ञोऽहमेवात्र देहे देहभृतां वर ॥**

४) हे अर्जुना, माझी अपरा प्रकृती म्हणजे ज्याची उत्पत्ती होते आणि जे विनाशी आहे त्यांना अधिभूत म्हणतात.

५) माझे विराट स्वरूप ज्यात सूर्य चंद्रादी सर्व सृष्टी स्थित आहे त्याला अधिदैव म्हणतात.

६) मीच सर्व शरीरधारी जीवांच्या देहात निवास करणारा अधियज्ञ आहे.

**अंतकाले च मामेव स्मरन्मुक्त्वा कलेवरम् ।**
**यः प्रयाति स मद्भावं याति नास्त्यत्र संशयः ॥**

७) अंतकाळी जो माझे स्मरण करीत करीत देह रिता करतो तो माझ्याच स्वरूपाला प्राप्त होतो.

आपण सामान्य लोकांनी काय बोध घ्यावा?

तर जन्मभर भगवंताचे स्मरण केले तरच अंतकाळी त्याचे स्मरण होते अन्यथा नाही. त्याचा अभ्यास आयुष्यभर करावा. म्हणून अर्जुना, माझ्यामध्येच मन आणि बुद्धी अर्पित करून नित्य निरंतर स्मरण कर!

हे युद्धही तुला ईश्वरीय वाटेल. हा अक्षरयोग भगवंत संक्षेपाने यौगिक पद्धतीने सांगतात.

**ओमित्येकाक्षरं ब्रह्म व्याहरन्मामनुस्मरन् ।**
**यः प्रयाति त्यजन्देहं स याति परमां गतिम् ॥**

या योगात योगी शरीर त्याग करताना इंद्रिय संयमित करतो, हृदयात अवरोध आणि प्राण मस्तकात ठेवून ओंकार या एकाक्षर ब्रह्माचा उच्चार करतो .तो परमगतीला प्राप्त होतो. मग त्यांचा पुनर्जन्म नाही.

पुढे भगवान कालगणना सांगून सद्गती स्पष्ट केली.

**सहस्रयुगपर्यन्तमहर्यद्ब्रह्मणो विदुः ।**
**रात्रिं युगसहस्रान्तां तेऽहोरात्रविदो जनाः ॥**

ब्रह्मदेवाचा एक दिवस म्हणजे आपली एक हजार युगे आहेत. रात्र देखील तितक्याच कालावधीची आहे. ब्रह्मदेवाचा दिवस सुरू झाला सर्व भूतमात्र ब्रह्मदेवाच्या अव्यक्त अवस्थेमधून उत्पन्न होतात. रात्र सुरू झाली लय पावतात. कारण चराचर सृष्टी प्रकृतीच्या अधीन आहे. त्यामुळे ब्रह्मदेवाच्या दिवसाला जन्म आणि रात्रीला लय पावतात. ही ब्रह्मदेव निर्मित चराचर सृष्टी आहे.

या सृष्टीच्याही पलीकडे परब्रह्म परमात्म्याने अजून एक अविनाशी तत्त्व निर्माण केले त्याला सनातन म्हणतात. ब्रह्मदेवाने निर्मित सृष्टीतील सर्वांचा सर्वनाश झाला तरी हे सनातन कायम आहे. त्यालाच अक्षर म्हटले आहे. आपल्या दृष्टीने ही परम गती किंवा मोक्ष आहे. तिथे पोचलो तर पुन्हा संसारात वापस येणे नाही.

त्यासाठी त्या सनातन परम् तत्त्वावर अनन्य भाव ठेवावा लागेल असे भगवंत सांगतात. भगवंत त्यासाठी मरणानंतर सद्गतीसाठीचा मार्ग आणि काळवेळ सांगतात. सोबतच जीव पुन्हा जन्माला का येतो? आणि त्याचीही अवेळ सांगतात.

**अग्निर्ज्योतिरहः शुक्लःषण्मासा उत्तरायणम् ।**
**तत्र प्रयाता गच्छन्ति ब्रह्म ब्रह्मविदो जनाः ॥**

१) ज्यावेळी सूर्यज्योति, अग्नी, दिवस, शुक्लपक्ष आणि उत्तरायणाचे सहा महिने असतात त्यावेळी मृत्यू पावलेले ब्रह्मलोकात जातात.

**धूमो रात्रिस्तथा कृष्ण षण्मासा दक्षिणायनम् ।**
**तत्र चान्द्रमसं ज्योतिर्योगी प्राप्य निवर्तते ॥**

२) ज्यावेळी धूम, अंधार, कृष्णपक्ष आणि दक्षिणायन असेल याकाळात मृत्यू पावलेले पुन्हा जन्माला येतात.

यांना शुक्लमार्ग आणि कृष्णमार्ग म्हणतात. शास्त्रात याला देवयान आणि पितृयान म्हणतात.

**वेदेषु यज्ञेषु तपः सु चैव दानेषु यत्पुण्यफलं प्रदिष्टम् ।**
**अत्येत तत्सर्वमिदं विदित्वा योगी परं स्थानमुपैति चाद्यम् ॥**

वेदअध्ययन, योगयागादी, जपतप, दान या सर्वांना जाणून घेतल्यावर लक्षात येते की सर्व मार्ग संसारजन्यच आहेत. ते आपल्याला संसारातच ठेवतात.

त्यामुळे त्यापुढे गेल्याने म्हणजे योगयुक्त होऊन चित्तशुद्धी करावी.

म्हणजे आपल्याला सनातन पद प्राप्त होते. असे पद म्हणजे अक्षरब्रह्म योग आहे.

९८२२२६२७३५

## नाते दृढ करण्याची गरज

अलिकडेच हनिमूनसाठी इंदूरपासून २२०० किलोमीटर अंतरावरील मेघालय येथे गेलेल्या राजा रघुवंशी याची हत्या झाली होती. या खळबळजनक घटनेमुळे तेथील पोलिस यंत्रणा टीकेचा सामना करत असताना धक्कादायक वळण या प्रकरणाला मिळाले. राजाची पत्नी सोनम हीच या हत्या प्रकरणाची सूत्रधार असल्याचा आरोप आहे. गेल्या मे महिन्यात राजा आणि सोनम यांचे लग्न झाले. त्याच्या साधारण पंधरा दिवस अगोदर त्यांचे लग्न ठरले होते. या मधल्या काळातच सोनमने हत्येची योजना आखली व यात तिच्या कथित प्रियकराला सहभागी करून घेतले. ही घटना खळबळजनक आहे. मात्र पहिलीच नाही. या विचित्र घटनेमुळे समाजमन सुन्न झाले. एकमेकांच्या पवित्र संबंधात विश्वासाचा अभाव आणि कृतघ्नतेचा कळस गाठणारी विकृती दर्शवणाऱ्या या घटना समाज माध्यमांवर विनोदी स्वरूपात सादर केल्या जात आहेत.

अरेंज मॅरेज केले तरी पुरुषाचा पत्नीकडून घात होतो आणि प्रेमविवाह केला तरी घातच होतो, असे त्यातून सूचित करायचे आहे. कशाचा विनोद करायचा हा ज्याच्या त्याच्या स्वभावाचा भाग असतो. तथापि या सर्व प्रकरणातून एक बाब मात्र निश्चित झाली आहे की समाजात विश्वास आणि संबंधातील सामंजस्याला एवढा मोठा तडा गेला आहे की हे पतन पाहून हादरायला होते. हत्यांच्या या घटनांमुळे आणखी एका नव्या चर्चेलाही सुरुवात झाली आहे. या चर्चेचा प्रवास काही जणांनी अनेक शतके मागेपर्यंत नेला आहे. त्यांचे म्हणणे असे आहे की महिलांना जेव्हा चूल आणि मूल एवढेच मर्यादित ठेवले होते, तोपर्यंत बरे होते. त्यांना कथित स्वातंत्र्य दिल्यामुळेच आज असले गुन्हे होऊ लागले आहेत. महिलांची कार्यालय अथवा अन्यत्र प्रेमप्रकरणे, त्याकरिता पतीचीच फसवणूक आणि या प्रकारात मुलांचा अडसर होत असल्यामुळे आपल्याच मुलांची हत्या करणे आदी प्रकारही महिला करत आहेत. हे त्यांना मोकळे सोडल्यामुळे झाल्याचा दावा त्या चर्चांमधील काहीजण करत आहेत. अर्थात हा चुकीचा आणि उलट दिशेने जाणारा प्रवास आहे. जर तुम्ही दोन-चार घटनांवरून काळीच बाजू पाहण्याचा आणि मांडण्याचा प्रयत्न केला तर त्याचे समर्थन करता येत नाही.

एखाद्याला अथवा एखादीला संपवण्याचा विचार हा अविचार असतोच यात काही शंका नाही. मात्र त्या निर्णयाप्रत कोणी अचानक येत असतो. त्यामागे एक विचारचक्र अगोदरपासूनच सक्रिय झालेले असते. या सगळ्यावर विश्वासाचे नाते दृढ करणे आणि संयमाने प्रत्येक गोष्टीचा सामना करणे हाच उपाय असू शकतो.

**प्रा. मधुकर चुटे**/९४२०५६६४०४

## वाचक पत्रे

## महाअवतार नरसिंह

सध्या बहुचर्चित असलेला चित्रपट 'महाअवतार नरसिंह' हा अश्विन कुमार यांनी दिग्दर्शित केलेला एक भारतीय ॲनिमेटेड चित्रपट आहे. यात भगवान विष्णूच्या नरसिंह अवताराची कथा आहे. या चित्रपटाने कमी कालावधीत फार मोठे व्यावसायिक यश मिळवले आहे. या चित्रपटाने २०२५ मधील सर्वाधिक कमाई करण्याचा टॉप १० चित्रपटांमध्ये स्थान मिळवले आहे. ही भारतीय सिनेमासाठी आशादायक घटना आहे. हा भारतीय पौराणिक चित्रपट बघण्यासाठी प्रेक्षकांनी चित्रपटगृहात प्रचंड गर्दी केली आहे. आपल्या देशात पौराणिक कथांचा खजिना आहे. लहानपणी बहुतेकांनी भक्त प्रल्हादची गोष्ट ऐकली असेल. यात चराचरात देव पाहणाऱ्या भक्त प्रल्हाद आणि स्वतःला देव मानणाऱ्या असुर हिरण्यकश्यपूची ही कथा ॲनिमेशनच्या अनोख्या शैलीत मांडली आहे. या सिनेमात वराह आणि नरसिंह या कथांचा संगम आहे. यात प्रल्हादची भक्ती आणि हिंसेलाच सर्वस्व मानणारा हिरण्यकश्यपू यांच्यातील संघर्ष प्रेक्षकांना एका वेगळ्याच जगात घेऊन जातो. त्यामुळे प्रेक्षक यात रमून जातो. ही कथा थ्री डी असल्यामुळे वेगळा चष्मा लावून बघण्यात वेगळा आनंद अनुभवता येतो.

**स्नेहल प्रकाश खंडागळे**/नागपूर

## अनंत चतुर्दशीचे महत्त्व


घरोघरी गणेशाची वाजतगाजत स्थापना, मग सकाळ आणि संध्याकाळ साग्रसंगीत आरती, जोरात करपुरारती मग ''गणपतीबाप्पा मोरया''चा गजर आणि रोज वेगवेगळा प्रसाद. दहा दिवस रोज, यावेळेस तर अकरा दिवस. सार्वजनिक मंडळांत तर अजूनच धमाल, संदल, रोषणाई, मोठा मंडप, कार्यक्रमाची रेलचेल, मस्त मनोरंजन तेही दहा दिवस. मग येते अनंत चतुर्दशी. काय शिकवते अनंत चतुर्दशी? आपले हे पार्थिव असेच एक दिवस विसर्जित होणार ते आनंदाने करा, मोह, माया सोडा आणि पुढच्या वर्षी लवकर या अशी प्रार्थना करायची. पुनर्जन्म तो हाच असावा. ज्याक्षणी या शरीरात अडकणं संपेल तो क्षणच अनंत - चतुर्दशी! जेव्हा अहम् आणि त्वम् एकजीव होतील तीच अनंत चतुर्दशी! पाहुणा आहे इथे प्रत्येक जण बाप्पासारखा काही दिवसांचा, कोणी दीड, कोणी पाच तर कोणी दहा दिवसांचा... थोडा वेळ आहोत इथे तर थोडे जगून घेऊया.

जातील निघून सारेच कधी ना कधी अनंताच्या प्रवासाला ना चुकेल हा फेरा जन्माला आलेल्या कोणाला... बाप्पासारखं नाचत यायचे आणि लळा लावून जायचे. दहा दिवसांचे पाहुणे आपण असे समजून जगायचे... हे जगणे म्हणजे एक उत्सव करायचा आणि आनंदाने विसर्जित करायचा.

**रवी वाघमारे**/नागपूर

वाचक पत्रे पाठविण्यासाठी ईमेल ॲड्रेस
tbedit2016@gmail.com
तसेच **कुठलाही लेख** पाठवायचा असल्यास ९८५०७५३२८१ या व्हॉट्स ॲप क्रमांकावर पाठवावा.

हे पत्र मुद्रक व प्रकाशक कुलभूषणराम रामकृष्ण तारे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय प्लॉट नं ए -३२,छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रियल को ऑफ सोसायटी रेल्वे स्टेशन रोड छत्रपती संभाजी नगर ४३१००५ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक सोलापूर तरुण भारत कार्यालय,छत्रपती संभाजीनगर येथे प्रकाशित करून छत्रपती संभाजीनगर, जालना,परभणी,नांदेड, हिंगोली ,बीड येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून वितरीत केले.
प्रबंध संपादक :विवेक घळसासी. मुख्य समुह संपादक : दिलीप यशवंत पेठे. मुख्य संपादक: प्रशांत वसंतराव माने, दूरध्वनी -८८८८४७२६८ RNI Reg.No 46878/87
stbaurangabad@gmail.com. www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)






जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी महसूल विभागातील तीन कर्मचाऱ्यांना निलंबन कारवाई केल्याचा आरोप करत महसुल विभागातील १२०० कर्मचाऱ्यांनी आंदोलनाचे हत्यार उपसले आहे. आज सकाळपासून बेमुदत कामबंद आंदोलन सुरू केले आहे. छाया-कृष्णा शिंदे


# दुष्काळग्रस्त बीडसाठी विशेष निधी अन् मंजूरी द्या

## खा.बजरंग सोनवणे यांनी केंद्रीय मंत्री खट्टर यांची भेट घेवून केली मागणी

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.१० सप्टेंबर**

बीड जल्हिा दुष्काळग्रस्त आहे. पायाभूत सोयी-सुविधा पण कमी आहेत. यासाठी केंद्र सरकारकडून विशेष निधी आणि मंजुरी मिळावी, अशी मागणी बीडचे खा.बजरंग सोनवणे यांनी केंद्रीय ऊर्जा आणि गृहनर्मिाण तथा शहरी व्यवहार मंत्री मनोहरलाल खट्टर यांच्याकडे पत्राद्वारे केली आहे. दि.१० रोजी खा.सोनवणे यांनी मुंबई येथे मंत्री खट्टर यांची भेट घेऊन निवेदन सादर केले.

बीड जल्हि्यात विविध विकास योजना राबविणे आवश्यक आहे. त्यासाठी खा.बजरंग सोनवणे यांनी केंद्रीय मंत्री खट्टर यांना दिलल्या निवेदनात म्हटले आहे, ग्रामीण भागात नवी वीज सबस्टेशन, ट्रान्सफॉर्मर गावागावात स्थिर वीजपुरवठा व्हावा म्हणून ही गरज आहे. शेतकऱ्यांना सौर पंप (पीएम-कुसुम योजना) शेतीसाठी पाणीपुरवठा सोपा होईल. शहरी भागात स्मार्ट मीटर व भूमिगत केबल वीज चोरी थांबेल आणि सुरक्षित वितरण होईल.सौर-पवन ऊर्जेचे प्रकल्प जल्हि्याला हरित ऊर्जा उत्पादनाचं नवं केंद्र बनवता येईल. प्रधानमंत्री आवास योजना (शहरी) शहरातल्या गरीब व मध्यमवर्गीयांना परवडणारी घरं उपलब्ध होतील. अमृत २.० मिशन अंतर्गत



पाणीपुरवठा, ड्रेनेज व स्वच्छता योजना झ्र स्वच्छ वातावरणामुळे आजारपण कमी होईल. बसस्थानक, रस्ते, उद्यानांचं आधुनिकीकरण प्रवास व दैनंदिन सोयीसुविधा सुधारतील. ई-वाहन चार्जिंग हब बीड जल्हिा ई-वाहन वापरासाठी पुढारलेला ठरेल. या प्रकल्पांमुळे बीड जल्हि्याचा सर्वांगीण विकास होण्यासाठी मदत होईल आणि जनतेच्या जीवनमानात मोठा फरक पडेल, असा वश्विासही खा.बजरंग सोनवणे यांनी व्यक्त केला आहे. दरम्यान, खा.सोनवणे हे सर्वांगिन विकासासाठी प्रयत्न करत असून केंद्रीय मंत्र्यांकडे ते बीड जल्हि्यातील विविध प्रश्न सातत्याने मांडत आहेत. खा.सोनवणे यांनी अनेक मंत्र्यांच्या भेटी घेवून बीड जल्हि्यातील नागरिकांच्या हिताचे नर्णिय घेण्यासाठी पाठपुरावा सुरूच ठेवलेला आहे.

**सभागृहातही खा.सोनवणेंचाच आवाज**

खा.बजरंग सोनवणे हे ग्राऊंड पातळीवरून आलेले नेतृत्व आहे. यामुळे ग्रामीण भागात काय आवश्यक आहे, याची जाणीव त्यांना आहे. विशेष म्हणजे, याच कारणाने ते दल्लिीतील सभागृहात बीडसह मराठवाड्याचे देखील प्रश्न मांडत असतात. यामुळे संसदेत महाराष्ट्रातून सर्वाकि प्रश्न मांडणारे खासदार म्हणून सोनवणे यांच्याकडे पाहिले जात आहे.

# सौ.के.एस.के.महाविद्यालयाला जलतरण स्पर्धेत दुहेरी सुवर्ण पदक

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.१० सप्टेंबर**

डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ व सरस्वती भुवन कॉमर्स कॉलेज,छत्रपती संभाजीनगर आयोजित आंतर महाविद्यालयीन जलतरण स्पर्धेस सौ.के.एस.के.महाविद्यालयाचा खेळाडू भंडारी गजानन यानी २०० मीटर बॅकस्ट्रोक ३ मिनीटे १० सेंकद या वेळेत पूर्ण २०० मीटर पूर्ण करून सुवर्ण पदक मिळवले. तसेच ४०० मीटर फ्रीस्टाईल या जलतरण प्रकारात ६ मिनीटे १२ सेंकद या वेळेत आंतर पार करून दुसरेही सुवर्ण पदक पटकावले व यावर्षी आंतर महाविद्यालयीन जलतरण स्पर्धेत दुहेरी सुवर्ण पदक पटकावून महाविद्यालयाचा नाव लौकिक मिळवला. व अखिल भारतीय आंतर विद्यापीठ चेन्नई येथे होणार्या स्पर्धेसाठी तो डॉ.बाबासाहेंब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या संघाचे प्रतिनिधीत्व करणार आहे.खेळाडूच्या या यशाबद्दल अध्यक्ष श्री.किशोर काळे, उपाध्यक्ष डॉ.भारतभूषण क्षीरसागर,संस्थेचे सचिव डॉ.योगेश भारतभूषण क्षीरसागर,सहसचिव डॉ.दीपा क्षीरसागर, पूजा भारतभूषण क्षीरसागर, डॉ.सारिका क्षीरसागर प्रशासकीय अधिकारी डॉ.सुधाकर गुट्टे, डॉ.विश्वाभर देशमाने तसेच महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.एस.व्ही.क्षीरसागर, उपप्राचार्य डॉ.संजय पाटील देवळाणकर,उपप्राचार्य डॉ.अनिता शिंदे, पदव्युत्तर पदवी विभागाचे संचालक डॉ.खान ए.एस., तसेच क्रीडा विभाग प्रमुख डॉ.भागचंद सानप, कमवि उपप्राचार्य डॉ.नारायण काकडे, पर्यवेक्षक प्रा.जालिंदर कोळेकर,डॉ. अमृतसिंग बिसेन तसेच महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी,विद्यार्थी यांनी अभिनंदन केले.



# संपादक राजेंद्र होळकर यांना पत्नीशोक

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.१० सप्टेंबर**



संपादक राजेंद्र होळकर यांच्या पत्नी सुहासिनी होळकर (वय ५४) यांचे उपचारा दरम्यान पुणे येथे बुधवारी सकाळी निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर पुणे येथेच अंत्यसंस्कार करण्यात आले. सुहासिनी होळकर यांच्या निधनाने अभिमान परिवाराचा मोठा आधार कोसळला आहे.

अभिमानचे संपादक राजेंद्र होळकर यांच्या पत्नी सुहासिनी होळकर मागच्या काही दिवसांपासून आजारी होत्या. त्यांच्यावर पुणे येथील रूग्णालयात उपचार सुरू होते. तब्बल १ महिन्याहून अधिक काळ त्यांनी आजाराशी कडवी झुंज दिली. मात्र बुधवारी पहाटे उपचारादरम्यान त्यांची प्राणज्योत मालवली.

# ईद निमित्त निघालेल्या जुलूससाठी रोटरी क्लबने केली पिण्याचे पाणी व अल्पोपहाराची सोय

**तभा वृत्तसेवा**
**अंबाजोगाई दि.१० सप्टेंबर**

सामाजिक सलोखा राखण्यासाठी अंबाजोगाईत बुधवारी ईद निमित्त निघालेल्या जुलूससाठी रोटरी क्लब ऑफ अंबाजोगाई सिटी यांच्या वतीने पिण्याचे पाणी व अल्पोपहाराची सोय करत मुस्लिम बांधवांना ईदच्या शुभेच्छा दिल्या.



ईद मिलादुन्नबी निमित्ताने दरवर्षी जुलूस निघतो. या माध्यमातून सामाजिक सलोखा वाढावा या उद्देशाने रोटरी क्लब ऑफ अंबाजोगाई सिटी तर्फे सर्व मुस्लिम बांधवांना पिण्याचे पाणी व अल्पोपहाराची व्यवस्था करण्यात आली होती. यावेळी रोटरी क्लबच्या पदाधिकारी यांनी जुलूस मधील बांधवांचे स्वागत केले.व त्यांना ईदच्या शुभेच्छा दिल्या. यावेळी अनेक मान्यवरांनी या उपक्रमाचे कौतुक केले. यावेळी रोटरी क्लबच्या अध्यक्षा प्रा.रोहिणी पाठक, उपाध्यक्ष धनराज सोळंकी, सचिव मंजुषा जोशी, प्रोजेक्ट डायरेक्टर राधेश्याम लोहिया,मोईन शेख,शेख शकील,कल्याण काळे,प्रा. संतोष मोहिते,डॉ.निशिकांत पाचेगावकर, प्रवीण चोखडा ,आनंद जाजू, डॉ अनिल केंद्रे ,स्वप्नील परदेशी , राजेंद्र घोडके,प्रदीप झरकर, रुपेश रामावत, डॉ नवनाथ घुगे,अजित देशमुख, बाळासाहेब कदम, रोटरी पदाधिकाऱ्यांची उपस्थिती होती.

**मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळाचे**
**राजमाता जिजाऊ महाविद्यालय, किल्ले-धारुर, जि. बीड**

**ऑफिस मॉडयूलर फर्निचर खरेदी निविदा**

मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळाचे, राजमाता जिजाऊ महाविद्यालय, किल्ले-धारुर, जि. बीड कार्यालयात ऑफिस मॉडयुलर फर्निचर खरेदी करावयाचे आहे. दिनांक ०९/०९/२०२५ रोजी सकाळी १०.३० वाजेपासून ते ०४.०० वाजेपर्यंत प्रशासकीय कार्यालयात कोऱ्या निविदा (ऑफिस मॉडयुलर फर्निचर साहित्य खरेदी संदर्भात सविस्तर माहिती, अटी शर्ती) रक्कम रु. २०००/-(जीएसटी अतिरिक्त) प्रति निविदा या दराने विक्रीसाठी उपलब्ध आहेत.

तरी इच्छूक व जीएसटी नोंदणीकृत पुरवठाधारकांनी भरलेल्या निविदा दिनांक १६/०९/२०२५ रोजी दुपारी ०४.०० वाजेपर्यंत राजमाता जिजाऊ महाविद्यालय, केज रोड, किल्ले-धारुर, जि.बीड कार्यालयात दाखल कराव्यात.

टिप : सदरील निविदा कोणतेही कारण न देता स्विकारणे किंवा नाकारणे तसेच साहित्य किती खरेदी करावयाचे याचा अधिकार प्राचार्य, राजमाता जिजाऊ महाविद्यालय कार्यालयाने राखून ठेवलेला आहे.

**प्राचार्य**
**राजमाता जिजाऊ महाविद्यालय,**
**किल्ले-धारुर, जि. बीड ४३१ १२४**
**मो. क्र. ९४२३३९३७६७**

# जीवन विकास शिक्षण मंडळ केज आयोजित स्व. केशवराव नाळवंडीकर गुरुजी आदर्श शिक्षक पुरस्कार वितरण सोहळा संपन्न

### भौतिक सुविधांपेक्षाही शिक्षकाकडे असणारी निष्ठा जास्त महत्त्वाची असते- कौतिकराव ठाले पाटील

### कांतराव गाजरे, शिवाजीराव समुद्रे, प्रसाद कुलकर्णी, प्रवीण देशमुख, दत्ता सत्वधर, गणेश भालेकर हे ठरले आदर्श शिक्षक पुरस्काराचे मानकरी.



**तभा वृत्तसेवा**
**केज दि.१० सप्टेंबर**

जीवन विकास शिक्षण मंडळ या नावातूनच संस्थेच्या संस्थापकांची ध्येय उद्दिष्टे स्पष्ट होतात. व्यक्तीजीवन, समाजजीवन व राष्ट्रजीवन सुधारण्यासाठी उत्कृष्ट विद्यार्थी या शाळेच्या माध्यमातून घडवले जातात. एखाद्या शिक्षकाच्या कार्याचा गौरव करण्यासाठी त्याच्या नावे आदर्श शिक्षक पुरस्कार देणारी तसेच विविध ध्येय उद्दिष्टे समोर ठेवून चालणारी ही नावलौकिक शाळा आहे. भौतिक सुविधांपेक्षाही शिक्षकाकडे असणारी निष्ठा जास्त महत्त्वाची असते आणि असेच निष्ठावान, कार्यप्रामाणिक शिक्षक या शाळेशी, जोडले गेले आहेत. येथील शिक्षकांमुळेच या शाळेचे वेगळेपण अबाधित असल्याचे दिसून येते. असे प्रतिपादन छत्रपती संभाजीनगर येथील मराठवाडा साहित्य परिषदेचे अध्यक्ष मा. प्राचार्य कौतिकराव ठाले पाटील यांनी केले.

केज येथील स्वामी विवेकानंद विद्यामंदिर माध्यमिक विभाग या शाळेमध्ये दि. ९ सप्टेंबर २०२५ रोजी जीवन विकास शिक्षण मंडळ आयोजित स्व. केशवराव नाळवंडीकर गुरुजी आदर्श शिक्षक पुरस्कार वितरण सोहळा अत्यंत हर्षोत्सात पार पडला. याप्रसंगी कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून अंकुशरावजी इंगळे अध्यक्ष, जीवन विकास शिक्षण मंडळ केज उपस्थित होते. तर प्रमुख पाहुणे म्हणून प्राचार्य कौतिकराव ठाले पाटील अध्यक्ष मराठवाडा साहित्य परिषद छत्रपती संभाजीनगर यांनी उपस्थिती दर्शविली. इतर उपस्थित मान्यवरांमध्ये दादासाहेब गोरे सचिव, म. सा. परिषद छत्रपती संभाजीनगर, दगडू दादा लोमटे कार्यकारीणी संचालक, म. सा. परिषद छत्रपती संभाजीनगर, कुंडलिकराव आतकरे माजी कोषाध्यक्ष, म. सा. परिषद, जी. बी. गदळे सचिव, जीवन विकास शिक्षण मंडळ केज, गणेश कोकीळ सहसचिव जीवन विकास शिक्षण मंडळ केज, माजी उपाध्यक्ष डॉ. पांडुरंग तांदळे, डॉ. प्रतापराव नाळवंडीकर सेवानिवृत्त प्राध्यापक कृषी महाविद्यालय अंबेजोगाई, दिनकरराव नाळवंडीकर सेवानिवृत्त अभियंता पाटबंधारे विभाग केज, शैलाताई इंगळे अध्यक्षा, शालेय व्यवस्थापन समिती, शाळेच्या मुख्याध्यापिका शिवनंदा मुळे, प्राचार्य शंकर भैरट, प्रा. वि. मु. अ. वसंत शितोळे आदी उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या प्रारंभीस उपस्थित मान्यवरांचे स्वागत प्रबोधकांत समुद्रे तसेच श्रेया, प्रांजल, संस्कृती, किशोरी, सिद्धी, सुसंस्कृती, तेजस्विनी, सिद्धांत व जगदीश या विद्यार्थ्यांनी ' शब्द सुमने अंत करणे, आतिथिंना वंदुनी' या गीताने केले. प्रतिवर्षाप्रमाणे याही वर्षी शिक्षण क्षेत्रातील कर्तुत्वान शिक्षकांना स्व. केशवराव नाळवंडीकर गुरुजी आदर्श शिक्षक पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. यामध्ये- कांतराव गाजरे सेवानिवृत्त मु.अ. माजलगाव, शिवाजीराव समुद्रे सेवानिवृत्त शिक्षक धारूर, प्रसाद कुलकर्णी वसुंधरा मा. व उच्च मा. विद्यालय पैठण, प्रवीण देशमुख मु.अ. जयभवानी कन्या प्रशाला केज, दत्ता सत्वधर स्वामी विवेकानंद विद्या मंदिर (मा. वि.) केज, गणेश भालेकर स्वामी विवेकानंद विद्या मंदिर (स्वयं. अर्थ.) केज इत्यादी. तसेच याप्रसंगी शाळेतील सहशिक्षिका गौरी जगताप यांना शैक्षणिक वर्ष २०२४-२५ या वर्षातील ' बेस्ट क्लासटीचर अवार्ड' हा पुरस्कार देऊन गौरविण्यात आले.कार्यक्रमाचे प्रस्ताविक व पाहुण्यांचा परिचय जी. बी. गदळे यांनी दिला. ते म्हणाले, शिक्षकांच्या उत्कृष्ट कार्याचा आलेख नेहमी उंचावत राहावा यास्तव त्यांना 'आदर्श शिक्षक पुरस्कार देऊन प्रोत्साहन देण्याचे कार्य संस्था दरवर्षी करत असते, 'मरावे परी कीर्तीरूपी उरावे' या उक्तीप्रमाणे ज्यांनी जीवन व्यथित केले असे नाळवंडीकर गुरुजी, गुरुजींनी शहरातील जवळपास शंभर पेक्षा अधिक विद्यार्थ्यांना घरी जाऊन मार्गदर्शन केले, त्यांच्या कार्याचा ठसा उमटून राहावा म्हणून त्यांच्या नावे हा पुरस्कार दिला जातो.

याप्रसंगी शैलाताई इंगळे यांनी विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी जे शिक्षक उपक्रमशील व कार्यप्रमाणिक असतात अशा शिक्षकांचाही गुणगौरव झाला पाहिजे. तेंव्हा यावर्षी हा पुरस्कार शाळेतील सहशिक्षिका गौरी जगताप यांना मिळाल्याचे स्पष्ट केले.याप्रसंगी बोलताना दगडू लोमटे म्हणाले, विद्यार्थ्यांनी मिळविलेले यश हेच शिक्षकांच्या कार्याचा पुरावा असतो. तेव्हा शिक्षकांनी निष्ठेने आपले कर्तव्य तत्परतेने पार पाडले पाहिजे. याप्रसंगी शाळेच्या शिस्तीचेही त्यांनी कौतुक केले.

दादासाहेब गोरे याप्रसंगी बोलताना म्हणाले, कोणत्याही शिक्षकाचे माठेपण हे त्यांच्या विद्यार्थ्यांच्या यशात असते, शिक्षक हा निस्वार्थी असतो, छडी हातात न होता आदर्श शिक्षक होणे ही एक कसोटीच असल्याचे त्यांनी व्यक्त केले. जे शिक्षक उत्तम अध्यापन करतात तेच शिक्षक विद्यार्थ्यांच्या मनात आदराचे स्थान मिळवतात.

याप्रसंगी आदर्श शिक्षक पुरस्कार प्राप्त शिक्षकांनी आपले मनोगत व्यक्त केले. याप्रसंगी बोलताना प्रविण देशमुख म्हणाले, जी. बी. गदळे सरांकडे पाहून आम्ही शिकलो व यातूनच मी शिक्षक झालो, ते माझे प्रेरणास्थान आहेत. कांतराव गाजरे म्हणाले, धन्य आम्ही जन्मा आलो, दास विठोबाचे झालो' या तुकारामांच्या उक्तीप्रमाणे मी ही धन्य झाल्याची प्रचिती मला आली. साने गुरुजींना मी कधीच प्रत्यक्ष पाहिले नाही परंतु जेव्हा मी या ऋषीतुल्य नाळवंडीकर गुरुंजीच्या नावे पुरस्कार घेत होते तेव्हा त्या फोटो कडे पाहिल्यावर मला साने गुरुजींनाच पाहिल्यासारखे वाटले. निष्ठा, वृत्तस्थ भावना, विद्याव्यासंगीपणा' हे तीन गुण जर शिक्षकांनी जपले तर गुरुजींची आठवण जपल्यासारखे होईल. जगजेत्ता सिकंदर, अब्राहम लिंकन, कोलंबस आणि छत्रपती शिवाजीराजे यांचा आदर्श विद्यार्थ्यांनी घ्यावा. याप्रसंगी बोलताना दत्ता सत्वधर म्हणाले, कुटुंबातील शिक्षक असणारे चुलते यांचा आदर्श घेऊनच मी शिक्षकी हा पेशा स्वीकारला. भारतीय महसूल सेवेमध्ये नियुक्त असलेल्या एका माजी विद्यार्थ्याने माझी भेट घेतली. त्याचवेळी खऱ्या अर्थाने मला आदर्श शिक्षक पुरस्कार मिळाल्यासारखे वाटले. याप्रसंगी इतरही काही आठवणींना त्यांनी उजाळा देण्याचा प्रयत्न केला.अध्यक्षीय समारोपात अंकुशरावजी इंगळे म्हणाले, शिक्षण व्यवस्थेत आणि शिक्षण क्षेत्रात सुधारणा घडवून आणण्यासाठी विश्वंभर कोकीळ व केशवराव नाळवंडीकर गुरुजी यांनी ही शाळा सुरू केली. त्यांची काम करण्याची प्रचंड चिकाटी होती. त्यांनीच खऱ्या अर्थाने विद्यार्थी व शिक्षक या उभयंतानाही जिद्दीने काम करण्याचा प्रेरणादायी संदेश दिला.कार्यक्रमाचे सूत्रसंचलन सांस्कृतिक विभाग प्रमुख प्रबोधकांत समुद्रे यांनी केले. तर आभार शाळेच्या मुख्याध्यापिका शिवनंदा मुळे यांनी मानले.

# जनसुरक्षा कायद्याविरोधात महाविकास आघाडीचे आंदोलन



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १० सप्टेंबर**

महाराष्ट्र जनसुरक्षा विधेयक २०२४ हे घटनाविरोधी आणि लोकशाहीला बाधक असून जनतेच्या मुलभूत हक्कांवर गदा आणणारे आहे असा आरोप करीत महाविकास आघाडीच्यावतीने येथील छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पूतळ्यासमोर, गांधी चौकात तसेच जिल्हाधिकारी कार्यालयासमोर धरणे आंदोलन करण्यात आले.

या आंदोलनात महाविकास आघाडीच्या वतीने (राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार), शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे), भारतीय राष्ट्रीय काँग्रेस व मित्र पक्ष) सहभागी झाले होते. महाराष्ट्र जनसुरक्षा विधेयक २०२४ च्या विरोधात घोषणाबाजी करीत हे विधेयक तत्काळ रद्द करा अशी मागणी आंदोलकांच्यावतीने करण्यात आली.

राज्यभरात बुधवार दि १० सप्टेंबर रोजी महाविकास आघाडीच्यावतीने जिल्हा व तालुका स्तरावर जनसुरक्षा कायद्याच्या विरोधात आंदोलनाची हाक देण्यात आली होती. या विधेयकाच्या माध्यमातून सरकारला अमर्याद अधिकार मिळतील आणि ते कायद्याचा दुरुपयोग करू शकतील, अशी भीती आंदोलकांनी व्यक्त केली. शांततापूर्ण मार्गाने एकत्र येत, कार्यकर्त्यांनी जोरदार घोषणाबाजी करत या 'जनसुरक्षा' विधेयकाला 'असुरक्षा' विधेयक असे संबोधले. आमच्या भावना व या विधेयकामुळे होणारे संभाव्य धोके जिल्हाधिकाऱ्यांच्या माध्यमातून शासनापर्यंत पोहोचवण्यात आले. महाविकास आघाडी राज्यातील जनतेच्या हितासाठी आणि लोकशाही मूल्यांच्या रक्षणासाठी संघर्ष करत राहील, असा निर्धार यावेळी व्यक्त करण्यात आला.

या वेळी राष्ट्रवादी शरदचंद्र पवार गटाचे जिल्हाध्यक्ष दिलीप चव्हाण, उबाठाचे जिल्हाप्रमुख गोपु पटील काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष सुरेशआप्पा सराफ, उबाठाचे जिल्हाप्रमुख संदेश देशमुख, अँड रामप्रभु कोरडे, गोविदराव भवर, गोपाल ढोणे, सोनु चव्हाण, साईनाथ जाधव, माधव कोरडे, वसिम देशमुख, भानुदास जाधव, बंडु मुटकुळे चद्रकांत देशमुख, आनंदराव जगताप, गणेश शिंदे, धिरज काकडे, रमेश सानप, गजाजन गव्हाणे, प्रभाकर गोरे आनिल नैनवाणी, मनिष आखरे, डॉ संतोष बोढारे,जकी कुरेशी, शामराव गुजर, अवधुत निळकंठे, विठ्ठल चौथमल शंकर कऱ्हाळे, आरिफ लाला, नंदु तोष्णीवाल, संतोष पटोले, आभिजित देशमुख, गणेशराव गडदे, चंपतराव नाईक, अमित कळासरे, बाबुराव गाडे, मिलींद उबाळे यांच्यासह पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. या आंदोलनानंतर प्रशासनाला शिष्टमंडळाने निवेदन सादर केले. यावेळी शहरात चोख पोलिस बंदोबस्त लावण्यात आला होता.

# हिंगोलीत भोई समाजाचा जनआक्रोश मोर्चा

## गुलजारपुरा अल्पवयीन मुलीवर अत्याचार प्रकरण



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १० सप्टेंबर**

अकोला शहरातील गुलजारपुरा भागात एका गरीब कुटुंबातील १३ वर्षीय अल्पवयीन मुलीवर नराधमाने पाशवी अत्याचार केल्याची घटना घडली आहे. या नराधमास तत्काळ अटक करून त्याचा एनकाऊंटर करावा तसेच पिडीत कुटुंबाला अर्थसहाय्य करावे या मागणीसाठी भोई समाजाच्यावतीने जिल्हाधिकारी कार्यालयावर जनआक्रोश मोर्चा काढण्यात आला.

अकोला शहरातील गुलजारपुरा भागात राहणाऱ्या गरीब भोई समाजातील अल्पवयीन मुलीवर तोहीत समीर या गुन्हेगारी प्रवृत्तीच्या नराधमाने गणेश विसर्जनाच्या दिवशी अल्पवयीन मुलगी घरात एकटी असल्याचा गैरफायदा घेत पाशवी अत्याचार केले. सदरील व्यक्तीवर अशाप्रकारचे पुर्वी देखील गुन्हे दाखल आहेत. त्याने तुरूंगवासही भोगला आहे. घटनेनंतर आरोपी फरार असून पोलिस प्रशासनाने तत्काळ अटक करण्यासाठी ठोस कारवाई न केल्यामुळे नागरिकांमध्ये तीव्र असंतोष आहे. आरोपीला तत्काळ अटक करून त्याचा एनकाऊंटर करा तसेच पिडीत बालिकेच्या परिवाराला मुख्यमंत्री सहाय्यता निधीतून आर्थिक मदत करण्यात यावी, पिडीत कुटुंबाला सामाजिक सुरक्षा पुरविण्यात यावी सदरील मागण्यांची पूर्तता न केल्यास भोई समाजाच्यावतीने राज्यभर आंदोलन करण्याचा इशारा निवेदनात देण्यात आला आहे. या मोर्चात मोठ्या संख्येने महिलाही सहभागी झाल्या होत्या. यावेळी जिल्हाधिकारी यांना मागण्यांचे निवेदन सादर करण्यात आले. निवेदनावर नामदेव मस्के, अनिल गवंदे, प्रल्हाद नेमाडे, गणेश वानखेडे, अमोल जमदाडे, संदीप संदुसे, कैलास श्रीनाथ, अरूण कहार आदींच्या स्वाक्षऱ्या आहेत.

# बंजारा समाजाला एसटी सवलतीचे आरक्षण देण्याच्या मागणीसाठी मोर्चा



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १० सप्टेंबर**

हैदराबाद गॅझेट लागू करून बंजारा समाजाला एसटी सवलतीचे आरक्षण देण्याच्या मागणीसाठी बुधवार दि १० सप्टेंबर रोजी गोरसेनेच्या नेतृत्वात बंजारा समाजाच्यावतीने जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा काढण्यात आला. निजाम प्रांतातील १९०१ ते १९४८ पर्यंत हैदराबाद गॅझेटमध्ये गोरबंजारा, लंबाडा, लमाण जातीची नोंद जमात अशी असून त्यानुसार तेलंगणा, आंध्रप्रदेशातील बंजारा,लंबाडा जातीना अनुसुचित जमातीचे आरक्षण मिळालेले आहे मात्र १९४८ नंतर राज्य पुनर्रचनेदरम्यान मराठवाडासह विदर्भ, खानदेशचा भाग महाराष्ट्राला जोडल्यामुळे मुळचे असलेले अनुसुचित जमातीचे आरक्षण संपुष्टात येवून विमुक्त जातीच्या संवर्गात रुपांतरित करण्यात आले.त्यामुळे महाराष्ट्रातील गोरबंजारा समाजावर एस टी आरक्षणाबाबत घोर अन्याय झाला आहे मात्र गेल्या काही दिवसात मराठा कुणबी एकच असल्याचे समजून हैदराबाद गॅझेटनुसार आरक्षण देणार असल्याचे फडणवीस सरकारने जि आर काढून जाहीर केले आहे. त्याला अनुसरुनच महाराष्ट्रातील गोरबंजारा समाजाला हैदराबाद गॅझेट लागू करुन अनुसूचीत जमातीचे एस टी चे आरक्षण देण्याची मागणी गोरसेनेने निवेदनाद्वारे केली आहे.

या मोर्चात मोठ्या संख्येने महिला, पुरूष सहभागी झाले होते. यावेळी बंजारा समाजातील महिलांनी पारंपारीक वेषात मोर्चात सहभाग नोंदवत प्रशासनाला मागण्यांचे निवेदन सादर केले.



**हिंगोली– येथील रामलीला मैदानावर दसरा महोत्सवानिमित्त कृषी प्रदर्शनी व औद्योगिक प्रदर्शनीची उभारणी करण्यात येणार आहे. या मैदानाची पाहणी बुधवारी उपविभागीय अधिकारी तथा दसरा समितीचे अध्यक्ष समाधान घुटुकडे यांनी केली. यावेळी मधुकर खंडागळे, इंजिनीअर चौधरी, दौलत बनसोडे, ईश्वर उरेवार, विद्या पवार, अर्चना जाधव आदींची उपस्थिती होती. छाया– विजय गुंडेकर**

## संक्षिप्त वृत्त

### सोमवारी महिला लोकशाही दिनाचे आयोजन

हिंगोली– राज्यघटनेने प्रत्येक नागरिकाला समान हक्क व समान संधी असा मूलभूत हक्क दिलेला आहे. त्याअंतर्गत समस्याग्रस्त व पीडित महिलांना त्यांचे प्रश्न मांडण्यासाठी व्यासपीठ मिळावे. तसेच त्यांच्या तक्रारी, अडचणी यांची शासकीय यंत्रणेकडून सोडवणूक करण्यासाठी एक प्रभावी उपाययोजना म्हणून जिल्हास्तरावर दर महिन्याच्या तिसऱ्या सोमवारी किंवा तिसऱ्या सोमवारी सार्वजनिक सुट्टी असल्यास त्यानंतर येणाऱ्या कामकाजाच्या दिवशी जिल्हास्तरीय महिला लोकशाही दिन राबविण्यात येतो. माहे सप्टेंबर, २०२५ च्या महिला लोकशाही दिनाचे आयोजन सोमवार, (दि. १५ सप्टेंबर) रोजी सकाळी ११ वाजता जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली करण्यात आले आहे. समस्याग्रस्त व पीडित महिलांनी त्यांच्या अडचणी मांडण्यासाठी विहित नमुन्यातील अर्ज जिल्हा महिला व बालविकास अधिकारी, मध्यवर्ती प्रशासकीय इमारत, दुसरा मजला, कक्ष क्र. एस–७, हिंगोली यांच्या कार्यालयात सादर करावेत. यामध्ये न्याय प्रविष्ठ प्रकरणे, विहित नमुन्यात नसणारे व आवश्यकती कागदपत्रे न जोडलेले, सेवा, आस्थापनाविषयक बाबी, तक्रार निवेदन वैयक्तिक स्वरुपाची नसेल असे अर्ज स्विकारले जाणार नाहीत. समस्याग्रस्त व पीडित महिलांनी शासनाने उपलब्ध करुन दिलेल्या व्यासपीठाचा उपयोग आपल्या अडचणी सोडविण्यासाठी करावा, असे आवाहन जिल्हा महिला व बालविकास अधिकारी, हिंगोली यांनी केले आहे.

### संचालकांची एक दिवशीय कार्यशाळा संपन्न

हिंगोली– जागतिक बँक अर्थसहायित मा. बाळासाहेब ठाकरे कृषि व्यवसाय व ग्रामीण परिवर्तन (स्मार्ट) प्रकल्प अंतर्गत टीएसए (प्लॅडियम) संस्थेमार्फत समुदाय आधारित संस्थेच्या संचालकांची जिल्हास्तरीय एक दिवसीय कार्यशाळा आज येथील जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी कार्यालयाच्या आत्मा सभागृहात आयोजित करण्यात आली होती. यावेळी क्सेस टू फायनान्स प्रोक्रूमेंट असोसिएट आरआययूचे हनुमंत आरदवाड, ग्री बिझनेस असोसिएट आरआययूचे मंगेश लांबाडे, फूड सेफ्टी न्ड क्वालिटी असोसिएट आरआययूचे सचिन कच्छवे, जिल्हा समन्वयक वैभव तांबडे, यांच्या सर्व टीमने समुदाय आधारित संस्थेच्या संचालकांना विविध विषयांवर प्रात्यक्षिकपणे मार्गदर्शन केले. या कार्यशाळेचे प्रास्ताविक जी. बी. बंटेवाड यांनी केले. या कार्यशाळेस जिल्हा अंमलबजावणी कक्षाचे नोडल अधिकारी जी.बी. बंटेवाड, पुरवठा व मूल्यसाखळी तज्ञ जी. एच. कच्छवे व कार्यालयातील अधिकारी, कर्मचारी, कंपनीचे संचालक उपस्थित होते. या कार्यशाळेचे सूत्रसंचालन वैभव तांबडे यांनी केले, तर आभार प्रदर्शन जी. एच. कच्छवे यांनी केले.

### शनिवारी राष्ट्रीय लोक न्यायालयाचे आयोजन

हिंगोली– महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरण मुंबई यांच्या आदेशानुसार हिंगोली जिल्ह्यातील सर्व न्यायालयात शनिवार, (दि.१३) रोजी सकाळी १०.३० वाजता राष्ट्रीय लोकन्यायालयाचे आयोजन करण्यात आले आहे. या राष्ट्रीय लोकन्यायालयामध्ये बँक, ग्रामपंचायत, नगर परिषद, एमएसईबी व फायनान्स यांचे वाद दाखलपूर्व प्रकरणे हे तडजोडीच्या आधारे निकाली काढण्यात येणार आहे. या राष्ट्रीय लोकन्यायालयामध्ये सर्व विधिज्ञांनी जास्तीत जास्त प्रकरणे ठेवून तडजोड करुन निकाली काढावीत, असे आवाहन तालुका विधी सेवा समितीचे अध्यक्ष तथा प्रमुख जिल्हा न्यायाधीश टी. एस. अकाली यांनी केले आहे.

# औंढा नागनाथ येथे हैदराबाद गॅझेट रद्द करण्याच्या मागणीसाठी रास्ता रोको



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १० सप्टेंबर**

औंढा नागनाथ येथे हिंगोली ते परभणी महामार्गावर सकल ओबीसी समाजबांधवांच्या वतीने मराठा आरक्षणासाठी लागू केलेल्या हैदराबाद गॅझेट जीआर चा शासनाने निर्णय रद्द करावा, न्यायमूर्ती संदीप शिंदे यांच्या नेतृत्वात गठीत केलेली समिती रद्द करावी, महाराष्ट्र राज्याची जातीनिहाय जनगणना करून ओबीसीची लोकसंख्या जाहीर करा, मराठा समाजाला ओबीसी मधून आरक्षण आता व भविष्यात देण्यात येऊ नये या मागणीसाठी बुधवारी ( ता. १० ) सप्टेंबर ला सकाळी १२ ते दुपारी २ वाजे दरम्यान तब्बल दोन तास रास्ता रोको आंदोलन केले. यावेळी सकल ओबीसी समाजबांधव रस्ता रोकोत मोठ्या संख्येने उपस्थित होता.

रास्ता रोको आंदोलन संपल्यानंतर ओबीसी समाज बांधवांनी तहसीलदार हरीश गाडे यांना निवेदन दिले. आंदोलन दरम्यान आलेल्या म्बुलन्सला देखील आंदोलन चालू असताना वाट काढून दिली.

दोन तासाच्या रस्ता रोको आंदोलनामुळे औंढा–हिंगोली, औंढा– परभणी रोडच्या दोन्ही साईडला वाहनाच्या दुतर्फा रांगा लागल्या होत्या. या रास्तारोको पोलीस निरीक्षक जी एस राहिरे, पोलीसउपनिरीक्षक दत्ता कानगुले, पोलीस निरीक्षक अफसर पठाण, पोलीस उपनिरीक्षक प्रकाश थिटे वसीम पठाण सुभाष जयताडे गजानन गिरी अमोल चव्हाण रमेश मस्के पोलीस कर्मचारी व होमगार्ड यांनी कडक बंदोबस्त दिला होता.

# निधी मागणीचे प्रस्ताव तत्काळ सादर करावेत– जिल्हाधिकारी

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १० सप्टेंबर**

जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण) सन २०२५–२६ अंतर्गत निधी मागणीचे परिपूर्ण प्रस्ताव आयपासवर अपलोड करुन तात्काळ सादर करावेत, असे निर्देश जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांनी आढावा बैठकीत दिले.

जिल्हाधिकारी कार्यालयात झालेल्या बैठकीस अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी सुधीर ठोंबरे, जिल्हा नियोजन अधिकारी अनिता लव्हारे, सहायक जिल्हा नियोजन अधिकारी गं. गो. चितळे, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्पाचे रमेश भडके यांच्यासह सर्व विभागप्रमुख यावेळी उपस्थित होते.

जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण) सन २०२५–२६ अंतर्गत विविध विकास योजनांचे निधी मागणीचे परिपूर्ण प्रस्ताव तात्काळ सादर करावेत. विविध विकास योजनांचे परिपूर्ण प्रस्ताव वेळेत सादर न करणाऱ्या कार्यालय प्रमुखावर कारवाई करावी, असे निर्देश जिल्हाधिकारी श्री. गुप्ता यांनी दिले.

यावेळी महावितरण, पोलीस, जिल्हा परिषद, पशुसंवर्धन विभाग, कृषि विभाग, जिल्हा आरोग्य विभाग, महिला व बालकल्याण, महिला व बालविकास विभाग, वन विभाग, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, सार्वजनिक बांधकाम विभाग, नगरविकास, परिवहन विभाग यासह विविध विभागांच्या प्रस्तावाबाबत चर्चा करण्यात आली. बैठकीत प्रशासनाच्या विविध विभागांना त्यांच्या जबाबदाऱ्या वेळेत पूर्ण करुन प्रस्ताव सादर करण्याचे निर्देश जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांनी दिले.

निती आयोगाच्या निर्देशांकानुसार आकांक्षीत तालुका हिंगोलीसाठी तयार करण्यात आलेल्या आराखड्यानुसार सर्व यंत्रणांनी कामे वेळेत पूर्ण करावेत. केलेल्या कामाची माहिती पोर्टलवर वेळोवेळी अपडेट करावी. तसेच जिल्हा वार्षिक योजनेत ज्या बाबीसाठी निधी नाही ती कामे आकांक्षीत उपक्रमांतर्गत प्राप्त होणाऱ्या निधीतून करावेत, असे निर्देशही जिल्हाधिकारी श्री. गुप्ता यांनी यावेळी दिले.

# कंत्राटी आरोग्य कर्मचाऱ्यांचा २३ दिवसानंतर संप मागे, १३ मागण्यांना तत्वत: मान्यता


**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १० सप्टेंबर**

राज्यातील राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत कंत्राटी कर्मचाऱ्यांच्या समायोजनासह १३ मागण्यांना आरोग्यमंत्र्यांनी तत्वत: मान्यता दिल्यानंतर २३ दिवसांपासून सुरू असलेला संप मागे घेण्यात आला आहे. यामुळे आता ग्रामीण भागातील आरोग्य सेवा पूर्ववत सुरू होणार आहे.

राज्यातील राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत कार्यरत कंत्राटी कर्मचाऱ्यांना शासकीय सेवेत सामावून घ्यावे, समुदाय आरोग्य अधिकाऱ्यांना ४० हजार रूपये एकत्रित मानधन द्यावे यासह इतर मागण्यांसाठी सुमारे ३० हजार पेक्षा जास्त कर्मचाऱ्यांनी दि १९ ऑगस्टपासून कामबंद आंदोलन सुरू केले होते. मागील २३ दिवसांपासून कामबंद आंदोलन सुरू असल्यामुळे आरोग्य सेवा विस्कळीत झाली असून समुदाय आरोग्य अधिकारीदेखील या आंदोलनात सहभागी झाले होते. त्यामुळे ग्रामीण भागातील आरोग्य उपकेंद्रांचे कामकाज ठप्प पडले होते. कंत्राटी कर्मचाऱ्यांनी आंदोलन मागे घेण्याबाबत प्रशासकीय पातळीवरून वेळोवेळी आवाहन करण्यात आले होते. मात्र जोपर्यंत मागण्या मान्य होत नाही तोपर्यंत आंदोलन मागे न घेण्याचा निर्धार संघटनेने केला होता. त्यामुळे राज्यभरातील आरोग्य सेवा विस्कळीत झाली होती.

हिंगोली येथील जिल्हा परिषद कार्यालयासमोर कंत्राटी आरोग्य कर्मचाऱ्यांनी जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा काढला, थाळीनाद आंदोलन केले तसेच कामबंद आंदोलन सुरूच ठेवले होते. या आंदोलनाची दखल घेत आरोग्यमंत्री प्रकाश आबीटकर यांनी संघटनेच्या पदाधिकाऱ्यांशी चर्चा केली. चर्चेनंतर समायोजनाच्या मागण्यासह इतर १३ मागण्या तत्वत: मान्य करण्यात आल्या. त्यामुळे कर्मचारी संघटनेने मागील २३ दिवसांपासून पुकारलेला संप आज मागे घेण्यात आला. याबाबतचे पत्र संघटनेचे समन्वयक मनीष खैरनार यांच्यासह पदाधिकाऱ्यांनी दिले आहे. संप मिटल्यामुळे प्रशासनाने सुटकेचा नि:श्वास सोडला आहे.

# जिल्हाधिकारी, पोलिस अधीक्षकांना पत्रकार संघाच्यावतीने निमंत्रण



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १० सप्टेंबर**

ऐतिहासिक दसरा महोत्सवानिमित्त विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले असून यामध्ये क्रिकेट सामन्यांचाही समावेश करण्यात आला आहे. पत्रकारांनी या सामन्यांसाठी आग्रह धरल्यानंतर प्रशासनाने त्याला मान्यता दिली आहे.

या अनुषंगाने दसरा महोत्सव समिती व पत्रकार क्रिकेट संघ यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आलेल्या क्रिकेट स्पर्धेत महसूल विभाग व जिल्हा पोलीस दलाच्या संघांचा समावेश असणार आहे. या अनुषंगाने पत्रकार क्रिकेट संघाच्यावतीने जिल्हाधिकारी राहुल गुप्ता व जिल्हा पोलीस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे यांना निमंत्रण देण्यात आले. दोघांनी देखील या निमंत्रणाचा आनंदाने स्वीकार करीत स्पर्धे दरम्यान सहकार्य करण्याचे आश्वासन देखील दिले. स्पर्धेत महसूल व पोलीस दलाचे संघ सहभागी होणार आहेत. याबद्दल पत्रकारांनी दोन्हीही अधिकाऱ्यांचे आभार व्यक्त केले.

सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

## संक्षिप्त वृत्त...

### राज्य पात्रता परीक्षेत सामुदायिक विज्ञान महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांचे यश

**परभणी,/प्रतिनिधी:** वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठाच्या सामुदायिक विज्ञान महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठामार्फत दिनांक १५ जून २०२५ रोजी घेण्यात आलेल्या महाराष्ट्र राज्य पात्रता परीक्षा मध्ये गृह विज्ञान (होम सायन्स) विषयात उल्लेखनीय यश संपादन केले आहे. या परीक्षेचा निकाल नुकताच जाहिर झाला असून, गृह विज्ञान विषयातून एकूण ६ विद्यार्थ्यांनी ही परीक्षा यशस्वीरित्या उत्तीर्ण केली आहे.

या यशाबद्दल कुलगुरू प्रा. (डॉ.) इन्द्र मणि यांनी सर्व विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले असून, पुढील शैक्षणिक व व्यावसायिक कारकीर्दीसाठी शुभेच्छा दिल्या आहेत. शिक्षण संचालक डॉ. भगवान आसेवार यांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे कौतुक करून शुभेच्छा दिल्या.

या यशस्वी विद्यार्थ्यामध्ये दिव्या उत्तम भगत, प्रतिक्षा तुकाराम गवाले, गायत्री बालमुकुंद काबरा, अदिनाथ मुरलीधर बेले ,जान्हवी रंगराव उक्कलगावकर आणि ज्ञानेश्वरी रामराव अरगडे हे विद्यार्थी पात्र ठरले असून या विद्यार्थ्यांनी उत्कृष्ट गुण प्राप्त करून महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांच्या सेट परीक्षेतील यशाची परंपरा कायम ठेवली आहे. यापैकी चार विद्यार्थ्यांनी याच महाविद्यालयातून पदव्युत्तर शिक्षण याच शैक्षणिक वर्षात पूर्ण केले आहे, तर दोघांनी पदवीचे शिक्षण येथे पूर्ण करून पदव्युत्तर शिक्षण बाहेरील विद्यापीठातून अंतिम टप्प्यात आहे. या यशामुळे या विद्यार्थ्यांना महाराष्ट्रातील विविध महाविद्यालयांमध्ये प्राध्यापक म्हणून नियुक्ती होण्याची पात्रता मिळाली आहे. या सर्व विद्यार्थ्यांच्या यशाबद्दल सहयोगी अधिष्ठाता डॉ. जया बंगाळे, विभाग प्रमुख डॉ. नीता गायकवाड, विभाग प्रमुख तथा शिक्षण कक्ष प्रमुख डॉ. वीणा भालेराव, तसेच विभाग प्रमुख डॉ. शंकर पुरी यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून त्यांच्या कष्ट, सातत्यपूर्ण परिश्रम व जिद्दीचे कौतुक केले.

### कृषी विद्यापीठाच्या प्रयोगशाळेत ऑटोक्लेव्ह कुकरचा स्फोट; दोन महिला कामगार जखमी

**परभणी,/प्रतिनिधी :** वसंतराव मराठवाडा कृषी विद्यापीठाच्या वनस्पतीरोगशास्त्र विभागातील बायोमिक्स संशोधन व निर्मिती केंद्राच्या प्रयोगशाळेत मंगळवारी (दि.०९) दुपारी साडेबाराच्या सुमारास ऑटोक्लेव्ह कुकरचा स्फोट झाला. या घटनेत दोन महिला कामगार जखमी झाल्या असून, त्यांच्यावर उपचार सुरू आहेत.

नेहमीप्रमाणे प्रयोगशाळेत कामकाज सुरू असताना अचानक ऑटोक्लेव्ह कुकरचा मोठा स्फोट झाला. शॉर्टसर्किटमुळे हा अपघात झाल्याचा प्राथमिक अंदाज व्यक्त करण्यात आला आहे. घटनेनंतर तातडीने जखमी महिलांना परभणीतील वसमत रोडवरील खाजगी रुग्णालयात दाखल करण्यात आले. सध्या दोन्ही महिला कामगारांची प्रकृती स्थिर असल्याचे बायोमिक्स संशोधन व निर्मिती केंद्राचे प्रमुख डॉ. अंबाडकर यांनी सांगितले.

### बस प्रवासादरम्यान तरुण वैद्यकीय अधिकाऱ्याचा मृत्यू

**जिंतूर,/प्रतिनिधी :** वझर प्राथमिक आरोग्य केंद्रात नुकतेच नियुक्त झालेल्या वैद्यकीय अधिकाऱ्याचा जिंतूर-भोगाव रस्त्यावर सोमवारी सायंकाळी साडेसातच्या सुमारास बसप्रवासादरम्यान मृत्यू झाला.

डॉ. आषित योगीराज वानखेडे (वय ३२, रा. नांदेड) हे जिंतूरहून गडदव्हाणकडे जाणाऱ्या एस.टी. बसने प्रवास करत होते. बस स्थानकातून चढल्यानंतर काही अंतरावरच ते अचानक बेशुद्ध झाले. प्रवाशांनी कंडक्टरला याची माहिती दिल्यानंतर बस भोगाव रस्त्यावर थांबवून त्यांना तातडीने जिंतूर ग्रामीण रुग्णालयात दाखल करण्यात आले. मात्र, डॉक्टरांनी तपासल्यानंतर त्यांना मृत घोषित केले.

घटनेची माहिती मिळताच तालुका वैद्यकीय अधिकारी डॉ. दिनेश बोराळकर, परभणी गोपनीय शाखेचे हवालदार जिया खान पठाण यांचे पथक घटनास्थळी दाखल झाले. दरम्यान, मृतकाचे नातेवाईकही रुग्णालयात दाखल झाले. शवविच्छेदनानंतर मृतदेह कुटुंबीयांच्या ताब्यात देण्यात आला. डॉ. बोराळकर यांनी घटनास्थळी पाहणी करून मृत्यूचे कारण उत्तरीय तपासणीनंतर स्पष्ट होईल, असे सांगितले. स्थानिक पोलिसांनीही सदर घटनेबाबत अद्याप कोणतीही नोंद झालेली नसल्याचे स्पष्ट केले.
या आकस्मिक मृत्यूमुळे परिसरात शोककळा पसरली असून, तरुण वयात वैद्यकीय अधिकाऱ्याचे निधन झाल्याने नागरिकांमध्ये हळहळ व्यक्त होत आहे.

### काँग्रेसचे बाळासाहेब देशमुख लातूर जिल्ह्याचे प्रभारी

**परभणी,/प्रतिनिधी :** महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांच्या सूचनेनुसार काँग्रेसचे उपाध्यक्ष बाळासाहेब देशमुख यांची लातूर जिल्हा प्रभारीपदी नियुक्ती करण्यात आली आहे. प्रदेश काँग्रेस कमिटीमार्फत ९ सप्टेंबर रोजी जारी करण्यात आलेल्या आदेशानुसार ही नियुक्ती जाहीर झाली.

यासोबतच प्रत्येक विधानसभा मतदारसंघासाठी प्रभारी नेत्यांची नेमणूक करण्यात आली आहे. त्यानुसार लातूर ग्रामीण व शहरसाठी डॉ. नितीन देहाडे, औसा विधानसभेसाठी श्रावण रूपवाड, निलंगा मतदारसंघासाठी सुरेश हावळे, उदगीरसाठी श्रीमती अलका राठोड तर अहमदपूरसाठी धनराज राठोड यांची नियुक्ती करण्यात आली आहे. प्रदेश काँग्रेस कमिटीच्या आदेशात नमूद करण्यात आले आहे .

सोलापूर तरुण भारत

कार्यालयाचा पत्ता- डॉ.लोया नेत्र रुग्णालयासमोर ढवळे यांचे निवासस्थान शिवाजी नगर, परभणी

तात्काळ प्रतिनिधी नेमणे आहे.

संपूर्ण मराठवाडयामध्ये झपाटयाने वाढणाऱ्या **दै.सोलापूर तरुण भारत** साठी परभणी जिल्हयात खालील ठिकाणी प्रतिनिधी नेमणे आहे.
**१.गंगाखेड-** तालुका प्रतिनिधी व शहर प्रतिनिधी, ०२. **पूर्णा-** तालुका प्रतिनिधी व शहर प्रतिनिधी ०३. **मानवत** - तालुका प्रतिनिधी व शहर प्रतिनिधी,
०४. **पालम** - तालुका प्रतिनिधी व शहर प्रतिनिधी ०५. **सेलू** - शहर प्रतिनिधी ताडकळस, बोरी, राणी सावरगाव, कौसडी, चारठाणा, वालूर या सर्व ठिकाणी तात्काळ प्रतिनिधीची नियुक्ती करावयाची आहे. पत्रकारितेतील अनुभव असलेल्या व दै.तरुण भारतसाठी काम करु इच्छिणाऱ्या प्रतिनिधींनी संपर्क साधावा.

**जिल्हा प्रतिनिधी- मोहन धारासूरकर**

९४ २३३२४६६५, ९२८४६६४४३०, ९२८४६९५५८३

# जांभुळबेटाचा विकास केव्हा....?

**पालम : बेटात नागरिकांची होती गर्दी, जिल्हयाच्या आकर्षीत बेटाकडे मात्र दुर्लक्षच कारणीभुत**





**शांतीलाल शर्मा**
**पालम /प्रतिनिधी-**
पालम तालुक्यातील सोमेश्वर येथे गोदावरी नदी पात्रात निसर्गाच्या सौंदर्याने नटलेले अद्भुत जांभुळबेट आहे, या बेटाच्या विकासासाठी पर्यटन विभागाला वेळ नसल्याने कृषिभूषण कांतराव झरीकर यांच्या मार्गदर्शनाखाली गावातील अनेक तरुणांना सोबत घेऊन बेटाच्या विकासासाठी अहोरात्र प्रयत्न करीत आहेत, परंतु यामुळे भविष्यात लयास आलेले बेट पुन्हा एकदा सौंदर्य प्राप्त करेल. पण शासन या बेटाकडे लक्ष केव्हा देनार असा प्रश्न निसर्गप्रेमींना पडला आहे.

गोदावरी पात्राच्या मध्यभागी निसर्गाच्या किमयेने एका बेटाचे अस्तित्व निर्माण झाले आहे, या बेटात विविध जातीचे वृक्षाने हा परिसर हिरवा गार बनला आहे, यात मोर वास्तव करत आस्तात या बेटाच्या विकासासाठी आघाडी शासनाने १९९५ मध्ये अल्प प्रमाणात निधी उपलब्ध करून देण्यात आला होता, मात्र या निधीतून बेटाचा फारसा विकास झाला नाही त्यानंतर आज लगत शासनाने विकास करण्यासाठी एक रुपयाचा निधी उपलब्ध करून देण्यात आलेले नाही, गोदावरी पात्राच्या मध्यभागी असलेले बेटाच्या पलीकडून पाण्याचा प्रवाह जात असल्याने हे नयनरम्य ठिकाण पाहण्यासाठी अनेक जिल्हॉसह परराज्यासह पर्यटक या ठिकाणी येत आस्तात तर या बेटावर विविध चित्रपटाचे चित्रीकरण करण्यात आले होते,कालांतराने या बेटावर मोठ्या प्रमाणात असलेल्या झाडांची कत्तल होत आस्ते या कडे वनविभागाच्या अधिकारी दुर्लक्ष होत आहे. गोदावरी नदीवर डिग्रस बंधाऱ्यामुळे बेटाच्या दोन्ही बाजूला पाण्याचा वेढा गेल्याने सौंदर्य भर पडली आहे.

बेट पाहण्यासाठी जाणाऱ्या पर्यटनाला कसल्याच प्रकारची सुविधा नसल्याने पर्यटकांना आकर्षित करणारे बेट न पाहता काही अंतराहुन परत जावे लागत आहे, हीच गरज ओळखून कृषिभूषण कांतराव झरीकर यांच्या पुढाकारातून गावातील अनेक तरुणांना सोबत घेऊन बेटाच्या सर्वांगीण विकासासाठी बेटात विविध जातीचे वृक्ष लागवड करण्याची मोहीम त्यांनी हाती घेत बेटावर आज लगत जवळपास दोन ते तीन हजार वृक्षांची लागवड करण्यात आली आहे, तसेच बेटात स्वछता मोहिम हाती घेण्यात आली आहे.व बोटीची सुविधा करण्यात आल्याने पर्यटकांना बेट पाहण्याचा मार्ग खुला झाला आहे,भविष्यात या ठिकाणी बोटीची व्यवस्था करत पर्यटन व वाढीसाठी ही प्रयत्न केले जाणार आहे, यामुळे या बेटाचे सौंदर्य पुन्हा प्राप्त झाले आहे, बेटाच्या विकासासाठी अनेकांनी प्रयत्न करूनही त्याचा फारसा उपयोग झाला नाही गोदावरी नदीच्या कुशीत असलेले जांबुळबेटच्या विकासाठी स्थानिक नागरिकांनी संभाजीनगर येथील आयुक्त कार्यालय, राज्य शासनाच्या पर्यटन विभाग,परभणी जिल्हाधिकारी, यांच्याकडे अनेक वेळा पत्रव्यवहार करून बेटचा विकासासंदर्भात पाठपुरावा केला होता, त्या अनुषंगाने संभाजीनगर येथील तत्कालीन आयुक्त यांनी या बेटाला भेट देत बेटा संदर्भात संपूर्ण माहिती मागीतली होती, त्याच अनुषंगाने तत्कालीन परभणी जिल्हाधिकारी पी शिवशंकर यांनी प्रत्यक्षात बेटाल भेट देऊन बेटाच्या विकासात संदर्भात दोन कोटी रुपयाचा कृती आराखडा तयार केला होता मात्र या बेटाला अद्याप पर्यटन खात्याकडून एकही रुपया मिळाला नाही बेटाच्या विकासाला अनेक समस्याने ग्रासले आहे ,यामध्ये तत्कालीन पालकमंत्री राजेंद्रजी दर्डा यांच्या निधीतून सुमारे चौदा लक्ष रूपये खर्च करून पर्यटकांसाठी बांधलेल्या गेलेल्या विश्रामगृहची दयनीय अवस्था झाली आहे, या विश्रामगृहत मुक्त जनावरांचा संचार वावरतो विश्रामगृह ची देखभाल करण्यासाठी कोणत्याही प्रकारचे कर्मचारी न ठेवल्यामुळे येथील विघुत फॅन. बल्ब.लाईट फिंटीग साहित्य चोरीस गेले आहे तर दरवाजे. खडकी या नाहीश्या झाल्या आहेत बेटकडे जाणाऱ्या पाच किमी चा रस्ता अत्यंत खराब झाला असल्यने वहान धारंकाना तारेवरची कसरत करावी लागते यामुळे इथे जाणाऱ्या पर्यटकांना नाहक त्रास सहन करावा लागत आहे. या कडे प्रशासन लक्ष देईल काय अशी मागणी होत आहे.

## चालत्या बसमध्ये अचानक ऱ्हदयविकाराच्या झटक्याने वैद्यकीय अधिकाऱ्याचा दुर्देवी मृत्यू


**रामप्रसाद कंठाळे**
**जिंतूर,/प्रतिनिधी-** भोगाव रस्त्यावर ८ सप्टेंबर संध्याकाळी सुमारे रात्री ७ वाजण्याच्या सुमारास एक दु:खद घटना उघडकीस आली. वझर प्राथमिक आरोग्य केंद्रात काही दिवसापूर्वी वैद्यकीय अधिकारी म्हणून नियुक्ती झालेला डॉक्टर आषित योगीराज वानखेडे (वय ३२ वर्ष, रा. नादेड) हा जिंतूर ते गडगव्हाण एसटी बसने प्रवास करत असताना अचानक बेशुद्ध झाला.

डॉक्टर वानखेडे बस स्थानकातून बसमध्ये चढले आणि कंडक्टरने त्यांना तिकीट दिले. बस धावत निघाली असतानाच भोगाव रस्त्यावर काही नागरिकांनी कंडक्टरला माहिती दिली की



प्रवासी बेशुद्ध पडला आहे. तत्काळ बस थांबवून डॉक्टर वानखेडे यांना जिंतूर ग्रामीण रुग्णालयात दाखल करण्यात आले. रुग्णालयात डॉक्टरांनी तपासणीनंतर त्यांना मृत घोषित करण्यात आले. तालुका वैद्यकीय अधिकारी डॉ दिनेश बोराळकर, हवालदार जिया खान पठाण यांचे पथक दाखल झाले. त्याचबरोबर मृतकाचे नातेवाईक देखील घटनास्थळी दाखल झाले होते. शवविच्छेदन करून प्रेत नातेवाईकांच्या स्वाधीन करण्यात आले आहे. तालुका वैद्यकीय अधिकारी डॉ दिनेश बोराळकर यांनी घटनास्थळी धाव घेत पाहणी केली असून मृत्यूचे नेमके कारण उत्तरीय तपासणीनंतर स्पष्ट होणार आहे.

### हभप नारायण महाराज इनामदार पालमकर यांना राज्यस्तरीय मराठवाडा रत्न पुरस्कार घोषित



**पालम,/प्रतिनिधी-** पुणे येथील मराठवाडा सेवक प्रतिष्ठानच्या वतीने यंदाचा दिला जाणारा राज्यस्तरीय मराठवाडा रत्न २०२५ पुरस्कार महाराष्ट्रातील सुप्रसिद्ध भागवताचार्य तसेच कीर्तनकार ,ह भ प नारायण महाराज इनामदार (पालमकर) यांना दिला जाणार आहे.

मराठवाडा सेवक प्रतिष्ठान तर्फे दरवर्षी १७ सप्टेंबरला मराठवाडा मुक्तीसंग्राम दिन साजरा केला जातो. या कार्यक्रमाच्या माध्यमातून मराठवाड्यातील विविध क्षेत्रातील मान्यवरांना राज्यस्तरीय मराठवाडा रत्न पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात येते.

या अनुषंगाने बाळकृष्ण महाराज संस्थान, पालम च्या माध्यमातून संपूर्ण महाराष्ट्रात धार्मिक व सामाजिक कार्य करणारे महाराष्ट्रातील प्रसिद्ध भागवताचार्य, कीर्तनकार, कथाकार, ह भ प नारायण महाराज पालमकर यांना २०२५ चा राज्यस्तरीय मराठवाडा रत्न पुरस्कार देऊन त्यांच्या कार्य कर्तुत्वाचा सन्मान केला जाणार आहे .

दिनांक १७ सप्टेंबर रोजी मराठवाडा मुक्ती संग्राम दिनाचे औचित्य साधून यशवंतराव चव्हाण नाट्यगृह, कोथरूड,पुणे येथे विविध क्षेत्रांतील मान्यवरांच्या उपस्थितीत हा पुरस्कार सोहळा संपन्न होणार आहे. पुरस्कार जाहीर होताच नारायण महाराज इनामदार यांच्यावर सर्वच स्तरातून अभिनंदनाचा वर्षाव केला जात आहे.



**परभणी- महाराष्ट्राचे राज्यपाल श्री सि पी राधाकृष्णन जी यांची भारताच्या उपराष्ट्रपती पदी बहुमताने निवड झाल्याबद्दल परभणी जिल्ह्याच्या पालकमंत्री तथा राज्यमंत्री यांनी त्यांचे स्वागत केले.**

## तब्बल ५३ वर्षानंतर भेटणार वर्ग मित्र
## सेलूत शनिवारी माजी विद्यार्थी स्नेह-मिलनाचे उद्घाटन

**सेलू,/प्रतिनिधी-** येथील नूतन विद्यालयातील १९७२ मधील दहावी वर्गात उत्तीर्ण होऊन बाहेर पडलेले व आता वयाची सत्तरी गाठलेले वर्गमित्र त्रेपन्न वर्षांनंतर दोन दिवसीय स्नेह-मिलनानिमित्त शहरातील बालाजी मंदिर ( मंगल कार्यालयात ) शनिवार ( दि. १३ ) व रविवार ( दि.१४ ) सप्टेंबरला आयोजित स्नेह- मिलनात भेटणार आहेत. दोन दिवसीय स्नेहसंमेलनात शनिवारी पहिल्या दिवशी दुपारी दिड वाजता माजी विद्यार्थी संमेलनाचे उद्घाटन आहे.

त्यानंतर मी दहावीनंतर काय केले ? या विषयावर माजी विद्यार्थी संवाद, सायंकाळी सांस्कृतिक कार्यक्रमात संगीत शिक्षक सच्चिदानंद डाखोरे, पूजा तोडकर, दिपक देवा, शोभा चिक्षे, मनिषा पांडे, स्वाती तांबे यांची संगीत मैफिल, गौतम सूर्यवंशी यांचे काव्य वाचन आयोजित करण्यात आले आहे. तर दुसऱ्या दिवशी रविवार ( दि. १४ ) रोजी बालाजी मंदिर ( मंगल कार्यालय ) ते नूतन विद्यार्थ्यांपर्यंत माजी विद्यार्थी प्रभातफेरिने येणार आहेत. नूतन विद्यालयात १९७२ ला शिकवत असलेले गुरूजी नूतन विद्यालय शिक्षण संस्थेचे माजी सचिव प्राचार्य द.रा. कुलकर्णी, उपाध्यक्ष डी.के. देशपांडे, सचिव प्राचार्य डॉ. विनायकराव कोठेकर, पी.एम.रोडगे, कालिदास दुरूक्कर, प्रकाश पांडव, कालिदास कुलकर्णी आदींचा सन्मान होणार आहे. स्नेह मिलन सोहळ्यात नूतन विद्यालय शिक्षण संस्थेचे अध्यक्ष डॉ. एस. एम. लोया, सहसचिव जयप्रकाश बिहाणी, मुख्याध्यापक संतोष पाटील, मुख्याध्यापक निशा पाटील, मुख्याध्यापक उल्हास पांडे उपस्थित राहणार आहेत. स्नेह मिलन यशस्वीतेसाठी प्राचार्य डॉ. शरद कुलकर्णी, माजी नगराध्यक्ष हेमंतराव आडळकर, प्रा. भगवान टेकाळे, रामप्रसाद घोडके, श्यामसुंदर मणियार, डॉ.सुभाष परताणी, श्रीकांत दिक्षित, सतिश टाक, मुजीब घोरी, नंदकिशोर राजूरकर, मधुकर तावरे, पांडुरंगराव मगर, प्रकाश धामणगावकर , शरयू मुळावेकर, मधुकर कव्हळे, विठ्ठल गायकवाड, सतीश पांडे, माणिक रोडगे, ज्ञानेश्वर शिंदे, रामकिशन शेरे, प्रकाश भरड इत्यादी परिश्रम घेत आहेत.

## मराठा समाजाच्या महिलांबाबत आक्षेपार्ह पोस्ट
### जिंतूर पोलिसात गुन्हा दाखल

**जिंतूर,/प्रतिनिधी-** मराठा समाजातील महिलांबाबत सोशल मीडियावर आक्षेपार्ह व अश्लील पोस्ट केल्याप्रकरणी जिंतूर पोलीस ठाण्यात एका व्यक्तीवर दिनांक ९ सप्टेंबर रोजी रात्री उशिरा गुन्हा दाखल करण्यात आला दरम्यान परभणी येथे स्थानिक गुन्हे अन्वेषण विभागाने आरोपीस अटक करून कारवाई करण्यात आली.

घटने बाबत मिळालेली अधिक माहिती अशी की,फ ` सबुकवर असलेल्या सोपान उकंडे नामक व्यक्तीने मराठा समाजातील महिला बाबत अश्लील व आक्षेपार्ह पोस्ट केली होती यामुळे जिंतूर शहरातील मराठा समाजातील नागरिकांत संतप्त भावना व्यक्त करण्यात येत आहेत संबंधित प्रकरणामुळे शहरात व परिसरात मोठी खळबळ उडाली असून मराठा समाजातील नागरिकांत तीव्र संताप व्यक्त केला जात आहे आरोपीने समाजाच्या महिलांविषयी अत्यंत घृणास्पद आणि अपमानास्पद अशा स्वरूपाचे लिखाण सोशल मीडियावर टाकले. हे कृत्य समाजाच्या प्रतिष्ठेला धक्का देणारे असल्यामुळे नागरिकांनी मोठ्या प्रमाणात विरोध दर्शविला होता यावेळी संतप्त मराठा समाजातील युवकांनी गुन्हा दाखल करण्यासाठी मोठ्या संख्येने पोलिस ठाण्यात दाखल झाले होते यावेळी संतोष शिंदे यांच्या फिर्यादीवरून सोपान उकंडे याच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे यावेळी संतप्त मराठा युवकांनी यापुढे जर कोणी समाजाच्या महिला-पुरुषांविषयी अश्लील, आक्षेपार्ह किंवा अपमानास्पद कमेंट केली तर कायदा हातात घेण्याचा इशारा दिला. दरम्यान,रात्री उशिरा परभणी येथील स्थानिक गुन्हे शाखेने आरोपी सोपान उकंडे यास ताब्यात घेतले असल्याची माहिती मिळाली आहे.

## बलसा बुं. येथे पतीने गळा आवळून केली पत्नीची हत्या

**पूर्णा,/प्रतिनिधी :** पूर्णा तालुक्यातील बलसा बुं. येथील ४५ वर्षीय महिलेचा तिच्या पतीने दस्तीने गळा आवळून खून केल्याची धक्कादायक घटना सोमवारी (दि. ८) उघडकीस आली.

देविदास माणिकराव शिंदे (वय ५०, रा. बलसा) याने सकाळी ९ ते दुपारी १ च्या दरम्यान दूध का सांडविले, या किरकोळ कारणावरून पत्नी सुनिता शिंदे (वय ४५) हिला मारहाण केली. त्यानंतर दस्तीने गळा आवळून तिची हत्या केली. घटनेची माहिती मिळताच ताडकळस पोलिस ठाण्याचे ठाणेदार गजानन मोरे, पोलिस उपनिरीक्षक गजानन काटेवाडे, नामदेव सुजलोड व तुकाराम आयनले यांनी घटनास्थळी धाव घेत पंचनामा केला.

यात्रकरणी सुरेश देविदास शिंदे (रा. बलसा बुं., हल्ली मुक्काम बरबडी) यांच्या फिर्यादीवरून ताडकळस पोलिस ठाण्यात खुनाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास ठाणेदार गजानन मोरे यांच्या मार्गदर्शनाखाली उपनिरीक्षक गजानन काटेवाडे करीत आहेत.

# महावितरणचा वरिष्ठ यंत्रचालक निलंबित

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड, दि. १० सप्टेबर-**

देगलूर नाका परिसरात वास्तव्यास असणारे आणि महावितरणच्या कंधार ३३/११ केव्ही उपकेंद्रात वरिष्ठ यंत्रचालक पदावर नोकरीस असणारे सलीम चाँद सय्यद यानी त्यांच्या रहात्या घरात चोरून वीज वापरल्याप्रकरणी पोलीसात गुन्हा दाखल झाल्याने त्याना महावितरणच्या नोकरीतून निलंबित केल्याची माहीती परिमंडळ कार्यालयाने कळविली आहे.

**साडे चार लाख रुपयांची वीजचोरी**

सलीम चाँद सय्यद यांनी त्यांच्या देगलूर नाका, खुशरो नगर नांदेड येथील रहात्या घरात वीज पुरवठयासाठी वापरण्यात आलेल्या सर्व्हिस वायरला टॅपींग करून ४ लाख ४८ हजार ६०९ रुपयांच्या विजेची चोरी केल्याचे वीज चोरी पथकास आढळून आले. तपासणी व पंचनाम्यांती सलीम चाँद सय्यद व त्यांचा किरायदार सय्यद लतीफ सय्यद अथर या दोघांविरुध्द नांदेड ग्रामीण पोलीस ठाण्यात भारतीय विद्युत कायदा कलम १३५ नुसार फिर्याद दिली होती. त्यानुसार बीएनएसच्या कलम १७३ अंतर्गत पोलीसात गुन्हा नोंद करण्यात आला.

गुन्हा दाखल झालेल्या दोंघापैकी एक सलीम चाँद सय्यद हे महावितरणमध्येच कंधार वीज उपकेंद्रात वरिष्ठ यंत्रचालक पदावर नोकरीस असल्याने व त्यांच्याकडून वीजचोरीसारखे गैरकृत्य घडल्याने त्यांच्यावर महावितरणच्या परिमंडळ कार्यालयाकडून दि.९ सप्टेंबर रोजीच्या आदेशाव्दारे निलंबित करण्यात आले आहे.

परिमंडळात महावितरणकडून वीजचोरीविरुध्द धडक मोहीम राबविण्यात येत असून वीज ग्राहकांनी वापरलेल्या विजेची बिले नियमितपणे भरावीत व विजेचा अधिकृतपणे वापर करून कटू कारवाई टाळावी. असे आवाहन मुख्य अभियंता श्री राजाराम माने यांनी केले आहे.

## संक्षिप्त वृत्त

### शिक्षक दिन व गुरु वशिष्ठ आदर्श शिक्षक पुरस्कार वितरण सोहळा

**मुदखेड** -स्वामी विवेकानंद शिक्षण प्रसारक मंडळ बारड व श्री शितलादेवी प्रतिष्ठान बारड द्वारा संचलित श्री शिवाजी कनिष्ठ महाविद्यालय बारड व स्वातंत्र्यसेनानी राजाराम बापू विद्यालय बारड व शंकराव देशमुख इंग्लिश स्कूल अँड ज्युनियर कॉलेज बारड यांच्या संयुक्त विद्यमाने दि.५ सप्टेंबर रोजी शिक्षक दिन व गुरु वशिष्ठ आदर्श शिक्षक पुरस्काराचे वितरण करण्यात आले.



या कार्यक्रमासाठी परिसरातील ज्येष्ठ शिक्षक व वसंतराव नाईक कृषी गौरव पुरस्कार प्राप्त शेतकरी बालाजी महादवाड व सेवानिवृत्त मुख्याध्यापक विजयकुमार देशमुख यांचा शाल व श्रीफळ देऊन संस्थेचे अध्यक्ष संजय देशमुख यांनी त्यांचा सत्कार केला कार्यक्रमाची सुरुवात शैक्षणिक संस्थेचे अध्यक्ष व संचालक मंडळ यांच्या हस्ते माता सरस्वती व सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या प्रतिमेच्या पूजनाने झाले ५ सप्टेंबरला शिक्षक दिनी संस्थेच्या वतीने दिला जाणारा गुरु वशिष्ठ आदर्श शिक्षक पुरस्कार श्री शिवाजी कनिष्ठ महाविद्यालय बारड च्या प्राध्यापिका सौ.ज्योत्स्ना बोरीवाले व स्वातंत्र्य सेनानी राजारामबापू विद्यालयाचे सहशिक्षक अनिल महादवाड यांना संस्थेचे अध्यक्ष संजय देशमुख व संचालिका पूजा देशमुख यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. त्याचबरोबर संस्थेतील सर्व शिक्षकांचा शाल व पुष्पहार देऊन सन्मान करण्यात आला यावेळी संस्थेचे संचालक मंडळ, रामेश्वर कोरबनवाड, अशोक पाटील गव्हाणे, गौतम आठवले, कांजाळे, एन डी देशमुख, दिलीप मुलंगे, प्रभाकर आठवले, व पंजाबराव चव्हाण, इत्यादी संचालक मंडळ उपस्थित होते या कार्यक्रमासाठी श्री शिवाजी कॉलेज चे प्राचार्य हेमंतराव सोपानराव इंगळे व शाळेचे मुख्याध्यापक रामकिशन चुबेवार व शंकरराव देशमुख कॉलेजची प्राचार्य सचिन गव्हाणे पाटील व सर्व शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी यांनी परिश्रम घेऊन हा कार्यक्रम यशस्वी केला आहे.

### सौरव तेली याची लिनक्स फॉउंडेशन मेंटरशिप प्रोग्राम साठी निवड

**नवीन नांदेड**-एसजीजीएस अभियांत्रिकी व तंत्रशास्त्र संस्था विष्णुपुरी, नांदेड या संस्थेतील विद्यार्थी सौरव तेली, अंतिम वर्ष संगणक अभियांत्रिकी या विद्यार्थ्यांची जगभरात प्रतिष्ठीत अश्या लिनक्स फॉउंडेशन मेंटरशिप (एल.एफ.एक्स) प्रोग्राम २०२५ टर्म ३ अंतर्गत सी.एन.सी.एफ. क्यूबआर्मर : ऑब्झर्व्हेबिलिटी स्पेक्ट्रम एन्हांसमेंट या प्रकल्पासाठी निवड झाली आहे.



लिनक्स फॉउंडेशन मेंटरशिप या प्रोग्राम साठी १२ आठवड्याच्या इंटर्नशीप साठी सौरव तेली यास रु. २.५ लाख (अंदाजे ३,००० डॉलर) स्टायपेंड मिळणार आहे. यासाठी जगभरातून हजारो विद्यार्थी (स्पर्धक) या निवड प्रक्रियेत सहभागी होतात. या कार्यक्रमाच्या अत्यंत स्पर्धात्मक निवड प्रक्रियेमुळे, त्यातून साधारणपने १०० ते १५० विद्यार्थी निवडले जातात. या अटीतटीच्या चुरसीतुन श्री गुरुगोविंद सिंघजी अभियांत्रिकी व तंत्रशास्त्र या संस्थेच्या विद्यार्थ्यांची निवड लिनक्स फॉउंडेशन मेंटरशिप साठी झाली या यशाबद्दल संस्थेचे संचालक डॉ. मनेश कोकरे यांनी अभिनंदन करून पुढील कार्यास शुभेच्छा दिल्या. तसेच संस्थेचे संस्थेच्या नियामक मंडळाचे अध्यक्ष सुनीलजी रायठ्ठा, व नियामक मंडळाचे सर्व सदस्य, विभाग प्रमुख प्रा. सुवर्णा बनसोडे, इंचार्ज रजिस्ट्रार डॉ. बी. आर. बोंबडे, शैक्षणिक अधिष्ठाता डॉ. अभिजित नांदेडकर, रिसर्च एंड डेवलपमेंट अधिष्ठाता डॉ. अनिल गोंडे, सर्व अधिष्ठाता, विभाग प्रमुख, प्राध्यापक, कर्मचारी व विद्यार्थी यांच्याकडून त्याचे अभिनंदन करण्यात येत आहे.

### रत्नाकर ईखे यांचा शिक्षक दिनी पूरस्काराने सन्मान

**बाऱ्हाळी**-ऐकलव्य निवासी अंध विद्यालयाचे मूख्याध्यापक रत्नाकर ईखे यांना शिक्षक दिनी नाशिक येथे राष्ट्रीय द्रष्टिहिन संघाच्या वतीने पूरस्काराने सन्मानित करण्यात आले. राष्ट्रीय द्रष्टिहिन संघाच्या हँपी होम



पूर्वसन व प्रशिक्षण केंद्र शिंदे पळसे नाशिक येथे पूणे येथील सेनानिव्रत जिल्हा न्यायाधीश बच्चेवार, गट शिक्षण अधिकारी चव्हाण यांच्या हस्ते संधिनिकेतन शिक्षण संस्था वडगाव संचालित एकलव्य निवासी अंध विद्यालय बा-हाळीचे मूख्याध्यापक रत्नाकर ईखे यांचा पूरस्काराने सन्मानित करण्यात आले. पूरस्कार मिळाल्याने संस्थेचे सचिव नि.म. वडगावकर गूरुजी, रमेश वडगावकर यांच्यासह अनेकांनी अभिनंदन केले आहे.

### कु. तेजस्विनी भद्रे नेट आणि सेट परीक्षा उत्तीर्ण

**नांदेड**- येथील कु. तेजस्विनी भद्रे ह्या विद्यार्थिनीने सहाय्यक प्राध्यापक पदासाठी आवश्यक असलेल्या UGC तर्फे घेण्यात आलेल्या राष्ट्रीय स्तरावरील NET आणि राज्यस्तरावरील SET ह्या दोन्ही परीक्षा



उत्तम गुणांनी उत्तीर्ण केल्यामुळे तिचे सर्वत्र अभिनंदन होत आहे. नांदेड येथील डॉ. वंदना आणि डॉ. विलासराज भद्रे ह्यांची ती सुकन्या असून राहुरी कृषी विद्यापीठातून कृषी अर्थशास्त्र ह्या विषयात च.डल.विशेष प्राविण्यासह उत्तीर्ण झाली असून सध्या ती कृषी अर्थशास्त्रात झह.ऊ करीत आहे. दहावीपासून पदव्युत्तर परिक्षेपर्यंत आणि विविध स्पर्धा परीक्षेत तिने घवघवीत यश मिळविले आहे. ती उत्तम वक्ता, निवेदिका असून सामाजिक, शैक्षणिक क्षेत्रातही कार्यरत आहे. ती आंबेडकरवादी मिशन, नांदेड येथील विद्यार्थिनी असून आपल्या यशाचे श्रेय तिने आई,वडील, आंबेडकरवादी मिशन प्रमुख दीपक कदम आणि सर्व शिक्षकांना दिले आहे.

# भक्तीमय वातावरणात अप्पारावपेठ येथे दोन दिवसीय गोविंदा मिरवणूक

**तभा वृत्तसेवा**
**इस्लापूर, दि. १० सप्टेबर-**

महाराष्ट्र व तेलंगणा सीमेलगत असलेल्या किनवट तालुक्यातील अप्पारावपेठ या गावात पारंपरिक गोविंदा उत्सवाची दोन दिवस भव्य मिरवणूक काढून भक्तीमय वातावरणात सांगता करण्यात आली.

या उत्सवाच्या निमित्ताने संपूर्ण आठवडाभर धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. सप्ताहाच्या शेवटी गोविंदाच्या मूर्तीची भव्य मिरवणूक महिलांपासून वृद्धांपर्यंत हजारो भाविकांच्या उपस्थितीत काढण्यात आली. ढोल-ताशे, बँड, पारंपरिक वेशभूषा, फुलांनी सजवलेली रथयात्रा आणि टाळ-मृदंगाच्या गजरात उत्सवाचा माहोल अनुभवायला मिळाला. तेलंगणा, आंध्रप्रदेशसह मराठवाडा आणि विदर्भातून हजारो भाविक गोविंदाच्या दर्शनासाठी अप्पारावपेठ येथे दरवर्षीप्रमाणे यंदाही मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**दहा ते बारा क्विंटल तांदळाचा महाप्रसाद**

उत्सवाच्या अखेरच्या दिवशी जवळपास



१० ते १२ क्विंटल तांदळाचा अन्नभोजन महाप्रसाद भाविकांना वितरित करण्यात आला. या महाप्रसादाचा लाभ गावकरी आणि दूरदूरून आलेल्या पाहुण्यांनी घेतला.

**१५ हजारांत लाडूचा लिलाव**

कार्यक्रमात गोविंदाच्या लाडूचा विशेष लिलावही करण्यात आला. यंदा हा लाडू एका भक्ताने तब्बल १५,००० रुपयांना विकत घेतला, अशी माहिती स्थानिक कार्यकर्ते विनायकराव देशमुख यांनी दिली.

या उत्सवामुळे अप्पारावपेठ गावात धर्मसामंजस्य, सामाजिक ऐक्य आणि एकात्मतेचा अनोखा संदेश पसरला असून, पारंपरिक वारशाला नवा उत्साह मिळाल्याचे चित्र अनुभवायला मिळाले.

# महाराष्ट्र जनसुरक्षा विधेयका विरोधात महाविकास आघाडीचे निदर्शने

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड, दि. १० सप्टेबर-**



महाराष्ट्र जनसुरक्षा विधेयक हे घटनाविरोधी व लोकशाहीला बाधक असून जनतेच्या मूलभूत हक्कावर गदा आणणारे आहे. सामाजिक चळवळीतील कार्यकर्त्यांची मोस्कटदाबी व्हावी व हुकूमशाही यंत्रणा बळकट व्हावी हाच कुटीत हेतू या विधेयकाच्या माध्यमातून साधला जाणार आहे. अशी महाविकास आघाडीची भुमिका आहे. दरम्यान काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार), शिवसेना (उबाठा), शेकाप, कम्युनिस्ट पक्ष, आरपीआय (गवई गट) आदीसह इतर मित्र पक्षाच्या महाविकास आघाडीच्या वतीने बुधवार (ता.१०) रोजी शहरातील भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याजवळ महाराष्ट्र जनसुरक्षा विधेयका विरोधात जोरदार निदर्शने आंदोलन करण्यात आले. हा जाचक कायदा वापस घ्यावा, अशी मागणी निवेदनाच्या माध्यमातून राज्य शासनाकडे, जिल्हाधिकारी यांच्या मार्फत करण्यात आली.

महाराष्ट्र जनसुरक्षा विधेयकाच्या माध्यमातून शासनाच्या विरोधात बोलणाऱ्या सामान्य नागरिकांना तसेच विरोधी पक्षाच्या कार्यकर्त्यांना अटक करून त्यांच्याविरोधात खोट्या कारवाया करण्यात येतील अशी शक्यता या विधेयकामुळे व्यक्त होत आहे. यामुळे भारतीय राष्ट्रीय काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्ष, शिवसेना उबाठा, शेकाप, सीपीआय, आरपीआय (गवई गट) यांच्यासह मित्र पक्षाच्या महाविकास आघाडीच्या वतीने महाराष्ट्र जनसुरक्षा विधेयका विरोधात बुधवार (ता.१०) रोजी शहरातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याजवळ जोरदारपणे निदर्शने आंदोलन करण्यात आले. यावेळी हा जाचक कायदा वापस घ्यावा, अशी मागणी निवेदनाच्या वतीने राज्य शासनाकडे जिल्हाधिकारी यांच्या मार्फत करण्यात आली. यावेळी माजी आमदार तथा दक्षिण काँग्रेस जिल्हाध्यक्ष हणमंतराव पाटील बेटमोगरेकर, उत्तर काँग्रेस जिल्हाध्यक्ष राजेश पावडे, महानगराध्यक्ष अब्दुल सत्तार, डॉ.श्रावण रँपनवाड, सुरेंद्र घोडसकर, माजी आ. रोहीदास चव्हाण, राष्ट्रवादी काँग्रेस जिल्हाध्यक्ष भगवानराव आलेगावकर, शहराध्यक्ष डॉ. सुनील कदम, शिवसेना उबाठा जिल्हाप्रमुख भुजंग पाटील, बबन बारसे, महानगर प्रमुख प्रकाश मारावार, अर्जुन ठाकूर, मनोज यादव, सिपीआयचे काँ. विजय गाभणे, काँ.शंकर सिडाम, काँ.अँड. प्रदीप नागापूरकर, शेकापचे गुरुनाथ कुरुडे, आरपीआयचे (गवई गट) भगवान ढगे, आनंद चव्हाण, महेश देशमुख तरोडेकर, शमिम अब्दुला, सतिश देशमुख तरोडेकर, सुरेश हाटकर, सत्यपाल सावंत, अजिज कुरेशी, प्रा. डी.बी. जांभरुनकर, सुभाष गायकवाड, गणेश तादलापूरकर, अब्दुल गफार, धनंजय सुर्यवंशी, सतिश उमरेकर, जितुसिंग टाक, प्रा. राम चव्हाण, सुनील कदम, नंदु वैद्य, बालाजी चव्हाण, मुन्तजीब, बापूसाहेब पाटील, काँ. उज्वला पडलवार, प्रांजली रावणगावकर, कल्पना डोंगळीकर, डॉ. करुणा जमदाडे, संगिता सुर्यवंशी, सिंधुताई देशमुख, ज्योती कदम, काँ. गंगाधर गायकवाड, अंबादास रातोळे, काँ. किशोर पवार, इंजी. विश्वभंर भोसिकर, नवनाथ पावडे, प्रा. मजहोदीन, प्रा.अशोक पवार, लालचंद यादव, स. खाजाभाई, नवनाथ जोंगदंड, बालाजी कल्याणकर, बाबूराव मोरे, काँ. गणेश सनदपटल, काँ. भगवान नाईक, गगन यादव, दिपकसिंग हुजुरिया, संजय वाघमारे, गणेश पाटील, गोतम सिरसाट, अभिलाष पावडे, नईम शेख, रिजवान पटेल आदीसह महाविकास आघाडीचे पदाधिकारी कार्यकर्ते मोठ्या संख्येने सहभागी होते.

# प्रेम, शांतता आणि बंधुभाव हाच ईद-ए-मिलादचा खरा संदेश : फिरोज दोसानी

**तभा वृत्तसेवा**
**माहूर, दि. १० सप्टेबर-**

इस्लामी प्रेषित मुहम्मद पैगंबर यांच्या स्तुतीतील कवितांचे पठण म्हणजेच धार्मिक नात पठण व अल्लाहच्या आदेशांचे पालन करण्यासाठी आणि त्याच्या इच्छेला शरण जाण्यासाठी 'मी तयार आहे' असे दर्शविणाऱ्या लब्बयेक या मुस्लिम समुदायाने ईश्वराच्या एकत्वाला (तौहीद) स्वीकारण्यासाठी केलेल्या प्रार्थनेतून ,प्रेम, शांतता आणि बंधुभाव हाच ईद-ए-मिलादचा खरा संदेश आहे! अशा मार्गदर्शक प्रतिक्रिया नगराध्यक्ष फिरोज दोसानी यांनी माहूर शहरात बुधवार, दिनांक १० सप्टेंबर रोजी पारंपरिक जल्लोषात साजरा करत ईद-ए-मिलाद निमित्ताने काढण्यात आलेल्या जुलूस प्रसंगी दिल्या.

सकाळी नगीना मस्जिदेतून नात पठण करणारे नात खवान, सना खुवान यांच्या नात पठणाच्या गजरात सुरू झालेला जुलूस सोनापीर दरगाहकडे मार्गस्थ झाला. शहरातील मुख्य रस्त्यांवरून निघालेल्या या मिरवणुकीत लहानग्यांपासून ते वयोवृद्धांपर्यंत सर्वांनी उत्स्फूर्तपणे सहभाग नोंदवला. धार्मिक नात पठण व लब्ब्येक या रसूल अल्लाहच्या जयघोषाने संपूर्ण शहर दुमदुमले होते.



यंदा ५ सप्टेंबर रोजी जुलूस काढण्याचे नियोजन होते. मात्र अनंत चतुर्दशीच्या दिवशी हिंदू बांधवांच्या श्रद्धेचा सन्मान राखून मुस्लिम समाजाने सामाजिक सलोख्याचे उदाहरण घालत जुलूस ०५ ऐवजी १० सप्टेंबर रोजी काढण्याचा निर्णय घेतला. त्यामुळे शहरात जातीधर्मातील ऐक्य, बंधूभाव व आपसातील आदराचे सुंदर असे मानवतावादी एकात्मतेचे चित्र पाहायला मिळाले.

यावेळी नागरिकांनी जुलूसाच्या स्वागतासाठी जुलूस मार्गावर ठिकठिकाणी उभे राहून जुलूसात सामील बांधवांचे आदरपूर्वक स्वागत केले. विशेष म्हणजे यावेळी मुस्लिम समाजा तर्फे पोलीस कर्मचाऱ्यांचा सत्कार करून त्यांच्या कार्याची प्रशंसा करण्यात आली. यासोबतच नगर पंचायत व विविध सामाजिक संस्थांनी ईद एक मिलाद च्या कार्यक्रमासाठी केलेल्या सहकार्यासाठी मुस्लिम समाजातर्फे त्यांचेही आभार व्यक्त करण्यात आले.

मिरवणुकीत नगिना मस्जिदचे सदर ताहेर भाई, गौसिया मस्जिदचे सदर जमीर मलनस, इरफान कालूत, नूर भाई, इरशाद राजा, नदीम भाई, सज्जाद, सिराज रजा, नजीर भाई, शेख रफिक गाईड, जावेद भाई (बीएसएनएल), सय्यद मोसिन, शेख सईद, जावेद दोसानी, सैफ दोसानी यांच्यासह अनेक समाजबांधव उपस्थित होते.

यावेळी पोलीस निरीक्षक गणेश कराड, सहाय्यक पोलीस निरीक्षक शरद घोडके, पोलीस उपनिरीक्षक पालसिंग ब्राह्मण, पोलिस उपनिरीक्षक संदीप अन्येबोईनवाड ,मेजर चौधरी यांचा विशेष सत्कार नगराध्यक्ष फिरोज दोसानी व समाजबांधवांकडून करण्यात आला.

# हैदराबाद गॅझेट लागू करुन बंजारा समाजाला एस.टी.सवलतीचे आरक्षण द्या : गोरसेना

**तभा वृत्तसेवा**
**हदगाव, दि. १० सप्टेबर-**



निजाम प्रांतातील १९०१ ते १९४८ पर्यंत हैदराबाद गॅझेटमध्ये गोरबंजारा, लंबाडा, लमाण जातीची नोंद जमात अशी असून त्यानुसार तेलंगणा आंध्रप्रदेशातील बंजारा, लंबाडा जातीना अनुसुचित जमातीचे आरक्षण मिळालेले आहे. मात्र १९४८ नंतर राज्य पुनर्रचनेदरम्यान मराठवाडा सह विदर्भ खानदेशचा भाग महाराष्ट्राला जोडल्यामुळे मुळचे असलेले अनुसुचित जमातीचे आरक्षण संपुष्टात येवून विमुक्त जातीच्या संवर्गात रुपांतरित करण्यात आले.त्यामुळे महाराष्ट्रातील गोरबंजारा समाजावर एस. टी. आरक्षणाबाबत घोर अन्याय झाला आहे. मात्र गेल्या काही दिवसात मराठा कुणबी एकच असल्याचे समजून हैदराबाद गॅझेटनुसार आरक्षण देणार असल्याचे फडणवीस सरकारने जि आर काढून जाहीर केले आहे. त्याला अनुसरुनच महाराष्ट्रातील गोरबंजारा समाजाला हैदराबाद गॅझेट लागू करुन अनुसूचीत जमातीचे एस टी चे आरक्षण देण्याची मागणी गोरसेनेने निवेदनाद्वारे केली आहे.

गोरसेनेचे राष्ट्रीय अध्यक्ष प्रा. संदेश चव्हाण यांच्या नेतृत्वाखाली संपूर्ण महाराष्ट्रात दि.१० सप्टेंबर रोजी निवेदन देण्यात आले.त्यामध्ये असे नमूद केले आहे की,महाराष्ट्रातील गोरबंजारा समाजाजवळ १९५० अगोदर अनुसुचित जमातीचे दुर्मिळ पुरावे असून क्रिमीनल ट्राईब कायद्याने बाधीत असूनही सेंट्रल प्रोवीन्स व बेरार प्रांतामध्ये तसेच हैदराबाद गॅझेट मध्ये त्यांना अनुसुचित जमातीच्या यादीत स्थान दिलेले होते. अनुसूचित जमातीचे आरक्षणाबाबत माजी मुख्यमंत्री वसंतराव नाईक, राष्ट्रसंत रामराव महाराज सह अन्य समाजसुधारकांनी सातत्याने प्रयत्न केले असून -गोरसेना या बंजारा समाजातील अग्रगण्य संचटनेने गेल्या विस वर्षापासून मोर्चा आंदोलने केलेली आहेत. मराठा कुणबी समाजासाठी हैदराबाद गॅझेटनुसार आरक्षण लागू होते त्या धर्तीवर गोरबंजारा समाजासाठी सुद्धा तेच गॅझेट लागू करुन एस टी प्रवर्गाचे आरक्षण मिळावे अशी मागणी गोरसेनेने निवेदनाद्वारे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना हदगाव तहसिलदार मार्फत केलेली आहे.मागण्या मान्य न झाल्यास तीव्र आंदोलन करण्यात येईल असा इशारा गोर सेना ता. अध्यक्ष रवि चव्हाण यांनी यावेळी दिला.




**नांदेड- अनंत चतुर्दशी निमित्त बापु हाईट्स तरोडा पाटी मालेगाव रोड येथे महाप्रसाद वाटप करताना आ. प्रतापराव पाटील चिखलीकर, भाजपा महानगर अध्यक्ष अमरनाथ राजुरकर, माजी सभापती संगीता पाटील डक, विजय येवनकर, माधव पावडे, किशन कल्याणकर, दीपक पाटील, भाजपा महिला आघाडी शहराध्यक्षा ज्योती किशन कल्याणकर, भुजंग कल्याणकर, दत्ता कल्याणकर, भीमराव कल्याणकर, केरबा कल्याणकर, व्यंकटराव कल्याणकर, सोपान पा. नेव्हल आदी. (छाया- नरेंद्र गडप्पा)**

# राष्ट्रीय लोकअदालतीचे १३ सप्टेंबर रोजी आयोजन

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड, दि. १० सप्टेबर-**

राष्ट्रीय विधी सेवा प्राधिकरण, नवी दिल्ली यांच्या आदेशान्वये महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरण, मुंबई व प्रमुख जिल्हा न्यायाधीश तथा नांदेड जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे अध्यक्ष सुनिल गं. वेदपाठक यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, नांदेड यांच्यातर्फे शनिवार १३ सप्टेंबर २०२५ रोजी जिल्हा न्यायालय व जिल्हयातील सर्व तालुका न्यायालयात तसेच कौटुंबिक न्यायालय नांदेड येथे राष्ट्रीय लोकअदालतीचे आयोजन करण्यात आले आहे.

या राष्ट्रीय लोकअदालतीमध्ये प्रलंबित तडजोडपात्र फौजदारी प्रकरणे, दिवाणी प्रकरणे, मोटार अपघात नुकसान भरपाई प्रकरणे, भुसंपादन प्रकरणे, धनादेश अनादरीत झाल्याबाबत प्रकरणे तसेच कौटुंबिक न्यायालयातील तडजोड होण्यायोग्य प्रकरणे, ग्राहक तक्रार निवारण मंच, सहकार न्यायालय व कामगार न्यायालयातील प्रकरणे इ. तडजोडीसाठी ठेवण्यात येणार आहेत. याशिवाय या लोक अदालतीत दाखलपूर्व प्रकरणे जसे थकीत मालमत्ता कर, थकीत विद्युत बिल, थकीत टेलीफोन बिल, विविध बँकांचे कर्ज वसुली प्रकरणे, थकीत पाणी बिल इ. प्रकरणे तडजोडीव्दारे निकाली काढण्यासाठी ठेवण्यात येणार आहेत. या राष्ट्रीय लोकअदालतीत मोठया संख्येने प्रकरणात तडजोड होण्यासाठी सर्वांनी सहकार्य करावे, असे आवाहन प्रमुख जिल्हा न्यायाधीश तथा नांदेड जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे अध्यक्ष सुनिल गं. वेदपाठक व जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे सचिव शरद जी. देशपांडे यांनी केले आहे.

तरी सर्व पक्षकारांनी आपले अधिकृत ओळखपत्र सोबत घेवून यावे. या राष्ट्रीय लोकअदालतीचा लाभ घ्यावा, असेही आवाहन करण्यात आले आहे.

# मुदखेड तहसीलवर बंजारा समाजाचा मोर्चा धडकला

**तभा वृत्तसेवा**
**मुदखेड, दि. १० सप्टेबर-**

हैदराबाद गॅझेट मध्ये बंजारा समाजला एस टी प्रवर्गात समाविष्ट करण्यासाठी मुदखेड तहसील कार्यालयावर बंजारा समाजा मोर्चा धडकला.

महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस या सरकारने मराठा आरक्षणासाठी हैद्राबाद गॅझेट लागू केलं आहे त्याच गॅझेट मध्ये बंजारा समाज एस टी प्रवर्गात येतो



म्हणून बंजारा समाजाला एस टी प्रवर्गात समाविष्ट करण्यात यावे ते गॅझेट बंजारा समाजाला लागू करण्यात यावे अशी मागणी मुदखेड तहसीलदार मार्फत मुख्यमंत्री यांना निवेदन देण्यात आले.

मोर्चाचे सुरुवात छत्रपती शिवाजी महाराज चौकात असलेल्या सेवालाल महाराज यांच्या नियोजित जागेपासून सुरुवात करण्यात आली या मोर्चात आरक्षण आमच्या हाक्काच नाही कोणाच्या बापाचं, जय सेवालाल म्हणत तहसील कार्यालयावर मोर्चा काढण्यात आला.

या मोर्चात माजी नगरसेवक उत्तम चव्हाण, बंजारा नेता पापाराव चव्हाण , भाजप शहराध्यक्ष रामसिंग चव्हाण ,संजय चव्हाण, किसन राठोड, प्रकाश राठोड, डॉ. जगदीश राठोड, विनोद चव्हाण, बालाजी राठोड, माधव पवार, सुभाष जाधव, सीताराम चव्हाण, सुरेश पवार , आलाराम चव्हाण,अंकुश जाधव, संतोष राठोड, रवी चव्हाण यांच्या सह हाजारो च्या संख्येने बंजारा समाज मोर्चात सहभागी झाले आहे.